# माणूस

शनिवार । ११ सप्टेंबर १९७६ । साठ पैसे

माझ्या पिढीतील
अनेकांच्या मनावरील
खांडेकरांचा संस्कार
आमच्या जीवनाला
वळण देणारा ठरला.

ग. प्र. प्रधान



# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक पंधरावा

११ सप्टेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# पूर्वी धुळे जिल्ह्यात आदिवासींमध्ये काम करणाऱ्या वसुधाताई धनबादहून लिहितात....

नासिकहून अमरचे पत्र येते. तो म्हणतो : 'ताई, आम्ही चर्चा करून असे ठरवले आहे की, अगदी खालपर्यंत जाऊन, शहरातल्या झोपडपट्टीत व खेडोपाडी कामे केली पाहिजेत.'

'तू बाहेर तर ये. मग पाहू आपण.' मी त्याला लिहून कळवते.

अमरची माझी ओळख अक्कलकुव्याची. तिथली शेतजमीन मालकीची समस्या हाताळण्यासाठी मी अक्कलकुव्यास ( धुळे जिल्हा ) जाऊन राहिले होते. एकट्या हिंडू नका, असा इशारा तेव्हाच मला स्थानिक हितचिंतकांनी दिला होता. पण अमर बरोबर असल्याने मी बिनधास्त पाच - सहा दिवसांचा दौराही काढत होते. पण जून पंचाहत्तर नंतर औरंगाबादला कामासाठी गेलेला अमर पुन्हा परतू शकलाच नाही. सध्या तो नाशकात आहे...

¤

धनबादला संथाळांचे (आदिवासी) तरुण नेते शिबू सोरेन भेटले. त्यांनी संथाळांना चैतन्यमय केलेले असते. शिबुजींना काम सुरू करून पाच वर्षे झाली. अर्धपोटी राहणारे संथाळ आता वर्षभर दोन वेळ भात जेवतात. एकदाच भाताचे पीक काढणारे हे आदिवासी सामुदायिक शेती करून गहू, तूर, बटाटा ही पिके घेऊन लागलेले आहेत. सामूहिक पशुपालन, रात्रीच्या शाळा, असे इतरही कार्यक्रम आहेत.

कार्यकर्ते नाहीत, ही मुख्य अडचण शिबुजींची दिसली. ते स्वतःही काही दिवस मोकळे नव्हते. शिबुजी नसते, तर येवढे सगळे उभे राहिलेले कामही बंद पडले असते.

¤

दांमखिडला ( ठाणे जिल्हा ) काम करणाऱ्या वसुधा व नयना यांनी हीच व्यथा एके ठिकाणी मांडली आहे. कार्यकर्ते नसल्याने खेडोपाडी होणाऱ्या अन्यायांना वाचा फोडणारे कुणीच राहिलेले नाही.

¤

स्वातंत्र्यपूर्व काळात घडलेल्या घटनांना थोडा उजाळा देणे वावगे ठरू नये...

१९२० साली ऑगस्ट महिन्यात गांधीजींनी शांतिपूर्ण असहकाराची घोषणा केली. *त्यावेळी त्यांच्या ह्या कृतीला अनेकांनी* आक्षेप घेतले. त्यांपैकी एक आक्षेप 'अस्पृश्यतेचे निवारण करण्याचे, हाती घेतलेले काम सोडून हे काय नवीनच काढले आहे?' असा होता. त्यावर गांधीजी म्हणाले की, गुलाम इतर गुलामांना मुक्त करू शकत नाही. राष्ट्रीय असहकार हा जास्त मोठा प्रश्न आहे व अस्पृश्यतेची समस्या त्यातच सामावलेली आहे. गांधीजींची असहकाराची घोषणा ब्रिटिश सरकारकडून खिलाफत व जालियनवाला बाग ह्या दोन बाबतीत झालेल्या अन्यायांचे निवारण करवून घेण्यासाठी होती. परंतु कॉंग्रेसने असहकाराचा ठराव मंजूर करताना त्यात स्वराज्याची मागणी घालावी असे ठरवले. ह्या सूचनेचा गांधीजींनी सहर्ष स्वीकार केला. परदेशी माल, शिक्षणसंस्था व कोर्टकचेऱ्या ह्यांच्यावर बहिष्कार टाकणे, सैन्यात भरती न होणे, नव्या legislative council च्या निवडणुकांना उभे न राहणे इ. सात सूचना कॉंग्रेसने केल्या. ह्या ठराव मांडताना महात्माजी म्हणाले, हा ठराव जर आपण पाळला, तर एका वर्षात आपल्याला स्वराज्य मिळेल. खादी, अस्पृश्यता निवारण, हिंदु–मुस्लिम ऐक्य, हे कार्यक्रमही गांधीजींनी देशासमोर ठेवले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद मिळालाही, पण स्वराज्य मात्र मिळाले नाही. ४ नोव्हेंबर १९२१ रोजी गांधीजींनी बार्डोलीला सविनय कायदेभंगाची लवकरच सुरुवात करण्याचे जाहीर केले. 'इथे

स्वराज्याचा झेंडा फडकला की, मग एक एक करून सर्व जिल्हे व सरतेशेवटी सर्व देशभर स्वराज्याचा झेंडा फडकू लागेल.' गांधीजी ही सर्व चळवळ स्वतःच्या नेतृत्वाखाली करणार होते. बार्डोलीस कायदेभंग होईल तेव्हा इतर प्रांतांतल्या नेत्यांनी केवळ सहानुभूती ठेवावी व आपापल्या क्षेत्रात शांतताभंग न होऊ देण्याची खबरदारी बाळगावी ही विनंती गांधीजींनी केली. 'जर ही शांती टिकली, तर यशश्री आपल्याला माळ घालील अशी मला खात्री आहे' असेही गांधीजी म्हणाले. त्याचवेळी त्यांनी असा गंभीर इशारा दिला की, सर्व चळवळ शांततेनेच झाली पाहिजे, यत्किंचितही हिंसाचार भारतात कुठेही झाला, तर ही चळवळ पुढे नेणे योग्य किंवा इष्ट ठरणार नाही.

नोव्हेंबर महिन्यातच ब्रिटनचे युवराज भारताचा दौरा करण्यासाठी मुंबईस येऊन दाखल झाले. त्यांच्या आगमनाच्या दिवशी मुंबईस हरताळ पाडण्याचे ठरले होते. पण पारशी, यहुदी व ख्रिस्ती लोकांनी हरताळ पाडला नाही म्हणून हिंदु–मुसलमानांनी त्यांच्याविरुद्ध दंगल केली. जाळपोळ, दुकाने फोडणे, अंगावरची वस्त्रे फाडणे इ. सर्व गोष्टी झाल्या. महात्माजींनी ह्या घटनेचा निषेध तर केलाच, पण बार्डोलीचा कार्यक्रमही बेमुदत पुढे ढकलला.

जानेवारी १९२२ मध्ये बार्डोलीचा प्रश्न पुन्हा उभा राहिला. गांधीजींनी व्हाइसरॉयना पत्र लिहून ultimatum दिला तो असा–'व्यक्तिस्वातंत्र्यावर घातलेली दडपशाही बंधने काढा व असहकाराकरता जेलात घातलेले बंदी सोडा तर आम्ही, आमचे सहकारी सुटून त्यांच्याशी चर्चा करीपर्यंत कायदेभंग स्थगित करू.' व्हाईसरॉयनी ही मागणी नाकारली. मुंबई व इतर ठिकाणी होणाऱ्या दंग्याधोप्यांमुळे सरकारला धोरण बनवणे भाग पडले आहे असा उलट प्रतिवाद त्यांनी केला. ह्यावर गांधीजींनी, सरकार करीत असलेल्या अखिल भारतीय हिंसाचाराची बरीच उदाहरणे वानगीदाखल त्यांना कळवली. ह्या प्रत्युत्तराला उत्तर येण्याअगोदरच उत्तर प्रदेशात चौरीचौराला मोठा दंगा झाला. एका शांततामय, राजकीय मिरवणुकीतल्या काही लोकांना पोलिसांनी मार दिला म्हणून क्षुब्ध होऊन जमावाने पोलिस–स्टेशन जाळले व आगीतून बाहेर पडलेल्या पोलिसांचे अक्षरशः तुकडे करून ती छिन्न शरीरे आगीत फेकून दिली.

बार्डोलीच्या उंबठ्यावर देश उभा असताना ही प्रक्षोभक बातमी आली. तत्क्षणी महात्माजींनी आपली सर्व चळवळ मागे घेतली. त्यांना कणखर व कटु विरोध–मोतीलाल नेहरू प्रभृतींनी केला. परंतु जनता अजून सविनय कायदेभंगास तयार नाही ह्या निष्कर्षावर गांधीजी पोचले असल्याने ते अविचल राहिले. त्यांनी स्वतः आत्मशुद्धी-उपवास केला व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना जाहीर आवाहन केले की, उपवास न करता खेडोपाडी जाऊन कामे करावीत, हरिजनांची सेवा करावी, सूत कातावे, एकंदरीत जनसंपर्क साधावा. कुठे स्वराज्य व कुठे सूतकताई! अगदी हाच विषादपूर्ण विचार काँग्रेसश्रेष्ठींच्या मनात आला. पण गांधीजी आपल्या निर्णयाला चिकटून राहिले.

१९२२ साली गांधीजींना सविनय कायदेभंगासाठी सहा वर्षांची शिक्षा झाली; व १९२४ साली अस्वास्थ्यामुळे सरकारने त्यांना सोडून दिले. बाहेर आल्यावर गांधीजींनी सूतकताई, हरिजन सेवा, हिंदू–मुस्लिम ऐक्य, हा कार्यक्रम देशासमोर ठेवला. आधीही हाच कार्यक्रम त्यांनी घेतला होता. पण तेव्हा त्यांनी स्वराज्यावर भर दिला होता व ही कलमे गौण होती. चौरीचौरानंतर ह्या कलमांना प्रामुख्य मिळाले. येवढेच नव्हे तर, स्वराज्याचे नावही गांधीजींनी काढले नाही.

हा सर्व कार्यक्रम non–political होता. ह्यातल्या कुठल्याही कार्यक्रमाला सरकारने विरोध करणे शक्य नव्हते. हिंदू–मुस्लिम ऐक्याला तर उलट सरकाला पाठिंबा देणेच भाग होते. ह्या कार्यक्रमामुळे अत्यावश्यक असलेल्या grass roots मधल्या कामाकडे लक्ष वेधले.

आतापर्यंतच्या आपल्या राजकारणाची हीच शोकान्तिका आहे. हे सर्व काम वरच्या ५% लोकांपुरते सीमित राहिले आहे. त्याचा पाया भक्कम व सर्वव्यापी झाला नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजींनी ह्या कामाची गरज ओळखली व खेड्यात चला असा संदेश दिला. आपल्या दुर्दैवाने आपण त्या द्रष्ट्या पुरुषाचा आदेश पाळला नाही. आजही खेड्यांतली जनता मुकीच आहे. तिला बोलकी करण्याचा एकच उपाय आहे–खेड्यात, शहरातल्या वस्त्यात जाऊन विधायक कार्य करण्याचा. कोण करणार हे कार्य?

अमर!

□

वसुधा धागमवार
धनबाद, बिहार
यांच्या लेखातील काही भाग


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# संस्कार

ग. प्र. प्रधान

भाऊसाहेब खांडेकर गेले आणि मराठी वाचकांची मने अनेक वर्षे उजळून टाकणारा दीप मालवला. त्यांचा मृत्यू अनपेक्षित नव्हता तरीही त्यांच्या निधनाची वार्ता ऐकताच मन अतिशय विषण्ण झाले.

खांडेकरांच्या साहित्याचे मूल्यमापन अनेकांनी आजवर केले आहे. पुढेही ते दीर्घ काल होत राहील. अशा समीक्षेत कितीही भिन्न भिन्न मते व्यक्त झाली तरी, एक गोष्ट सर्व टीकाकारांना मान्य करावी लागेल की, मराठी वाचकांच्या अभिरुचीला वळण लावणारा, त्यांच्या मनावर प्रभाव टाकणारा, खांडेकरांच्यासारखा लेखक गेल्या अर्ध-शतकात अन्य कोणी झाला नाही. माझ्या पिढीतील अनेकांच्या मनावरील खांडेकरांचा संस्कार आमच्या जीवनाला वळण देणारा ठरला. हे कसे घडले याचे हे वैयक्तिक निवेदन.

खांडेकरांनी लेखनाला सुरुवात जरी १९१९ पासून केली होती तरी त्यांचा प्रभाव तरुण मनांवर पडायला सुरुवात मात्र 'उल्का' आणि 'दोन ध्रुव' या कादंबऱ्यांपासून झाली. या दोन कादंबऱ्यांनी माझ्या मनाला किती विलक्षण अस्वस्थता आली हे जवळजवळ चाळीस वर्षांनी आजही मला आठवते. माझे भाऊसाहेबांशी जिव्हाळ्याचे नाते जडले ते या कादंबऱ्या वाचल्यापासून आणि त्यांनी मनात उठविलेले वादळ अद्यापही शांत झालेले नाही.

मी एका सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबात वाढत होतो. भोवतालची गरिबी मी थोडीफार पाहिली होती. काही वेळा मन कळवळले होते. पण याहून अधिक विचार मी केला नव्हता. भाऊसाहेबांच्या 'उल्का' आणि 'दोन ध्रुव' या कादंबऱ्या वाचल्यावर मात्र मी मनाने माझ्या घरातून बाहेरच पडलो. इतके दुःख भोवताली असताना मजेत राहण्याचा, चैन करण्याचा आपल्याला अधिकार नाही असे तीव्रतेने वाटू लागले. 'उल्के'तील चंद्रकांत या नायकाच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या धडपडीचे माझ्या मनाला विलक्षण आकर्षण वाटले. 'दोन ध्रुव'मध्ये भाऊसाहेबांनी त्याग आणि भोग यांची दोन जगे आहेत, हे सांगताना त्यागात सौंदर्य आहे आणि भोग हा कुरूप आहे हा जो विचार कथानक आणि विविध व्यक्तिरेखा यांच्याद्वारा व्यक्त केला आहे, त्यामुळे मी अगदी भारावून गेलो. या दोनही कादंबऱ्यांत आणि १९३६ ते १९३८ या कालात वाचलेल्या खांडेकरांच्या अनेक कथांमध्ये दारिद्र्यात पिचणारी, जी माणसे मला भेटली त्यांच्या दुःखांमुळे मी जितका व्यथित झालो त्यापेक्षा माणुसकीचा अंश टिकविण्याच्या त्यांच्या धडपडीने मी त्यांच्या अधिक जवळ गेलो. या धडपडीत त्यांना मदतीचा हात देणारे, त्यांच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे काही क्षण तरी यावे, यासाठी स्वतःच्या सुखाकडे पाठ फिरविणारे आणि ज्या समाजरचनेमुळे आणि पारतंत्र्यामुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत होते त्या रूढींविरुद्ध, सावकारीविरुद्ध आणि ब्रिटिश वा संस्थानी राजवटीविरुद्ध लढणारे, खांडेकरांचे नायक माझा आदर्श बनले. त्या नायकांचे अपयश हे व्यावहारिक यशापेक्षा कितीतरी उदात्त आहे अशी माझी मनोमन खात्री पटली आणि हेच माप आपण स्वीकारायचे, याच मार्गाने वाटचाल करायची असा विचार माझ्या मनात वळावू लागला. खरा शिक्षक जसा आपल्या विषयात रंगून जातो आणि त्याच्या तादात्म्यतेमुळे विद्यार्थीही त्या विषयात गुरफटले जातात तसे भाऊसाहेब खांडेकरांच्या कथा–कादंबऱ्यांतून घडले. स्वातंत्र्य आणि समता याबद्दलच्या भाऊसाहेबांच्या उत्कट भावना आणि प्रखर विचार त्यांच्या ललित साहित्यातून ज्या रीतीने व्यक्त झाले त्यामुळे त्या मूल्यांच्या लोह-चुंबकीय क्षेत्राकडे (Magnetic Field) मी आकृष्ट झालो. पुढे कॉलेजात गेल्यावर खांडेकरांच्या 'हिरवा चाफा', 'पांढरे ढग' या कादंबऱ्या आणि अनेक कथा मी वाचल्या आणि त्यामध्ये रेखाटलेल्या संघर्षात त्यांचे नायक जसे अन्यायाविरुद्ध झेप घेत तसे काहीतरी करावे असे तीव्रतेने वाटू लागले. 'पांढरे ढग' मी १९४० साली वाचली तेव्हा देशात स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण तापत चालले होते आणि मी हळूहळू त्या लढ्याकडे ओढला जात होतो. समाजवादी विचारांशी माझा परिचय होऊ लागला होता. मी अद्याप स्वप्नरम्य अवस्थेतच होतो. पण ही स्वप्ने सुखाची नव्हती. 'पांढरे ढग'मधील आमदवा तुरुंगवास माझ्या मनाला मोह पाडत होता. त्यागात सौंदर्य आहे, विलासी जीवन कुरूप आहे, या खांडेकरांच्या कथा–कादंबऱ्यांतील विचारसरणीमुळे माझ्या मनाचा पुरा कबजा घेतला होता. गरिबांच्या जीवनाशी एकरूप होऊन, त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यातच साफल्य लाभेल हा विचार दृढ होऊ लागला.

खांडेकरांच्या साहित्याप्रमाणेच त्यांनी स्वीकारलेल्या शिक्षकाच्या जीवनाचाही आम्हा अनेक मित्रांच्या मनावर प्रभाव पडलेला होता. आमच्यातील काही जण खेड्यात शिक्षक होण्याचे मनोरथ रचित होते. खांडेकरांनी सर्व सुखांकडे पाठ फिरवून शिरोड्यात अनेक वर्षे शिक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांच्या मनावर सतत ध्येय-वादाचा संस्कार केला या कृतीतील उदात्ततेमुळे माझे मन त्यांच्या-बद्दल आदराने भरून गेले होते. त्यांच्या एका कथेत मधुसूदन नावाचा एक विद्यार्थी तापात भ्रम झाला असताना, 'आई आली का?' या बरोबरच 'मास्तर आले का?' असे विचारतो आणि ते उद्गार ऐकल्यावर गावगुंडीमुळे शाळेवर आलेल्या आपत्तीला तोंड देताना उद्विग्न झालेल्या शिक्षकाच्या मनावरील अभ्रपटल दूर होते असा कथाभाग आहे. असे विद्यार्थी निर्माण करणारे शिक्षक आपण झाले पाहिजे असेही मला अनेकदा वाटे.

भाऊसाहेबांच्या विचारांनी प्रभावित झालेले, त्यांच्या साहित्यामुळे ज्यांच्या मनात ध्येयवादाची ज्योत पेटली असे आम्ही अनेक तरुण मित्र होतो. आम्ही वेगवेगळ्या राजकीय पक्षांत वा संघटनांच्यात गेलो. वेगवेगळ्या दिशांनी आमची आजवरची वाटचाल झाली. पण भाऊसाहेबांनी जो माणुसकीचा गहिवर आमच्या मनात निर्माण केला तो धागा मात्र सर्वांना जोडणारा होता. प्रत्यक्ष चळवळीत काम करायला लागल्यावर माझ्या मनातील स्वप्नरम्यता कमी झाली. पण माझ्या संस्कारक्षम वयात भाऊसाहेबांच्या वाङमयामुळे माझी मनोभूमी ज्या रीतीने नांगरली गेली त्यामुळेच स्वातंत्र्य व समता या मूल्यांची बीजे तेथे रुजली.

पुढे मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापन करू लागलो. शाळेत ज्याप्रमाणे शिक्षकाचा मुलांशी जवळून संबंध येतो तसा कॉलेजात येत नाही. पण तरीही आदर्श शिक्षक व्हावयाचे म्हणजे भाऊसाहेबांप्रमाणे विद्यार्थ्यांवर ध्येयवादाचे संस्कार करावयाचे असेच मला सतत वाटत असे. त्यात मी किती यशस्वी झालो हे सांगता येणार नाही पण भाऊंनी जी साहित्याची गोडी अनेक वाचकांच्या मनात निर्माण केली तशीच आवड माझ्या विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी यासाठी मी खूप प्रयत्न केले. भाऊसाहेबांचे त्यांच्या विद्यार्थ्यांशी जे जिव्हाळ्याचे नाते होते, सगळ्या विद्यार्थ्यांनी खूप वाचावे त्यांच्या मनाची क्षितीजे रुंद व्हावीत यासाठी त्यांनी जी अविश्रांत धडपड केली त्या आदर्शाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न माझ्या बरोबरच्या अनेक शिक्षकांनी व मी सतत केला. आमचे काही मित्र आम्हाला वेडे मानत. 'त्याग', 'ध्येयवाद' हे शब्द त्यांच्या दृष्टीने भाबडेपणाचे द्योतक होते. पण त्यांच्या टीकेने व हेटाळणीने खांडेकरांच्या शिरोड्यातील तपश्चर्येमुळे माझ्या मनात निर्माण झालेल्या चित्रातील रंग कधी फिकट वा धूसर झाले नाहीत.

भाऊसाहेबांची प्रत्यक्ष गाठ १९४८ साली कोल्हापूरला पडली. तेव्हांपासून त्यांनी माझ्यावर सतत लोभच केला. लेखक व वाचक म्हणून जुळलेले आमचे नाते जवळचे झाले आणि पुढे त्यांच्या आयुष्यात होऊन गेलेल्या एका प्रसंगाची पुनरावृत्ती माझ्या आयुष्यात झाली. १९३० साली शिरोड्याला मिठाचा सत्याग्रह झाला, तेव्हा खांडेकरांच्या मनात सत्याग्रहात भाग घेण्याची तीव्र उर्मी निर्माण झाली. पण त्यांनी सत्याग्रह केला असता तर शाळा बंद पडली असती म्हणून त्यांनी तो विचार रद्द केला. मात्र सत्याग्रहींवर अमानुष लाठिमार झाला तेव्हा भाऊंनी त्यांच्या जखमा बांधल्या, त्यांची सुश्रूषा केली. पुढे १९५५ साली मे महिन्यात गोवा मुक्तिसंग्रामातील सत्याग्रहाचे पर्व सुरू झाले. शिरुभाऊ लिमयांच्या तुकडीने सत्याग्रह केला तेव्हा जबर जखमी झालेल्या भाई वैद्य खरसाडे, गायकवाड आणि माझ्या मित्रांना भेटण्यासाठी मी सावंतवाडीस आलो व गोवा सरहद्दीवरील भागात काही दिवस राहिलो. सत्याग्रही जबर मारहाण सोसून भारतीय हद्दीत आल्यावर त्यांना दवाखान्यात नेणे हे एक काम होते. त्यावेळी मी अध्यापन व्यवसायात होतो. सत्याग्रहात भाग घ्यावा असे तीव्रतेने वाटत होते पण माझ्यावर घरची फार जबाबदारी होती. शिवाय मृत्यूच्या जबड्यात जाण्याचा धीरही होत नव्हता. या भावनेच्या कोलाहलामुळे माझे मन तडफडत होते. म्हणून मी मुद्दाम सवड काढून तेरेखोल या सरहद्दीच्या गावाजवळील शिरोड्यास गेलो. भाऊसाहेबांची शाळा पाहिली. घर पाहिले आणि विशेषत: भाऊसाहेब ज्या भिकेडोंगरीच्या खडकावर बसत ती जागा भक्तिभावाने पाहिली. या खडकावर भाऊसाहेब तासचे तास बसत. येथेच त्यांना अनेक कथा, कादंबऱ्या सुचल्या. या ठिकाणीच सागराच्या लाटांचा घनगंभीर आवाज ऐकताना म. गांधींच्या जीवनावरील 'सागरा अगस्ती आला' ही रुपककथा त्यांना स्फुरली.

१९३० साली सत्याग्रहात भाग न घेतल्यामुळे तडफडणाऱ्या त्यांच्या मनाला येथेच शांतता लाभली. त्या खडकावर मीही काही वेळ बसलो. गोवा मुक्तिसंग्रामात सत्याग्रह न केल्यामुळे अपराधित्वाच्या जाणिवेने व्याकुळ झालेल्या माझ्या मनाला भाऊंच्या आठवणीने आधार वाटला. माझ्या आवडत्या लेखकाच्या मनाच्या क्षितिजाशी माझे मन जुळले.

मी भाऊंना हे सांगितले तेव्हा ते म्हणाले, 'आज जरी तुला मनासारखे वागता आले नाही तरी, ही संधी पुन्हा येईलच. मात्र *त्यावेळी जीवनात स्थैर्य आणि स्वास्थ्य आलं म्हणून थांबू नकोस.'*

पुढे मी कॉलेजमधील नोकरी सोडून सर्व वेळ राजकीय काम करू लागल्यानंतर भाऊसाहेबांची भेट झाली तेव्हा ते म्हणाले, 'तुझ्या मनासारखं तुला पाऊल टाकता आलं. मला आनंद वाटला.' त्यांच्या शब्दाने मला दिलासा मिळाला.

१९३६ साली 'उल्का' आणि 'दोन ध्रुव' वाचून मी मनाने भाऊसाहेबांच्या बरोबर गेलो. गेली चाळीस वर्षे अल्पस्वल्प धडपड करताना त्यांचा मला सतत आधार वाटे. त्यांनी निर्माण केलेली मनाची अस्वस्थता अद्यापही कायम आहे. ही शिदोरी न संपणारी आहे. भाऊसाहेबांच्या यशाने मला सतत आनंद वाटे. त्यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले तेव्हा मला माझ्या अभिरुचीचाच गौरव झाला असे वाटले. त्यांना मी कारागृहातून लिहिलेल्या पत्राला त्यांचे आलेले उत्तर हीच आमची अखेरची भेट. हा ऋणानुबंध आता सरला. पण भाऊसाहेबांच्या साहित्याशी जुळलेला ऋणानुबंध माझ्या आयुष्याच्या अखेरपर्यंत राहील आणि मी कोठेही असलो तरी, मला भाऊसाहेबांच्या उल्का कादंबरीतील काव्यपंक्ती आठवतील :

'घरी एकच पणती मिणमिणती
म्हणू नको उचल चल लगबग ती.'

□

# आयफेल टॉवर कावळा सरदार वगैरे

शांताराम पारपिल्लेवार

पुणे येथील फ्रान्स मित्र मंडळाच्यावतीनें लेखक दीड–दोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी फ्रान्सला गेले होते. या वास्तव्यात त्यांना भेटलेल्या फ्रेंच माणसांची, त्यांनी पाहिलेल्या फ्रेंच जीवनाची ही ओळख. ओळखीतला तिसरा लेख ४ सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. हा चवथा.

## पॅरिस, आय लव्ह यू

गेले दोन दिवस मी पॅरिसमध्ये दोन गोष्टी शोधतोय. मला वाटलं की, त्या दोनही गोष्टी इथं दिसणार नाहीत. पण दोन्ही गोष्टी एकाच ठिकाणी दिसल्यात. आयफेल टॉवरच्या दुसऱ्या स्टेजवर पहिली दिसली अन् उतरून खाली आलो, तर कमानीखाली दुसरी दिसली.

पहिली म्हणजे आपला कावळा. कावळ्यावरून आमच्या ग्रूपमध्ये शर्यत लागली. आहे म्हणणारांचा एक पक्ष. नाही म्हणणारांचा दुसरा. सुधाकर शेट्टे म्हणाला होता—नसावा शांताराम, ह्या भागात कावळा.

जेव्हा मला कावळा दिसला, तेव्हा मी सुधाकरला शोधत होतो. तो सोबत आलाय. पण दिसेना. त्याच्यासोबत मॅडम सुशी आहे. तिचा नवराही आलाय. शेट्टेचा मुक्काम त्यांच्याकडे आहे. शेट्टेची मजा आहे. पॅरिसमध्ये पाय ठेवल्यापासून स्कॉच पितो आहे.

त्याला शोधीपर्यंत कावळा उडून गेला, तर मी खोटा पडणार आहे. कोलंबसला हिंदुस्थानचा भूभाग पाहून जेवढा आनंद झाला नसेल, तेवढा मला पॅरिसमध्ये कावळा पाहून झालाय. कावळ्याविषयी मला इतकं का वाटावं, हा एक संशोधनाचा विषय आहे. मागे पुढे कुणी संशोधन करतील त्यांच्या सोयीसाठी काही गोष्टी मी आताच सांगून ठेवतो. लता मंगेशकर, ज्ञानेश्वर, सत्यजित रे, पिएर पावलो पॅसोलिनी अन् आमचे दिवंगत तीर्थरूप इतकी मंडळी माझ्या कावळ्याच्या प्रेमासाठी जबाबदार आहेत. ज्ञानेश्वरांचे शब्द अन् लताबाईंचा आवाज— ' पैल तो गे काऊ कोकताहे ' इथं तो दूत आहे. सत्यजित रेचं चित्र ' चारूलता. ' त्यात सुरुवातीला कावळा दिसतो अन् चित्र संपतं तेव्हा कावळा उडून जातो. पुष्कळांना रेनी हे प्रतीक का वापरलं कळत नाही. पॅरिसमध्येच ला पागोडा सिनेमागृहात दिग्दर्शक पॅसोलिनीचं चित्र लागलं होतं. पॅसोलिनीविषयी माझ्या प्रतिक्रिया खूप तीव्र आहेत. एक तर तो प्रगतिशील विचारांचा. आधी तो कवी आहे, कादंबरीकार आहे आणि नंतर दिग्दर्शक. त्याचं चित्र पॅरिसमध्ये लागलं आहे हे ऐकून मला आनंद झाला. काही अति फॅसिस्टवादी लोकांना त्याचा विचार पसंत नव्हता. त्याचा काटा केव्हाचा काढायच्या मार्गास ते लागले होते. शेवटी इटलीतच त्याचा खून झाला. एका अल्पवयीन मुलाने त्याचा खून केला. त्याच्यावर भयंकर आणि भलतेसलते आरोप करण्यात आले. मनोवैज्ञानिकांच्या मते तो ' सिझोफ्रेनिक ' होता. काहींनी त्याला ' होमोसेक्युअल ' म्हटलं. इतक्या छोट्या वयात त्याचं जे काही कॉंट्रिब्युशन आहे ते साधंसुधं नाही. त्याचं जीवन जितकं वादातीत होतं तितकाच त्याचा मृत्यू गूढ आहे. त्याचं एक चित्र ' मामा रोमा ' खूप गाजलंय. फादर डिलाहूथ मला सांगत होते—ही इज कॉन्ट्रोव्हर्शिअल इन् एक्झिस्टन्स अँण्ड लिजेंड इन् हिज डेथ. मामा रोमा इज डेपिक्शन ऑफ डिके ऑफ ह्यूमन व्हॅल्यूज इन् एज ओल्ड रोम. त्याच्या मृत्यूनं मी हळहळलो होतो. खूप काही त्याच्यापासून अपेक्षित असतानाच एकाएकी त्याचा निर्घृण खून करण्यात आला. त्याच्या कर्तृत्वाला मूठमाती मिळाली. त्याचा सिनेमा ' UCCELLACI UCCELLINI ' ला पॅगोडात चालू होता. मी फादर डिलाहूथच्या मागे लागलो होतो. सिनेमा पाहायचा. त्यांनी कालच तर तो दाखवला. बाप आणि मुलगा अन त्यांचा थ्रू सोशियल कामेंटरी. सगळा सिनेमा एखाद्या न्यूज–रिव्ह्यूसारखा. बाप आणि मुलाचा संवाद. पाठोपाठ कावळा. सावलीसारखा त्यांच्या अस्तित्वाला चिकटून. जिथे ते जातील तिथे तो आहेच. फेंगडत फेंगडत त्यांच्या मागे मागे चालणारा. सिनेमात शेवटी ते त्याला मारून टाकतात अन् जाळून टाकतात. मी फादर डिलाहूथना विचारतो, ' मला भाषेची अडचण. त्यात वापरलेल्या प्रतीकाचा अर्थही कळेनासा झालाय. '

' —कावळा दिग्दर्शकानं कॉन्शन्सकरता वापरलाय असं मला वाटतं. कॉन्शन्स जागृत असेपर्यंत आपण कोणतंच वाईट कृत्य करीत नाही. कॉन्शन्स मारल्यानंतरच जगावेगळ्या गोष्टी करता येतात. मॉरल्स डोळ्याआड करता येतात. त्यातला मुलगा, कावळा जिवंत असेपर्यंत काही करूच शकत नाही. एक मुलगी लिफ्टसाठी सडकेवर सूटकेस ठेवून बसलेली असते. कावळ्याला मारल्यानंतर तो परत येतो. तिला शेतात नेऊन तिला भोगतो. परत जाऊन बापाशी संवाद. मुलगी ब्लाऊजची बटणं लावीत परत सडकेवर येते. लिफ्टची वाट पाहत. कावळ्याच्या प्रतीकाचा पॅसोलिनीनं असा उपयोग केलाय.

आपल्या संस्कृतीत तर कावळा जन्मजन्मांतराशी निगडित. पिंडाला शिवल्याशिवाय आत्मा मुक्त होत नाही. मला आठवतं, आमचे तीर्थरूप दिवंगत झाले. अंतिम संस्कार झाला. अग्नी दिला. राख गोळा करायला आम्ही गेलो. जाताना मृतात्म्यासाठी शिजवलेलं त्यांच्या आवडीचं अन्न न्यावं लागतं. त्यांना कोंबडी आवडायची. भात, वरण, कोंबडी एका छोट्या गाडग्यात

शिजवून नेलं. एका पत्रावळीत वाढून ठेवलं. पाणी ठेवलं. पण कावळा काही येईना. त्यांच्या राखेपुढे त्यांचं अन्न ठेवून कितीतरी वेळ बसलो. कावळ्याचा पत्ता नाही. नातलग मंडळी विड्या ओढीत बसली. कावळ्याला शिव्या देत राहिली. मग तीर्थरूपांचे एक जुने मित्र आले. वयानं ते वाकले होते. माझ्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले, 'पोरा, थोडं चुकलं आपलं.'

'—काय ?' मी विचारलं. मला कळेना, तीर्थरूप असे रुष्ट का झाले. आम्ही सारी मंडळी त्यांना अण्णा म्हणायचो. ते म्हणाले,

'—अण्णांच्या आवडीची एक वस्तू तर आणलीच नाही ?'

'सांगा तर कोणती ? त्यांच्या आवडीचं सारं अन्न तर आणलं ?'

'अं हं ! त्यांना अधूनमधून थोडं मद्य घ्यायची सवय होती. मद्य ठेवल्याशिवाय ते यायचे नाहीत.'

मी दहाची नोट देऊन एकाला पाठवलं. त्यानं मद्य आणलं. एका कपात थोडं ठेवलं. थोडं त्यांच्या जिवंत मित्राला दिलं. जिवंतपणी प्यायला.

माझे डोळे आकाशाकडे लागले.

अन् खरंच एक कावळा आकाशाच्या पोकळीत काळ्या ठिपक्यासारखा दिसायला लागला. नेमका बाजूच्या झाडाच्या फांदीवर येऊन बसला. आम्ही सारे बाजूला झालो. तो उतरला. दुडक्या चालीनं चालत चालत अन्न ठेवल होतं तिथंवर आला. त्यानं चोच भातात खुपसली. म्हातारे गृहस्थ खूष झाले. ओरडले, 'चला, राख उचला.'

तर कावळ्याशी मी असा निगडित.

आयफेल टॉवरवर कावळा पाहून मला झालेला आनंद मला कुणाला तरी सांगायचा होता. कावळ्याच्या दर्शनात माझा विजयोन्माद होता. अन् नेमका सुधाकर अशा वेळी जवळ नव्हता. मी आर्किमिडिजसारखा उतावळा झालो होतो. फरक इतकाच की, कपड्यांचे भान मला होते. आर्किमिडिजला नव्हते. शेवटी एकदाचा तो दिसतो. मॅडम सुझान रेलिंगवर उभ्या सुधाकराचा फोटो घेत आहेत.

'सुधाकर, सापडला' मी ओरडतोच.

मॅडम सुझान, तिचा नवरा, आजूबाजूची मंडळी, अन् प्रत्यक्ष सुधाकर माझ्या तोंडाकडे जगातला वेगळा प्राणी पहावं तसे पाहत आहेत. मला पाहून सुधाकर माझी ओळख मॅडम सुझानशी, तिच्या नवऱ्याशी करून देतो. पुन्हा हात मिळवणे...बोन्स्वा...सारे शिष्टाचार होतात. माझ्या परिचयात शेट्टे पुस्ती जोडतो, 'ही रीडस् पाम...'

'इज इट ?' मॅडम सुझान आश्चर्योद्‌गार काढते. बरं तिला इंग्रजी येतं.

मला भयंकर काही तरी सांगायचं असतं अन् मला कुणीच बोलू देत नाही. सुधाकरनं तरी माझ्याकडे लक्ष द्यावं असं वाटतं. ती विचारते, 'मग माझा हात कधी पाहणार ? माझ्या नवऱ्याचाही बघ की ?'

'ही योग्य जागा नाही' असं मी म्हणतो, 'इतक्या लोकांच्या पुढं हात पाहणं बरं दिसणार नाही.'

'ओ. के....ओ. के....' ती म्हणते. तिनं बंद गळ्याचा फ्रॉक घातला आहे. फारसा मेकअप नाही. अगदी साधी वाटते. डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळं आहेत. चेहरा उतरल्यासारखा आहे. त्यात लस्टर दिसत नाही. तिनं केस कापलेले आहेत. नवरा मात्र स्मार्ट आहे. फुगीर गाल. त्यानं सूट घातलाय्. टायपण बांधला आहे. एरव्ही पॅरिसमधली तरुण मंडळी कपडे, राहणी, केस याबाबतीत पर्टिक्युलर नसतात. बघावं तर जीन्स, जॅकेट... केस विखुरलेले, दाढी वाढलेली असा बहुतेकांचा वेष. तिचा नवरा मात्र त्या साऱ्यांत उठून दिसणारा दणकट. केसांची ठेवण जपलेली. इतरांच्या मानानं त्याचे दात स्वच्छ आहेत. ती, सुधाकर माझ्याविषयी काय म्हणतो, त्याला सांगते. त्याला फक्त फ्रेंच येते. इंग्रजी अजिबात येत नाही.

सुझान पुढं म्हणते, 'मी मागच्या वर्षी भारतात आले होते. गणेशपुरीला जाऊन आले. आम्ही दोघंही मुक्तानंदांचे शिष्य आहोत.'

त्यांच्याकडे पाहायची माझी नजर एकदमच बदलते. तिच्याकडूनच कळतं पॅरिसला मुक्तानंदांचा शिष्यसंप्रदाय आहे. ते सध्या अमेरिकेला आहेत. जूनच्या अखेरपर्यंत पॅरिसला यायचे आहेत.

मला भीती वाटते, आयफेल टॉवरवर आलेला कावळा कुठं उडून गेला तर पंचाईत. मी खोटा पडणार.

तिचा नवरा त्याचा उजवा हात माझ्यापुढं करतो. मनात नसतानाही त्याचा तळवा मला हातात घ्यावा लागतो. मी एक नजर त्याच्या तळव्याकडे अन् एक नजर आयफेल टॉवरच्या दुसऱ्या स्टेजवरून खाली टाकतो. प्रदर्शनात ठेवल्यासारखी घरं, सडका, मोटारी दिसतात. इवली इवली. रस्ते कसे सरळ एका रेषेत. बाण धनुष्यातून सोडल्यासारखे. पुढच्या बाजूला भन्नाट कारंजा. वर पाहतो. आकाशात सुळक्यासारखा खुपसला गेलेला वरचा भाग. येणारी जाणारी बरीच मंडळी माझ्याकडे वेगळ्या नजरेनं पाहायला लागतात. कारण त्याचा हात माझ्या हातात असतो. सुटका नाहीच. काही तरी सांगायलाच पाहिजे. 'यू हॅव्ह ए हॅपी मॅरीड लाईफ' मी सांगतो. बायको नवऱ्याला चिमटा काढून मी काय म्हणतो ते सांगते. तो गढूळ गढूळ




हसतो. यैस् यैस् म्हणतो. मी पुढं सांगतो;
'यू ऑर डॉमिनेटेड बाय युवर वाईफ. तू आता नोकरी करतो आहेस ती तू सोडणार. स्वतंत्र धंदा करशील. पण तुझ्यात एक कमी आहे. तू जितका पाहिजे तितका महत्त्वाकांक्षी नाहीस.'

मी जे जे सांगतो त्यावर तो नुसती मान डोलावीत असतो.

'युवर पेरेंटस् वेअर पुअर'

माझ्या अगाध ज्ञानाची तिला प्रचिती आल्यासारखं.वाटतं. माझी मलाच कीव येते. मला खरं तर फारसं समजत नाही. पण थोडसं जुजबी समजतं. माझा अभ्यास तसा नाही. पण दहा माणसांचे हात पाहून अकराव्याचा अंदाज येतो. लोकांना वाटतं मी निष्णात हस्तसामुद्रिक आहे. माझा स्वतःचाच हातांच्या रेषांवर विश्वास नाही. माझाच हात पाहून एका पंडितानं सांगितलं होतं 'आपको फॉरेन जानेका चानस् बिलकूल नही है.' तरी मी फ्रान्सला येऊन ठेपलो होतो.

सुझान विचारते, 'तू काय पामिस्ट्रीचा अभ्यास केला का?'

मी म्हणतो, 'नाही आय टेल ह्युमन इंस्टिंक्ट'

'इट इज ए गॉडली गिफ्ट' ती म्हणते.

ते एक देवच जाणे. मी तर कधी देवही जाणायचा प्रयत्न केला नाही. सुधाकरकडे पाहून मी चिडतो. कोणत्या धर्मसंकटात टाकलंय् त्यानं मला? 'इन जनरल, यू हॅव्ह हॅम्ड गॉट हॅन्ड ऑफ ए हॅपी मॅन,' म्हणून मी त्याचा हात माझ्या हातातून सोडवतो. सुझान म्हणते, 'माझा हात केव्हा बघणार?'

'आयफेल टॉवरच्या खाली निवांत बसून तुझा हात पाहीन्'–मी

सुधाकर विचारतो, 'मॅडम, ह्या टॉवरची उंची किती?'

'मला वाटतं तीनेकशे मीटर आहे. पॅरिस शहराचं आज सिम्बॉल ठरणारा हा टॉवर तोडायचा होता हे कुणाला सांगितलं तरी खरं वाटणार नाही.'

'का?'–सुधाकर.

'इफेल नावाच्या इंजिनिअरचं स्वप्न होतं. तो म्हणायचा मी फ्रान्सला राष्ट्रध्वज लावायला सगळ्यात मोठा खांब देणार आहे. तेवढ्या उंचीची जगात एकही वास्तू राहणार नाही. आधुनिक तंत्रविज्ञानाची प्रगती ह्या टॉवरच्या उभारण्यानं जगाला ज्ञात होईल.'

मी काळजीत आहे. माझा कावळा?

'जवळ जवळ ९० वर्षांपूर्वी एका औद्योगिक प्रदर्शनात विज्ञानाची महती विशद करायला म्हणून हा टॉवर उभारण्यात आला,' सुझान सांगते, 'प्रदर्शनाची समाप्ती झाली. हा टॉवर पाडायचं ठरलं, अन् किती तरी लेखक, कलावंत पुढं आले! इतिहासात कुणाचे प्राण वाचवायचे तर ही मंडळी पीटिशनवर सह्या करतात असं पाहण्यात येतं. पण एका निष्प्राण लोखंडी टॉवरला टिकवून ठेवण्यात यावं म्हणून कोण कोण आवाज उठवू लागले! विश्वास बसणार नाही. एलेक्झांडर ड्युमा, गाय दी मोपासाँ, अपोलोनियर, कॅक्टाफ, पीसॅरो, डफी, आणखी कितीतरी. आज जगभरचे प्रवासी नुसता हा टॉवर पाहायला येतात.'

मी टॉवरवरची गर्दी बघतो. कुठून कुठून प्रवासी येताहेत! मुलं, म्हातारी, तरुण, काळी, गोरी, उंच, ठेंगू...सगळ्यांचे डोळे त्यांच्या कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये गाडलेले. किती कॅंगलनं ते टॉवर पाहात आहेत. मला वाईट एकच वाटतं. नेमकं इथं आलो अन् माझ्या कॅमेरातला रोल संपलाय्. खाली विचारलं तर दुकानदार म्हणाला होता–वर दुकान आहे. रोल तिथं मिळतो. पहिल्या स्टेजवरच्या दुकानात विचारलं तर तो म्हणाला–वर मिळेल. वरचा दुकानदार म्हणाला खाली मिळेल. कॅमेऱ्यात फिल्म असती तर मी कावळ्यावर कॅमेरा फोकस केला असता. टॉवरच्या स्टील फ्रेमवर बसलेला कावळा. त्याला मी इम्मॉर्टल करून टाकलं असतं. पॅरिस शहराचं आकर्षण ठरणारा टॉवर माझ्यासाठी तितक्या महत्त्वाचा नव्हता जितका की तो कावळा! कुणास ठाऊक आता तो तिथं आहे की नाही?

मी, सुझान अन् तिच्या नवऱ्याची माफी मागतो. सुधाकरला गडकऱ्यांनी दारूच्या पेल्यांकडे न्यावं तसंच मी ह्या सुधाकराला कावळ्याकडे नेतो. त्याला मी ओढून नेतो पाहून त्यालाही आश्चर्य वाटतं.

–नेतोस तरी कुठं?

–चल तुला एक गंमत दाखवायची आहे.

–टॉवरवर कुणी किस घेतोय् का? कॉमन गोष्टी रे, ह्या इथं?

–नाही बाबा, तुला पॅरीसमधलं आश्चर्य दाखवायचं आहे.

–अरे, हे हजार फुटांचं ऐश्वर्य साक्षात उभं असताना, दुसरं आश्चर्य असणार तरी काय?

मी त्याला त्या जागी नेतो. तिथं आता काहीच नसतं. सांगूनही त्याला खरं वाटणार नसं. नाही म्हणायला एक जोडपं तिथं कोपऱ्यात एक दुसऱ्यात गुंतून असतं. साऱ्या वातावरणाला, आसमंताला अन् गर्दीला विसरून तिच्या हातांचा विळखा त्याच्या शरीरांवर असतो अन् त्याची काया तिच्यावर झुकलेली असते. तिच्या शरीराचा धनुष्याकृती आकार त्यानं हातानं सावरलेला असतो. त्याचे ओठ तिच्या ओठावर टेकलेले असतात.

धुत्कारल्यासारखा सुधाकर म्हणतो,


**पॅपिलॉन पॅपिलॉन**

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

'कमाल झाली बुवा, शांताराम तुझी ? अरे आल्यापासून जिथं बघावं तिथं सकाळ संध्याकाळ हेच बघतो आहोत की इथं ! जिथं जावं तिथं ह्यांचं चिमणाचिमणीसारखं चोचीत चोच टाकणं सुरूच असतं.'

शस्त्र टाकून पराजित योद्धयानं उभं राहावं तसा मी मूग गिळून चुप असतो. सुधाकर मला सोडून सुझानकडे जायलाही लागतो.

'कमॉन लेटस् गो डाऊन.' सुझानचा आवाज मला बोलावीत असतो.

*आम्ही पायऱ्या उतरून खाली जात* असतो. सुझान माहिती देते. 'म्हणतात की हा टॉवर दिवसेंदिवस झुकत चालला आहे, पण एक्स्पर्ट इंजिनियरांचं मत आहे– त्यामुळे काहीही बिघडत नाही.'

मी मनोमन म्हणतो– बिघडत कसं नाही ? कावळचानं फसवलं ना ?

'यू लूक सो वरीड, मिस्टर शांताराम, सुझान विचारते.

'नो. नॉट अॅट ऑल !' मी सावरायचा प्रयत्न करतो.

'ही इज डिस्टर्बड् बिकॉज ही सॉ लव्हर्स किसिंग इन् कॉर्नर.'

सुधाकर माझी फिरकी घेतो. मला त्याची कीव कराविशी वाटते.

सुझान बऱ्याच वेळानंतर मनमोकळी हसते. नवऱ्याला फ्रेंचमध्ये सुधाकर काय म्हणतो ते सांगते. त्याचा हात तिच्या कंबरे-भोवती असतो. ती आणखीनच त्याला भिडते. तसं वाटतं. जायचा मार्ग निरुंद आहे.

कमानीखाली बरीच गर्दी दिसते. लिफ्टनं जाणारांचा मोठा क्यू असतो.

खाली येतो तो सुधाकर किंचाळतो.

आश्चर्य पाहिलंस का ?

मला वाटतं तो पुन: माझी फिरकी घेणार. मी बघतच नाही. तो पुन्हा म्हणतो, 'अरे, बघ काय ते ?'

मला वाटतं आता त्याला कावळा दिसला असणार.

'पाहिलंस ?' तो पुन: विचारतो,

मी पाहतो तिथं एक सरदारजी एका मॅडमचा फोटो घेत असतो.

दुसरी गोष्ट जी पॅरिसमध्ये आम्ही शोधत होतो ती ही–

आता मी हंसू लागतो.

मुंबई सोडताना हरभजनसिंग भेटला होता. गंमत म्हणून म्हणालो होतो– 'सरदार पॅरिसमध्ये भेटायचा नाही.'

'कुठंही जा. उत्तर ध्रुवावर जरी गेलास तरी सरदारजी 'सत् श्री अकाल'ची गर्जना देत तुला भेटणार.' त्याचा आत्मविश्वास शब्दात व्यक्त झाला होता.

अन् खरंच सरदारजी दिसतो. चांगला तरुण आहे धट्टाकट्टा–

आम्ही दोघंही पुढं होतो. दाढीला फिक्सो. *करड्या रंगाची पगडी, अंगावर सूट, टाय.* मॅडम झग्यात आहे. तिनं पांढरी हॅट घात-लीय्. उंच टाचेचे बूट.. डोळचाच्या वरच्या पापण्या हिरव्या रंगल्यात. केस मानेपर्यंत कापलेले. खांद्यावर पांढऱ्या नरम केसांचा कोट.

त्याला पाहून म्हणतो, 'सत् श्री अका-लजी, इंडियासे आये क्या ?'

'हाँ जी ! तुस्सी बाश्शावो ऽ ?'

'हाँ, हाँ, इंडियासे आये'

तो आपला कॅमेरा माझ्या हातात देतो. म्हणतो, 'मारी तसबीर खींचो, प्लीज.'

मी डोळा लेन्समध्ये बुडवतो. तिथूनच बघतो. सोबत मॉडेल झकास आहे. वाटतं, सरदारनं इथूनच किरायानंतर आणलं नाही ना ? पांढऱ्या हॅटमध्ये ती कॅटी मिर्झाच दिसते आहे. झग्याचा गळाही वरचं अंग झाकण्यापेक्षा उघड दाखवीत आहे. वक्षावरची कबुतरं उडायला आतुर. मी म्हणतो, रेडी ?

तेवढचात सरदार तिला आणखी जवळ ओढतो. तिच्या गळचात हात टाकतो. मी क्लिक् करतो.

''थेंक् यू सो मच !' म्हणत तो कॅमेरा घेतो. हात मिळवतो. सुधाकर मला डोळा घालतो.

'मॅडम फ्रेंच है क्या ?' मी'

'णही जी ?' सरदारजी म्हणतो.

'सरदारजी ये माल तो यहीं का लगता है ?' सुधाकर.

'इंडिजिनीयस् है जी. मेड इन इंडिया.' सरदार खूपच मोकळा आहे. पोटभर हसतो. तिच्याकडे पाहून म्हणतो. 'है ना डार्लिंग ?.'

ती मनमोकळी हसते. डोळचांनीच त्याला इशारा करते.

सुझान अन् तिचा नवरा आमच्याजवळ आलेले असतात.

सरदार अन् त्याची प्रिया दूर जाताना दिसतात.

'यू नो देम ?.' सुझान विचारते.

'दे आर फ्रॉम इंडिया' मी सांगतो.

'मे..बी...'

लांबूनच मारी थेरेस येताना दिसते. तिनं प्रॉमिस दिलं असतं. बरोबर पांचला आयफेल टॉवरला येईन. लिफ्टजवळ वाट पाहीन. इथून पुढं ती मला तिच्या कारमधे लिफ्ट देणार असते.

'कमॉन, शांताराम. तू टॉवर पाहिलास ना ?'

'हो की ?'

'डिड यू लाईक इट ?'

फ्रेंच शिष्टाचारातलं हे वापरातलं वाक्य. प्रत्येक कृतीची, भेटीची, ठिकाणं पाहिल्याची त्यांना पावती हवी असते. त्यामुळं साहजिकच जवळीक निर्माण होते.

सुधाकर सुझान् अन् तिच्या नवऱ्यासोबत माझा निरोप घेऊन निघून जातो. ह्या गर्दीत सुझानचा हात पाहता आला नाही. तिला वाईट तर वाटणार नाही ? आपलं मलाच वाटतं. मी स्वत:ला समजावतो. आणखी कधी पुढच्या भेटीत पाहू.

'–व्हॉट ऑल यू सॉ टुडे ?'– मारी थेरेस विचारते.

'–आय सॉ मेनी थिंग्ज. बर्ड ऑन ए टॉवर अॅन्ड बिअर्ड बिलो.'

तिच्या डोळचात प्रश्नार्थक चिन्ह आहेत. समुद्राच्या रंगाचे डोळे निळेनिळे. जीन आणि टी शर्ट असा तिचा वेश. केस मानेपर्यंत काप-लेले. लिपस्टिक हलक्या रंगाचं तिनं लावलं आहे. इतर फारसा मेकअप नाही. गाल थोडे वर आलेले कातडी गोरी, चमकणारी. चेह-ऱ्यात वयाची झाक आहे.

फादर डिलाहूथकडे असल्यामुळं तिला माझी खूप कीव येते. तिला वाटत राहतं, पॅरिसमधे मी कुठे मिसप्लेस तर झालो नाही ? ती आपणहून माझी चौकशी करते. *मला कुठेकुठे फिरायला नेते. मी तिच्यासोबत* चालायला लागतो. तिच्या कारकडे.

[ क्रमश: ]

# सोलकढी

## शिवाजी मंदिर : एक स्वयंभू स्थान

महानगरी मुंबईत दादर नामे एक अति रम्य उपनगरी आहे. मध्य आणि पश्चिम अशा दोन्ही रेल्वेची दादर–स्थानके, टिळक पूल, रानडे – गोखले – केळकर – सावरकर पथ, प्लाझा आणि कोहिनूर ही चित्रपटगृहे, कोतवाल बाग आणि नारळीची बाग, चौपाटी, शिवाजी पार्क, छबिलदास लल्लूभाई मुलांची आणि मुलींची शाळा, राजा शिवाजी विद्यालय, बालमोहन विद्यामंदिर, उज्ज्वल आणि पिंगेज क्लासेस, पोर्तुगीज चर्च आणि पोलिसांचा मारुती, आयडियल बुक डेपो, मामा काणे यांचे उपाहारगृह, दुर्गाश्रम, शुश्रूषा, महात्मा गांधी पोहोण्याचा तलाव, सोनापूर, सेनापती बापटांचा पुतळा, सौराष्ट्र फरसाण मार्ट, बेडेकर मसाल्याचे दुकान अशी रम्य स्थळे आणि माधव मनोहर, धोंडो विठ्ठल देशपांडे, श्री. ना. पेंडसे, जयवंत दळवी, कमलाकर नाडकर्णी, सी. रामचंद्र, गजानन जहागिरदार, पां. वा. गाडगीळ, श्री. शं. नवरे, सुधीर फडके, यशवंत देव, द. पां. खांबेटे, प्रभाकर पणशीकर, विद्याधर गोखले, माणिक वर्मा, प्रकाश मोहाडीकर, विजय मांजरेकर, अजित लक्ष्मण वाडेकर अशी रम्यरम्य माणसे यांनी दादर ही उपनगरी कशी रम्यरम्यरम्य होऊन राहिली होती. त्यात गेल्या काही वर्षांत, उद्यान–गणेश, स्काऊट पॅव्हेलिअन, हॉटेल पार्क वे, नवे मार्केट, गडकरी पुतळा, सेना भवन, शिवाजीचा अश्वारूढ पुतळा, ज्ञानेश्वर मंदिर इत्यादींची भर पडली आणि दादरचे रम्यपण सोळा कलांनी खुलले. आणि हेसुद्धा पुरेसे नव्हते म्हणून दादरच्या रम्यपणाची सतरावी कलाच जणू असे शिवाजी मंदिर डौलात उभे राहिले.

शिवाजी मंदिर हे एक स्वयंभू स्थान आहे. नाटकवाल्यांचा–ची–चे आळंदीपंढरीपैठणदेहूसज्जनगड तो हाच–हीच–हेच ! शिवाजी मंदिराइतका मान दुसऱ्या कोणत्याही थिएटराला नाही. त्यामुळे या मंदिराच्या आसपास नाटककार, नट, निर्माते, दिग्दर्शक, नेपथ्यकार, दिवाबत्तीवाले, रंगभूषाकार, ठेकेदार, चहावाले इतकेच काय समीक्षकसुद्धा, भाविकपणे घोंघावत असतात. कधी कोण दिसेल हे सांगता येत नाही. नाटकवाली मंडळी मला फार्फार आवडतात. त्यांचे ते चालणे, ते उभे राहणे, ते बोलणे, ते हसणे, ते चहा पिणे, ते सिगरेट ओढणे, ते पान खाणे, ते थुंकणे, ते स्वतःला निरखणे, ते आजूबाजूला पाहणे, ते न पाहणे, ते कोणी आहो असे दाखवण्यासाठी कोणी नाही असे दिसवणे–सगळे कसे अगदी अहाहावाव्वा असते. ते पाहण्यासाठी, प्रसंगी मी वाट वाकडी करूनसुद्धा, शिवाजी मंदिरावरून जातो.

परवा असाच जात होतो. इतक्यात मंदिराच्या दारात एक वेगळीच पाटी दिसली. ती 'प्रयोग हाऊसफुल्ल. रसिकांचे आभार'ची पाटी नव्हती; वीजकपातीची सूचना देणारी पाटी नव्हती; दुखवटयाचीही नव्हती. तांत्रिक दुरुस्ती, रंगरंगोटी, एकूण ठाकठीक यासाठी शिवाजी मंदिर चार–सहा दिवस बंद राहील, असे सांगणारी ती पाटी होती.

ती पाटी पाहून मला धक्काच बसला. पाठोपाठ कर्तव्यदक्षतेने मी संतापलो. तळपायीची आग मस्तकात घातली. पुढे होऊन पाटीवर रंगवलेला तो मजकूर थुंकी लावून पुसून टाकायचीही धडपड केली. माझ्यासारख्या शिवाजी मंदिराच्या श्रद्धाळू प्रेक्षकाला ती पाटी अत्यंत बदनामीकारक वाटली. पण ती पाटी आपली भडक अक्षरे विचकत माझ्याकडे पाहून कुजकट हसत होती. अशा वेळी कोणत्याही सुविहित चित्रपटात पडद्यावर तरंगमालिका उमटून तिच्यातून स्मरणदृश्य साकार होते तसे काहीतरी झाले, आणि माझ्या डोळ्यांसमोर शिवाजी मंदिर अंतर्बाह्य उभे ठाकले.

काय ते त्याचे भव्य, देखणे, आलिशान, नेत्रदीपक रूप ! मुख्य प्रवेशद्वारातून आत आल्यावर उजवीकडे भिंतीवर नाटयप्रयोगांच्या घोषणांच्या पाटयांची रांग व त्यांना मागे घेऊन बसलेल्या आगाऊ तिकिटविक्रीवाल्यांची रांग आणि डावीकडे वजनाचा काटा, सचित्र जाहिराती, गादीवाल्यांचे व तपकिरीचे दुकान; त्यापुढे उपप्रवेशद्वार. वर चाललेला नाटयप्रयोग उरकलेला नसेल, तर प्रवेशद्वारापासून उपप्रवेशद्वारापर्यंतच्या विस्तृत जागेत मराठी रंगभूमीचे मायबाप रसिकप्रेक्षक पाटयांवरचे शुद्धलेखन सामुदायिकरीत्या आणि वारंवार तपासू शकतात किंवा समोरच्या पायपथावरून आणि न. चिं. केळकर पथावरून वाहणारी माणसे व वाहने यथेच्छ न्याहाळू शकतात. या नेहमीच्या समयसारक करमणुकीचाही समजा कंटाळा आला, तर ते मरंमा रसिकप्रेक्षक आपले वजन अजमावू शकतात किंवा गाद्या–उशा–लोड–तक्क्यांची ऑर्डर देऊ शकतात किंवा मंगळूरी सुगंधी तपकीर आपल्या आणि इतरांच्या नाकांनी ओढून फटाफट शिंकांच्या लवंगी लडी लावू शकतात. तोपर्यंत वरचा नाटयप्रयोग उरकतोच. मग बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकभगिनीबांधवांच्या घुसळत्या लाटा एकदाच्या ओहोटल्या की, उपप्रवेशद्वारापासून प्रेक्षागृहापर्यंत घातलेल्या पांगाऱ्याच्या फुलांच्या रंगाच्या गाजमजालिच्यावरून झोकात आत जाता येते. जिन्याच्या उजव्या बाजूला पुन्हा जाहिरातचित्रे आणि आपले व अनापले प्रतिबिंब दाखवणारा अवढ आरसा. प्रेक्षागृहाबाहेरच्या बंदिस्त ओवरीसारख्या जागेत, नाटक सुरू होण्यापूर्वी वा मध्यंतरात, हवेतेवढे खाते – पिते – बघते–पानचघळते–सिगरेटओढते – पायमोकळेकरते प्रेक्षक, कोपऱ्यातल्या शिवाजीच्या, पिकदाण्या–रक्षापात्रांच्या, आरशा–बैठकांच्या साक्षीने आरामात विहार करू शकतात. वरच्या मजल्यावरच्या गॅलरीबाहेर असलेल्या जागेत चहाकॉफीसोडालेमनकोकाकोला मिळायची रम्य सोय आहे. तिथे उसळणारी गर्दी पाहिली की, पहिल्या मध्यंतरात मागितलेले पेय दुसऱ्या मध्यंतरात तरी मिळेल की नाही, अशी शंका मुंबईबाहेरच्या प्रेक्षकाला हटकून येते. पण सरावलेला मुंबईकर प्रेक्षक ज्या मध्यंतरात पेय मागतो त्याच मध्यंतरात ते पितो हे मी स्वतः लक्ष [illegible] वेळा पाहिले–अनुभवले आहे. लघवी करण्याची आणि पाणी पिण्याची इथली सोयही मोठी उत्साहवर्धक आहे.

मुख्य प्रेक्षागृह चांगले ऐसपैसलांब रुंद. शेव-

टच्या काही रांगांत वा गॅलरीत बसलेल्या मराठी रंगभूमीच्या *मायबाप* प्रेक्षकांना नट डावा हात हलवतो आहे की उजवा, की दोन्ही हे अगदी स्पष्ट दिसते. ऐकू तर इतके मोठ्याने येते की, ते सुखदरीत्या बोथट करण्यासाठी प्रसंगी कानात कापसाचे बोळे घालावे लागतात. आता बोला. प्रेक्षागृहाच्या दोन्ही बाजूंच्या सीमेवरच्या काही खुर्च्यांना ( यांनाच आसन–आसने असे म्हणतात. ) नाटकाचे मजेदार तिरकस दर्शन घडते. तिकिटाच्या दरावरून आसनाची कल्पना करणाऱ्या प्रेक्षकाला कधी कधी गोड धक्का बसू शकतो. माझीच गोष्ट सांगतो. कोणाला तरी सांगून माझ्यासाठी मी साडेसात रुपये दराचे एक तिकीट राखून ठेवले. मला वाटले, विसाबा विसाव्या रांगेत आसन असेल आपले; पण ते चक्क सतराव्या रांगेत ( देवाशपथ खरं सांगेन; खोटं सांगणार नाही. ) होते. त्यामुळे मला एवढा गोड गोड गोड धक्का बसला की नाटकाकडे माझे लक्षच लागेना. पण शिवाजी मंदिरावर आणि मराठी रंगभूमीवर माझी एवढी भावभक्ती की साडेसात रुपये दराचे बाविसाव्या रांगेतील एक तिकीट काढून ते नाटक मी लक्षपूर्वक पुन्हा पाहिले. ज्याचे मराठी रंगभूमीवर खरेखुरे प्रेम आहे असा प्रेक्षक तिकिटाचे दर वाढले अशी तक्रार गांभीर्याने कधीच करणार नाही. असो.

शिवाजी मंदिर हे थंड हवेचे प्रेक्षागृह आहे. ( यालाच बोली भाषेत वातानुकुलित असे म्हणतात. 'वातानुकुलित' ला अनंतरावांनी जाता जाता सहज सुचवलेला सुबक पर्याय सबंधितांनी आधी विचारात आणि मग मनावर का घेऊ नये ? ) तेथील प्रत्येक आसन सुशीतलासन आहे. प्रेक्षागृहातील पंखे चालू नसतानासुद्धा हवा इतकी थंड रहावी, हा एक चमत्कारच म्हणायला हवा. गंमतीची गोष्ट अशी की, क्वचित पंखे चालू केले तर हवा एकदम गरम होते, असे म्हणतात. खरी स्थिती अशी आहे की, एकवेळ बाळ दुर्वांचीजुडीकरांच्या नाटकांच्या नावातील नऊ ही अक्षरसंख्या कमीजास्त होईल; पण शिवाजी मंदिरातील अनुकूल थंड हवा कमी जास्त होणे नाही. शिवाजी मंदिरात प्रयोग लावणाऱ्या नाट्यसंस्थांना हे चांगले ठाऊक आहे. शिवाय प्रेक्षकांचे सुख हेच आपले समाधान असे त्या मानतात. म्हणून प्रेक्षकांना थंड हवेचे जास्तीतजास्त सुख देऊन समाधानाचा घडा भरण्यासाठी नाट्यप्रयोग नियोजित वेळेपेक्षा जास्तीतजास्त उशिरा सुरू करायचा या प्रेक्षकपरायण नाट्यसंस्थांचा सतत आणि यशस्वी प्रयत्न चाललेला असतो.

अशा या बिनदोष, परिपूर्ण, सदारम्य वास्तूवर मराठी नाट्यरसिकांची बहालमर्जी आहे. शिवाजी मंदिरात सुधारणा करणे हे गोविंद बल्लाळ देवलांच्या 'संगीत शारदा' ( इ. स. १८९९ ) नाटकात शब्द घुसडण्या इतके अभद्र होय, अशी त्यांची धारणा आहे. शिवाजी मंदिराला आम्ही *स्वयंभू* स्थान म्हणतो ते यासाठीच. यासाठीच सुधारणेची बाजारू जाहिरात करणारी ती पाटी मला बदनामीकारक वाटली होती. पण त्या पाटीमागची मंदिर–मुस्ताफांची विधायक भूमिका थोड्या वेळाने माझ्या लक्षात आली आणि त्यांचे मला कौतुककौतुक होऊन राहिले. त्याचे असे झाले: पाटीवरची अक्षरे पुसायची माझी धडपड फुकट जाऊन हताश होत्साता मी बाजूला उभा असताना माझा एक मित्र मला भेटला. या मित्राला मराठी नाटकाची ॲलर्जी आहे. तो थोडचाशा खवचटपणेच म्हणाला, " काय, नाटकाला का ? "

" नाही. सहज जात होतो मंदिरावरून. इतक्यात ही पाटी दिसली, म्हणून थांबलो, मंदिरातली नाटकं बंद आहेत चारसहा दिवस, मी तपशीलवार खुलासा केला.

मग त्याने ती पाटी सावकाश मननपूर्वक वाचली. पाटी वाचताना त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य, समाधान, कौतुक, आदर असे भाव क्रमाक्रमाने दाटत गेले. अखेरच्या आदरभावाने त्याचा चेहरा ओथंबून तो म्हणाला, " मजा आहे लेको तुमची. या नाटकवाल्यांना तुम्ही प्रेक्षक म्हणजे देवासमान वगैरे. तेवढचासाठी मंदिराची नियमितपणे तांत्रिक दुरुस्ती रंगरंगोटी, ठाकठीक, आणि तुमच्यासाठी सारख्या एवढचा सुधारणा केल्यावर एखादे वेळी दर वाढवले तर सर्वांत मोठी बोंब तुमचीच. "

मी काही बोललो नाही. फक्त अर्थपूर्ण का काय म्हणतात तसे हसलो. मला उमजले, शिवाजी मंदिराच्या दारातील ती पाटी माझ्यासारख्या शिवाजी मंदिराच्या लाखो भाविक नाट्यरसिकांसाठी नव्हतीच. ती होती शिवाजी मंदिर फारसे न पाहिलेल्या माझ्या मित्रासारख्या लाखो जबाबदार आणि सुबुद्ध नागरिकांसाठी.

—अनंतराव

# घटना दुरुस्ती

## पार्लमेंटच्या अधिकाराचा प्रश्न

वा. दा. रानडे

घटनेत मोठे फेरबदल सुचविणारे ४४ वे घटना दुरुस्ती बिल नुकत्याच संपलेल्या लोकसभा अधिवेशनाच्या अखेरीस मांडण्यात आले व त्यावर चर्चेसाठी २५ ऑक्टोबरला पार्लमेंटची खास बैठक बोलावण्यात येणार आहे. काँग्रेसच्या स्वर्णसिंग समितीने केलेल्या शिफारशींवरच हे बिल मुख्यतः आधारलेले आहे.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, घटनेच्या मूलभूत चौकटीतच ज्यामुळे बदल होईल, असे बदल करण्याचा पार्लमेंटला अधिकार आहे का ? पार्लमेंटला घटनेत दुरुस्ती करता येईल, पण मूलभूत चौकटीत किंवा स्वरूपात बदल करता येणार नाहीत असा निर्णय सुप्रीम कोर्टाने १९७३ साली दिलेला आहे. आम्ही सुचविलेले बदल मूलभूत स्वरूपाचे नाहीत. घटनेचे मूळ रूप किंवा सांगाडा आम्ही कायम ठेवला आहे असे सत्तारूढ काँग्रेसच्या नेत्यांचे म्हणणे. पण ही घटना दुरुस्ती नसून या बदलांमुळे नवी घटनाच तयार होणार आहे, अशी विरोधी पक्षनेत्यांची टीका आहे. यातले खरे कोण ? वास्तविक बिलाच्या स्वरूपाबाबत असे मतभेद असता, त्याचा मसुदा सुप्रीम कोर्टाकडे पाठवून त्याचा अभिप्राय घेणेच योग्य ठरले असते. पण पार्लमेंट हीच सर्वश्रेष्ठ व सार्वभौम अशी सत्ताधारी पक्षाची भूमिका असल्यावर तो बिलाचा मसुदा सुप्रीम कोर्टापुढे कशाला पाठवील ? हे बिल मांडताना केलेल्या भाषणात कायदामंत्री हरिभाऊ गोखले म्हणाले, 'घटनेच्या कोणत्याही कलमात दुरुस्ती करण्याचा पार्लमेंटला अधिकार आहे. घटनेच्या मूलभूत विशेषांमध्ये, तसेच उद्दिष्टात बदल करण्याचा पार्लमेंटला अधिकार नाही, हे मत मला मान्य नाही. घटनेच्या मूलभूत सांगाड्यात (बेसिक

स्ट्रक्चर) पार्लमेंटला बदल करता येणार नाही. असा अभिप्राय सुप्रीम कोर्टाने व्यक्त केला असला तरी, हा 'मूलभूत सांगाडा' कोणता हे कोर्टाने आम्हाला सांगितलेले नाही' (मंत्री गोखले यांच्या मते तर असा मूलभूत सांगाडाच अस्तित्वात नाही.)

घटनेचा 'मूलभूत सांगाडा' कोणता हे सुप्रीम कोर्टाने सांगितलेले नाही असे कायदामंत्र्यांचे म्हणणे, पण कायदामंत्र्यांना स्वतःला आपल्या घटनेचा काही 'मूलभूत सांगाडा' आहे असे वाटत नाही का? घटनेत मंत्रिमंडळ, संसद आणि न्यायालये यांची अधिकारक्षेत्रे निश्चित केली आहेत. त्यात बदल करणे म्हणजे घटनेचा सांगाडा बदलणे होय असेच म्हणावे लागेल. न्यायालयांचे अधिकार मर्यादित करून पार्लमेंटला सर्वश्रेष्ठ व सार्वभौम ठरविणे हा सत्तारूढ पक्षाने अलीकडे मांडलेल्या घटना दुरुस्त्यांचा मुख्य उद्देश आहे. सामाजिक, आर्थिक क्रांतीचा कार्यक्रम अंमलात आणण्यात न्यायालयांच्या निर्णयांनी अडथळे येतात म्हणून त्यांचे अधिकार मर्यादित करण्यात येत आहेत, असे समर्थन सत्तारूढ पक्षातर्फे करण्यात येते. जमीन सुधारणा कायद्याच्या बाबतीत पंडित नेहरूंच्या काळापासून असे घडलेले आहे हे खरे. त्याला आळा घालण्यासाठी घटनेच्या नवव्या परिशिष्टात असे कायदे समाविष्ट करण्याची प्रथा नेहरूंनी पाडली. या परिशिष्टात समाविष्ट केलेल्या कायद्यांविरुद्ध कोर्टात दाद मागता येत नाही. नेहरूंच्या काळात या परिशिष्टातील कायद्यांची यादी फार थोडी होती पण आता ती वाढत वाढत १६८ पर्यंत गेली आहे. ही संख्या काही लहान नाही. समाजातील दुबळ्या गटांच्या हितासाठी केलेल्या कायद्यांविरुद्ध कोर्टात हरकती घेतल्या जातात, त्यामुळे त्यांची अंमलबजावणी लांबते हे खरे; पण त्यावर उपाय म्हणून सरकार एकेक कायदा कोर्टाच्या कक्षेतून काढून घेऊ लागले तर, त्यातून दुसरा एक धोका निर्माण होण्याचा संभव आहे. कायद्यांचा कायदेशीरपणा ठरविण्याचा अधिकार घटनेने न्यायालयांना दिला आहे तो काढून घेणे म्हणजे मंत्रिमंडळ, संसद आणि न्यायालये यांच्या अधिकारक्षेत्रांचा घटनेने साधलेला तोल बिघडविणे होय, मूळ सांगाडा बदलणे होय.

न्यायालयांचे अधिकार मर्यादित करण्याच्या धोक्याचा पुरेसा, सखोल विचार आपल्याकडे झालेला नाही. न्यायालयांचा अंकुश आपल्यावर नाही असे दिसताच कायदे करण्याच्या सत्तेचा दुरुपयोग होऊन वाटेल ते कायदे पास केले जाण्याची शक्यता आहे. आणखी एक धोका म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळात सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण होईल. विधिमंडळात पुरेसे बहुमत असल्याने आणि न्यायालयाचा अंकुश न राहिल्याने वाटेल ते कायदे पास करून घेण्याची प्रवृत्ती बळावेल. मंत्रिमंडळ, संसद आणि न्यायालये यांच्या संबंधांचा तोल बिघडल्याने होणाऱ्या या संभाव्य परिणामांचा विचार घटना दुरुस्ती करताना केला जावा.

याचा अर्थ सत्तारूढ पक्षाने आपला राजकीय–आर्थिक–सामाजिक कार्यक्रम परिणामकारकपणे अंमलात आणण्यासाठी घटनेत दुरुस्ती करू नये असे नाही. त्यांना आवश्यक वाटत असेल तर, घटनेचा सांगाडाही त्यांनी जरूर बदलावा. पण हा बदल मी पूर्वीच्या एका लेखात म्हटल्याप्रमाणे घाईने घडवून आणू नये. चव्वेचाळीसाव्या घटना दुरुस्ती बिलात सुचविलेले बदल म्हणजे जवळ जवळ नवी घटनाच तयार करण्यासारखे आहे, तसे करावयाचे तर, मग नवी घटनानिर्मितीच निवडून संबंध घटनेचाच एकदा तपशीलवार विचार का केला जाऊ नये? घटना समिती स्थापण्याची तरतूद आपल्या घटनेत नाही. तेव्हा भावी निवडणुकांतून जी लोकसभा निवडली जाईल तीच घटना समिती म्हणून काम करील असा निर्णय सरकारने निवडणुकांची घोषणा करताना जाहीर करावा आणि या नव्या लोकसभेने घटना समिती म्हणून बसून सध्याच्या घटनेत काय दुरुस्त्या करायच्या की नवीच घटना तयार करायची याचा विचार करावा. पूर्वीच्या एका लेखात केलेल्या या सूचनेवर पुनः एकदा भर देणे मला आवश्यक वाटते. सत्तारूढपक्षास आपल्या बहुमताच्या जोरावर बिल पास करून घेणे काही अवघड नाही पण देशाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने या सूचनेचा विचार व्हावा.

घटना दुरुस्तीमागे काय भूमिका असावी आणि त्यासाठी कोणती पद्धती अवलंबली जावी याचा विचार केल्यानंतर नव्या दुरुस्ती बिलातील एका नव्या सूचनासंबंधीच थोडेसे मतप्रदर्शन करीत आहे. लोकसभा आणि विधानसभांची मुदत सहा वर्षे आहे. अधिकारारूढ पक्षाला आपला कार्यक्रम अंमलात आणण्यास पुरेशी मुदत मिळावी हा या मुदत वाढीमागील उद्देश असल्याचे सांगण्यात येते. ब्रिटनमध्ये पाच वर्षांनी व अमेरिकेत चार वर्षांनी निवडणुका होतात. तेथील पक्षांना ही मुदत पुरेशी वाटते तर आम्हालाच ती कमी का वाटावी? तेव्हा मुदतवाढीचे हे कारण पटणारे नाही. आपला कार्यक्रम धडाक्याने अंमलात आणण्याचा उरक अधिकारारूढ पक्षात असेल तर चार–पाच वर्षातही तो भरपूर काम करून दाखवू शकेल. तेव्हा खरी आवश्यकता आहे तो कार्याचा उरक वाढविण्याची. लोकसभा किंवा विधानसभेच्या मुदतवाढीची नव्हे, आपसातील झगडे, कारवाया, डाव-प्रतिडाव यात आमची किती शक्ती वाया जात असते? ती वाचली तर कामाचा उरक निश्चित वाढेल. ब्रिटिश पार्लमेंट, अमेरिकन काँग्रेस व आपले पार्लमेंट यांनी आपल्या मुदतीत केलेल्या कामाचा राजकीय अभ्यासकांनी तुलनात्मक अभ्यास करता निष्कर्ष काढावेत. अशा निष्कर्षांच्या आधारेच मुदतवाढीची मागणी कितपत योग्य आहे याचा साधार विचार करता येईल.

मुदतवाढीतला एक तोटाही लक्षात घेतला पाहिजे. मुदतवाढीने कार्यक्षम सरकारला अधिककाळ अधिकारावर राहून जनतेचे अधिक हित साधता येईल, पण सरकार कार्यक्षम नसेल तर याच्याउलट स्थिती निर्माण होईल. जनतेच्या हिताऐवजी अनहित करायलाच त्याला अधिक संधी मिळेल. तेव्हा मुदतवाढीची काही आवश्यकता नाही.

नव्या घटना दुरुस्ती बिलातील इतर काही महत्त्वाच्या कलमाबाबत विवेचन पुनः केव्हां तरी.

☐

तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग ९ )

# वात्स्यायन

दि. बा. मोकाशी

## मित्राला निरोप

महेश्वरदत्त पडताच, पायवाटेने परत मागे धावत जाऊन, वात्स्यायन दरडीत उतरला. त्याचे ऊर धडधडत होते. लेण्यांतले निरुपयोगी दगड तिथे पडलेले होते. एखाद्यावर महेश्वराचे डोके आपटले असेल तर कपाळमोक्षच.

दरडीतल्या वृक्षांनी चांदण्यांचे तुकडे करून भूमीवर विखुरले होते. अंधारापेक्षाही त्यातून वाट काढणे वात्स्यायनाला जड गेले. सर्व तऱ्हेचे विकल्प मनात आणीत, ठेचाळत, वात्स्यायन मित्रापाशी येऊन पोहोचला, तेव्हा त्याला तो अस्तावस्थ असा मूर्च्छितावस्थेत आढळला. वात्स्यायनाने त्याच्या शरीरावर जागोजागी चाचपून पाहिले. कपाळाशी त्याच्या बोटांना रक्त लागले. घाईघाईने त्याने महेश्वरदत्ताच्या मानेखाली आणि गुडघ्याखाली हात घालून त्याचे अचेतन शरीर उचलले. मग तो दरड चढून येऊ लागला. श्वासासाठी थांबत एकदोन ठिकाणी त्याने महेश्वरदत्ताला खाली टेकले. लेण्याकडे जाणाऱ्या वाटेवर चढून आल्यावर महेश्वरदत्ताला खाली ठेऊन, साहाय्यासाठी तो झोपड्यांकडे धावला. त्याने कथ्थकाला गाठले. कथ्थकाने दहाबारा तरुण गोळा केले. महेश्वरदत्ताला उचलून आणायला एक खाटले घेऊन सर्व लेण्यांकडे धावले.

झोपडीत आणताक्षणीच महेश्वरदत्तावर उपचार सुरू झाले. कुणी *कपाळावरील खोकेवर मद्य ओतला. कुणी मद्याचा घोट दिला.* कुणी हातपाय तपासले. त्याचा एक पाय लुळा पडून सुजला होता. त्यावर पाला गुंडाळून दांडक्यावर सरळ करून बांधला.

रात्र फार वाईट गेली. गुढगा सुजला होता. वेदनांनी महेश्वरदत्त विव्हळत होता. मधेच ग्लानीत डोळे मिटून पडत होता. कुणी म्हणू लागले त्याचा पाय तोडावा लागणार, कुणी म्हणू लागले तो जन्माचा *अधु होणार.* नंतर त्याला ज्वर भरून तो बरळू लागला. तेव्हा वात्स्यायन त्याच्या कपाळावर थंड पाण्याच्या घड्या घालीत बसला असता, एकदम त्याचा हात धरून महेश्वरदत्त म्हणाला,

‘*मल्लनाग ! मला अवंतीला धाड. इथे मी मरेन. अवंतीतच* मला बरे वाटेल. तिथे सुश्रुताचा एक शिष्य माझा परिचित आहे. तोच माझा पाय बरा करील.’

*वात्स्यायन म्हणाला,*

‘मित्रा ! तुझा ज्वर उतरला की आपण दोघे अवंतीस जाऊ.’

महेश्वरदत्त म्हणाला, ‘नाही–नाही. तू यायचं नाही. मी एकटा जाणार. त्या दोषांचा शोध थांबवू नको. अरे ! आता आपले आयुष्य ते काय ! त्यांचे सबंध आयुष्य जावयाचे आहे. माझी चिंता करू नको. अवंती पाहिल्याशिवाय मी मरणार नाही. माझ्या पायाचीच मला भीती वाटते. मी जन्माचा लंगडा होईन किंवा पायही तोडावा लागेल.’

दोन दिवसांनंतर मोडलेल्या पायाचे काय होणार हे कुणाला सांगता येत नव्हते, पण महेश्वरदत्ताचा ज्वर उतरला होता. आणि अवंतीला जाण्याचा त्याचा हट्ट इतका वाढला की शेवटी वात्स्यायनाने योग्य ते शुल्क देऊन एक बैलगाडी ठरवली.

त्या रात्री महेश्वरदत्ताची शुश्रूषा करीत असता वात्स्यायन स्वतःला या अपघाताबद्दल दोष देत होता. जर आपण याला आणले नसते तर याला हा अपघात होता ना. दुर्दैवाने याचा पाय गेला किंवा जन्माचे अधुत्व आले, तर त्याचा दोष सर्वस्वी आपणाकडेच. याला आधीच घरदार उरले नाही. कुठे पोटासाठी द्रव्य मिळवण्यास जाईल तर अधु पायामुळे तेही करता येणार नाही. याची उपासमार झाली, तर त्याला कारण आपण असेच होईल. आपणच त्याच्या उर्वरित आयुष्याचा भार आपल्यावर घेतला पाहिजे.

हे ठरवल्यावर त्याला बरे वाटले होते.

मग एका पहाटे, जिची बैठक गवताचा जाड थर घालून मऊ केलेली आहे; बाजूला मऊ गवताच्या पेंढ्या ठेवल्या आहेत, गवत टोचू नये म्हणून वर जाड वस्त्र अंथरले आहे अशा बैलगाडीत महेश्वरदत्ताला हळूच ठेवण्यात आले. कथ्थकादि मित्र अजंठ्यापासून बऱ्याच अंतरापर्यंत निरोप द्यायला आले. महेश्वरदत्त हाताने खुणा करून त्यांना परत जायला सांगत होता. शेवटी एका वृक्षाखाली गाडी थांबली.

महेश्वरदत्ताला निरोप देताना कथ्थकाच्या डोळ्यात पाणी तरंगले. तो म्हणाला–

प्रवासातले किंचित सहवासही तीव्र असल्याकारणानं, प्रवासातले निरोप घेणेही तीव्रतर होते.

‘*माझ्या कथा सांगताना* अनेकदा मी माझ्या पात्रांवर निरोप घेण्याचा प्रसंग आणला. कारण निरोप घेण्याचे प्रसंग निश्चितपणे स्त्रीपुरुषांची मने हलवून सोडतात. पण एक विचित्र गोष्ट सांगतो, कथा सांगणारा जे जे प्रसंग आपल्या कथाभागातून नायकनायिकेवर आणतो ते ते त्याला स्वतःच्या आयुष्यात भोगावे लागतात. तो

दुसऱ्यांवरचे सांगायला निघतो व नकळत स्वत:वरचे सांगून जातो. म्हणून माझा मुलगा जेव्हा कथा रचण्यात आणि सांगण्यात कुशल झाला, तेव्हा त्याला लोकांत सोडताना मी सांगितले, 'मुला ! तू कधीही ज्यांचा शेवट दु:खात आहे किंवा विकृत आहे अशा कथा रचू नको आणि सांगू नको. दु:ख, विकृत्या असणारच पण शेवट सुखद करीत जा. कारण कथांतून जे जे सांगशील ते ते तुलाच पुढे भोगावयाचे आहे.

'महेश्वरदत्त ! मी मित्रांतील ताटातुटीच्या शेकडो कथा सांगून प्रत्येक वेळी श्रोत्यांना रडविले आहे. आता तोच प्रसंग माझ्यावर येऊन माझ्या डोळ्यांत अश्रू आले आहेत. तुम्हाला निरोप देताना माझे हृदय विदीर्ण होत आहे. तरी पण महेश्वरदत्त ! तुम्ही आनंदाने अवंतीस जा. तुमचा पाय बरा होवो. तुम्हास आयुष्यांतील सारी सुखे मिळोत. वात्स्यायनाची चिंता करू नका. मी त्याच्याबरोबर राहीन आणि त्याच्या मेव्हण्याचा शोध पुरा करीन.'

मित्राला निरोप देताना वात्स्यायनाची मनोवस्था तर फार करुण होती. महेश्वरदत्ताचे दोन्ही हात हातात धरून तो म्हणाला,

'मित्रा ! कालपासून राहून राहून मी हळहळतो आहे. तुला या प्रवासाला आणले नसते तर तुझ्यावर हा प्रसंग आला नसता. तेव्हां मीच त्या प्रसंगाचे विवरण करायला हवे. आधी मी सांगेन ते करशील असे वचन मला दे. अवंतीतील औषधोपचार झाले की तू पत्नीला घेऊन नगरास आमच्या इथे राहायला जावयाचं. यापुढे तू माझं घर आपलं समजावयाचं. मला तुझ्याकडून तसं वचन हवं आहे.'

महेश्वरदत्ताने वात्स्यायनाच्या हात दाबून म्हटले,

'मल्लनाग ! मित्रा ! बालपणी आपण हातांत हात घालून फिरलो. आता पुन्हा तसेच हातांत हात धरताना तो आनंद आठवत आहे. लहानपणी जसे आपण तुझ्या घराच्या आवारांत किंवा गुरूच्या आश्रमापलीकडील रानांत गुपिते शोधीत हिंडलो तसे, आपण या प्रवासासाठी अवंती सोडली तेव्हा वाटले. तुला आठवतातय, आश्रमामागच्या रानांत खूप खोल आपण गेलो असता एकदा आणखी एक पर्णकुटी पाहिली. आंत कुणी गुरू आणि त्याचे चार शिष्य भूर्जपत्रावर लिहीत होते. आपणास पाहाताच गुरू म्हणाला–'अरे यांचे लग्न पहा' लग्न हा शब्द ऐकताच आपल्याला वाटले की आपल्याला धरून ते लग्नच लावून टाकणार आहेत. आपण तेथून धूम पळत परत आलो. अरे तो ऋषी भृगु होता हे मला नंतर कळले. तो सर्वांचे भूत, भविष्य जाणणारा होता. मोठेपणी पुढे मी त्याच्याकडे गेलो. आपल्या दोघांच्या पत्रिका त्याने काढल्या. त्यांत आपण तेथून पळून आलो हे होतेच. पण मी दरिद्री होणार, प्रवासात अधु होणार पण उतारवयात मी धनात लोळणार असे होते आणि तुझ्या पत्रिकेत 'तू मोठा ग्रंथ लिहिणार' असे लिहिले होते.'

जरा थांबून हसत महेश्वरदत्त म्हणाला, 'त्याप्रमाणे मी अधु झालो. त्याप्रमाणे तू ग्रंथ लिही. असो ! अंगरिक्ष-वासंतिकेचा शोध हा गुपिताचाच शोध आहे. त्यामुळेच मला हे सारं आठवलं. आता तू परत फीर, सुश्रुताच्या शिष्याने माझे काही बरे वाईट केले नाही, तर तुझ्या घरी रहायला जाईन जा ! तुझ्या शोधात तुला यश लाभो.'

पुन्हा पुन्हा परस्परांचे हात दाबून दोघे बालमित्र दूर झाले. बैलगाडी महेश्वरदत्ताला घेऊन चालू लागली. ती दृष्टीआड होईपर्यंत निरोप देत वात्स्यायन उभा राहिला. गाडी चालू होताच कथ्यकाचे मित्र परतले. वात्स्यायनाने मान वळवली तेव्हा एकटा कथ्यक शेजारी उभा होता.

महेश्वरदत्ताची बैलगाडी दृष्टीआड होताच वात्स्यायन भयंकर उदास झाला होता. त्याला वाटत होते, कुठेतरी वनांत किंवा डोंगरात जाऊन बसावे. मनांतून सारे काढून टाकावे, आपला शोध, प्रवास, महेश्वरदत्ताचा अपघात सगळे. एकांतस्थळी पर्णकुटी बांधावी, लोकांशी संबंध सोडून तप करावे. मनाची ओढाताण समाप्त करावी. आपण सर्व दृष्टीने दुर्बल आणि असमर्थ ठरलो आहोत.

वात्स्यायन मनांत असे उदास विचार आणीत असता, कथ्यक म्हणत होता,

'वात्स्यायन ! तू उदास झाला आहेस. एखादी कथा सांगून तुला सांत्वन लाभेल असे करता येईल. आपल्यासारखा प्रसंग कुणावर आलेला ऐकला की बरे वाटते. कथेचा तो एक परिणाम आहे. मी कथा का सांगतो व लोक का ऐकतात हे मला अजूनही नीटसे कळलेले नाही. माझ्या कथेतील सुखदु:ख समुदायांतील कुणीतरी चार चौघांनी अनुभवलेले असते. त्या चार चौघांच्या डोळ्यात अश्रू आले की त्याचा इतरावर परिणाम होऊन, सारा समुदाय गदगदू लागतो. पण तू एकटा आहेस आणि मला एकट्याला कथा सांगता येईल असे वाटत नाही. कारण मी कथा सांगत असता तू माझ्या डोळ्यांत बघत मनांत विचारशील, 'ही कथा का सांगतोय ? ही याने कुठे ऐकली ? की माझ्यासाठी रचली ?–या विचारांत तुला माझ्या कथेचे शब्द ऐकूही येणार नाहीत. तू बुद्धिवान आहेस. फार विचार करतोस आणि उदास होतोस हा तुझा दोष आहे. तुझा स्वभाव मला थोडा कळला आहे. कुणाचाही स्वभाव पूर्ण कधी कळत नाही. जो तो आपल्या हेतुपुरताच दुसऱ्याचा स्वभाव ओळखतो. माझ्या एखाद्या कथेत घालण्याइतपतच मी तुला जाणीन.

"तेव्हा मी तुला कथा सांगून तुझं सांत्वन करील नाही. माझ्या स्वत:वरही कथेचा परिणाम होत नाही. कारण ही केवळ कथा आहे हे मला विसरता येत नाही. तुझ्यावरही कथेचा परिणाम होणार नाही कारण मी नायकनायिकांचे मीलन दाखविले तर, तू विचारशील मीलन न झालेल्या असंख्य नायकनायिका आहेत. त्यांच्या कथा कुठे आहेत ? तू म्हणशील संसार हा दु:खाचा आहे, मन ही विकृती आहे.–तुझे म्हणणे बरोबर आहे. पण संसार खरोखरीच कसा आहे आणि मन कसे आहे हे कुणाला कळलाय का ? अरे माणूस मरतो हे खरोखरीच दु:ख आहे का ? लेण्यात येणाऱ्या शाक्यमुनींच्या शिष्यांना विचारशील तर ते मृत्यू आनंद आहे असे सांगतील. जाऊ दे. तुझ्या संगतीने मीसुद्धा फार विचार करायला लागलो. तेव्हा तूही विचार कमी कर. चार माणसांत असून एकटा असल्यासारखा तू राहतोस. कार्यप्रवण हो. लेण्यात काम करायला जातोस का ? अगदी कष्टाचे काम कर. कातळ फोड, दगड वाहून ने, माती खण. कारण शारीरिक कष्टात निश्चित असा हेतू असतो. त्याची सवय लावून घेतलीस की तुझ्या विचारांनाही दिशा लागेल. तू एकदा वर लेण्यात चल. तिथला प्रचंड उद्योग पहा. तुझे प्रश्न तुला त्यापुढे क्षुल्लक वाटतील. डोंगर फोडायचा असतो. नवख्याला वाटतं हे कसं होणार ? पण होतं. कित्येक पुरुष खोलीचा कातळ भिंतीसारखा कापतात. तो

मूर्तीसाठी, देवळासाठी, मधले कातळ तसेच ठेऊन भोवतालचे काढतात. मग ठेवलेल्या भागावर काम सुरू होते. शिळांना आकार येऊ लागतो. मूर्ती कळू लागते. मग रेखीवपणा येऊ लागतो. अरे इथे मूर्तीच काय पण काम करणारेही रेखीव बनले आहेत. येथील स्त्रिया पहा, पाणी आणि दगड वाहून त्यांच्या कमरा पातळ झाल्या आहेत. स्तन आणि नितंब घट्ट गोलाकार बनले आहेत. हातपाय घोटीव झाले आहेत. अरे ! हे स्त्रीपुरुषच लेण्यातील मूर्ती बनल्या आहेत. तूही दिवसाचे कष्ट संपले की या स्त्रियात मन रमव. मन रमवण्यासारख्या स्त्रिया मी दाखवीन, कामाचारात मन रमल्याने मनाची दुखणी आणि दुःखे दोन्ही जातात.

" ही इथे लहान अवतीच आहे. इथे विद्वान आहेत, चित्रकार आहेत, मूर्तिकार आहेत. नर्तकी आहेत, नट आहेत, मद्य आहे, सुवर्णनाणी आहेत, धूर्त आहे. इथे एकच नाही–विचार नाही. अवंतीत जे झालाय तेच इथे झालाय. भोग वाढले की, विचार थांबतो. मग विचार मनात आणण्यास माझ्या कथा उपयोगी पडतात. माझा गुरू–म्हणजेच माझा पिता-म्हणे, कथा या श्रोत्यांना हळुहळू मोक्षाप्रत नेतात. प्रथमतः श्रोते स्वतःचे सुखःदुख कथेतील नायकनायिकांच्या सुखदुःखाशी ताडून त्याप्रमाणे हसतात किंवा रडतात. त्यामुळे मन निर्मळ होते. नंतर कथेतील तात्पर्याचा परिणाम श्रोत्यांवर होऊ लागतो व श्रोते अंतर्मुख होतात. मग कथेतील तत्त्वावर ते चिंतन करू लागतात. चिंतन करू लागले की तसे आचरण होऊ लागते व त्या आचरणातूनच श्रोत्यांना मोक्षाचा मार्ग सापडतो. "

कथ्थक बराच वेळ असं काही बोलत राहिला. तो आपले उदास मन रिझवायला बोलत आहे, वात्स्यायनाला कळत होते. तो म्हणतो आहे ते ठीकच आहे, आपण काहीतरी कष्टाचे काम करायला हवे. तरच आपल्या वेडयावाकड्या विचारांना बंध पडेल. खरेच, या लेण्यात काम करणारे किती उत्साही आहेत ? आपण या लोकात शोभत नाही. चित्रकार त्यांचीच चित्रे काढणार. आनंदोत्सवी स्त्री पुरुषांची, शृंगारात मग्न असणाऱ्यांची, शेतावर जाणारांची, या सर्व मूर्तीत त्यांनी आपली एक मूर्ती कोपऱ्यात खोदून ठेवावी, आणि खाली कोरावे–ज्याला या उत्साही जगात राहूनही काही करता आले नाही, असा एक उदास माणूस–मल्लनाग वात्स्यायन.

महेश्वरदत्ताला वचन दिल्याप्रमाणे कथ्थकाचे तट्टू दुसऱ्या दिवशी वात्स्यायनाच्या घोड्याबरोबर अजिंठा सोडून बाहेर पडले. अजिंठ्याहून कोल्हापूरिकेला जाऊन तेथून वेणुग्राम करून वेंगीपर्यंत कृष्णा काठाने प्रवास करीत ते वेंगीशी उत्तरेकडे तोंड करून पाटलीपुत्रास जाणार होते. मार्ग ठरवताना कथ्थक म्हणाला होता–येथून गोदावरीच्या काठानेही आपणास जाता येईल. पण तसे कलिंगात पोहोचायचे तर मार्गात मोठे वाळवंट आहे. तो प्रवास अतिशय संकटांचा आहे. शिवाय तुमचा मेहुणा व मेहुणी जाऊन रहावी असा एकही मोठा गाव मार्गात नाही. उलट आपण आणखी खाली दक्षिणेत जाऊन जरा वळण घेऊन उत्तरेकडे गेलो तर पिष्ठपूर, ताम्रलिप्ती अशा नगरी आहेत. तेथे ही दोघे असण्याचा संभव आहे.

तेव्हा अजिंठा सोडताच त्यांनी कोल्हापूरिकेची दिशा घेतली, ◻

# दंडकारण्य

आता ते दंडकारण्यातून चालले होते.

कथ्थक सारखा बोलतच होता. नायिकेचे संभोगाचे भय घालवण्यास नायकाने जसे तिच्याशी बोलत राहवे तसा आपले औदासिन्य दूर करण्यासाठी हा सारखा बोलत आहे, वात्स्यायनाच्या मनात येत होतं. दंडकारण्याची भयाणता तो बोलून आणखी वाढवीत आहे. दंडकारण्याबद्दल कथ्थक म्हणाला,

' वात्स्यायन ! या दंडकारण्यातून ज्याने प्रथम मार्ग काढला तो धन्य होय. पाहा ! या वृक्षराजी किती दाट उगवल्या आहेत ! येथील भूमीला उत्पत्तीपासून सूर्यदर्शन झाले नसेल. वृक्षांच्या तळात हजारो वर्षांचा पाचोळा साचला आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या दलदलीत कित्येक दुर्दैवी प्राणी गडप झाले असतील. येथील शांततासुद्धा किती भयाण आहे !

' कुणा वाल्मिकी कवीने रामायण म्हणून काव्य केले आहे. या वाल्मिकीचा मला मत्सर वाटतो. या काव्यातला कथाभाग ज्याच्या त्याच्या तोंडी झाला आहे. त्यातील दंडकारण्याचे वर्णन ऐकलेस, तर आजचे दंडकारण्य तुला सुगम असा राजपथच वाटेल. त्यातील गोदावरीकाठचा रामसीतेमधील प्रणय कामशास्त्रातला धडाच आहे. आहे. कामशास्त्रात तुला रस आहे का ? अरे ! प्रासादातल्याइतकेच निसर्गाच्या सान्निध्यातले, नदीकाठचे, नदीच्या प्रवाहातले, शिळेवरचे आणि पर्णकुटीतील कामसेवन आनंददायक होते. राम उगीच का सीतेला म्हणाला, ' ते प्रासाद नकोत, ती अयोध्या नको– ' बाबा ! कामाचे सामर्थ्यच प्रचंड ! भयंकर दंडकारण्यातून जाण्याचे धैर्य 'कामा'मुळेच रामाला झाले. सीताहरण झाल्यावर कामशक्ती गेल्यानेच तो हतबल झाला. नंतर सीतेबद्दलच्या कामेच्छेनेच त्याला रावणाशी युद्ध करायला बल दिले. '

बोलण्याबोलण्यात असा चार वेळा कथ्थकाने कामशास्त्राचा उल्लेख केला. पण वात्स्यायन काही म्हणाला नाही. गोदावरीच्या काठी, अयोध्येतील राजवाड्यातल्यापेक्षाही कामपूर्ती उत्तम होत असेल. पण त्यावरून बाभ्रव्याचा ग्रंथ असत्य ठरत नाही. तो ग्रंथ अवंती आणि पाटलिपुत्र अशा नगरीतील नागरिकांपुरताच असेल. कारण तिथेच काम विकृत होण्याजोगी परिस्थिती असते. पण त्या विषयाची चर्चाच नको. या खडतर प्रवासाचा लौकर शेवट होवो.

प्रवासातील त्यांचा दिनक्रम आता ठरून गेला होता. अंधार पडायच्या आधी दोघे भोजन करून घेत. मडक्यात भात शिजवून, कोरड्या चटणीबरोबर सेवन करीत. रात्री शेकोटी पेटवून आपल्या पथाऱ्या शेजारी घालत. अरण्यातील भयंकर ध्वनींमुळे वात्स्यायन मधेच जागा होई. पण घरी निजावा तसा कथ्थक झोपलेला असे. जागृतावस्थेत कथ्थकाच्या तोंडाला खळ नसे. त्याने एकदा दंडकारण्याची गोष्ट सांगितली. तो म्हणाला,

' आपण ज्या दंडकारण्यातून जात आहोत त्याची कथा सांगतो. कृतयुगात मनु म्हणून राजा होता. त्याचा इक्ष्वाकु म्हणून पुत्र होता. या इक्ष्वाकूस शंभर पुत्र झाले. सर्वांत धाकटा दंड नावाचा होता. त्याला इक्ष्वाकूने विंध्य पर्वत आणि त्याच्या दक्षिणेस असलेला शैवल

पर्वत या दोन पर्वतांतील देश दिला. दंडाने या देशात मधुमंत नावाचे पुर वसवून ती आपली राजधानी केली. त्याने चांगले राज्य केले. त्याच्यात एकच दोष होता. तो अतिशय कामी होता. एकदा त्याचा जो पुरोहित, भार्गव, त्याची कन्या अरजा हिला त्याने एकटी अशी निर्झरावर स्नान करताना पाहिली. अरजेचा यौवनोत्फुल्ल देह पाहून तो मोहित झाला व त्याने तिच्या इच्छेविरुद्ध तिथेच तिचा भोग घेतला. तिच्या पित्याला–पुरोहित भार्गवाला–ते कळताच तो कोपाविष्ट झाला. त्याने दंडास शाप दिला की, 'दंडा! तुझा शंभर योजने विस्ताराचा देश सात दिवसांत नष्ट पावेल.' खरोखरीच त्याप्रमाणे होऊन, सात दिवसांनी त्या देशात एकही प्राणी उरला नाही. माणसे नाहीशा झालेल्या त्या देशात अरण्य वाढू लागले आणि त्या अरण्यास दंडकारण्य हे नाव पडले. बाबा! अति कामवासनेने देशही नष्ट होतो.'

वात्स्यायन तेव्हा म्हणाला,

'जर स्वेच्छेने अरजा उपभोगली गेली असती तर दंडकारण्य झाले नसते.'

कथ्थक म्हणाला, 'सत्य आहे–सत्य आहे. तू शिकलेला दिसतोस. खरं सांग! कामशास्त्र तू वाचले आहेस?'

वात्स्यायन म्हणाला,

'वाचले आहे. मी बाभ्रव्य पाठ केला आहे. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बघा! अंगरिक्षाला मी वासंतिकेचे मन वळवायला युक्ती दिली. पण ती मिळताच दोघे पळून जातील हे मला कळले नाही. ते कळले असते, तर, यावेळी मी या भयाण दंडकारण्यात नसतो. ते न कळण्याबद्दल मी स्वतःला दोष देत आहे.'

कथ्थक म्हणाला,

'मला वाटू लागलं आहे की, दोघे तुला लौकरच सापडणार.'

'तुम्ही भविष्यवाणी सांगता काय? अवंतीत एकाने 'मी ग्रंथ लिहिणार' असे भविष्य सांगितले. ते जितके खरे घडले, तितकेच हे खरे घडेल. मी ग्रंथ तर लिहिला नाहीच पण हा खडतर प्रवास घडणार हेही त्याने सांगितले नाही.'

कथ्थक म्हणाला,

'मी भविष्य सांगत नाही. क्रमप्राप्त सांगतो आहे. माणसांवर येणारे प्रसंग आणि त्यांची परिणीती क्रमप्राप्त असते. कथा सांगणाराला त्याचं उपजत ज्ञान असतं. मी नवी कथा सांगतो तेव्हा कथेचा शेवट मनात नसताही, शेवट आल्याचं कळतं. काय सांगावे! हा प्रवासच तुमचा ग्रंथ असेल. ग्रंथ लिहिणार असे तुमच्यासारखे मला कुणी भविष्य सांगितले असते तर मी धन्य झालो असतो. मी रामायण लिहिले असते. कुठेतरी चुकत गेले. कदाचित माझा मुलगा लिहील. लोकांची मने आकृष्ट करून घेणे महाकठीण कर्म. माझ्यासारखे कित्येक कथ्थक रानोमाळ हिंडत राहतात आणि आमच्यातला गुणाढ्यासारखा एखादा राजाच्या सभेत पोहोचतो.'

मग हसून तो म्हणाला,

'या घनदाट अरण्यात आपण कसला विचार करीत आहोत? पुढच्या क्षणी एखादा विषारी सर्प आपल्याला चावेल. तुम्ही किंवा मी तडफडत प्राण सोडू. पुढच्या प्रवासात काय काय घडण्याचा संभव आहे पहा. आपणास पाण्यावाचून दिवस काढावे लागतील. नदीच्या प्रवाहात वाहून आपली प्रेते काठावरच्या झाडाच्या फांदीला अडकून डुलत राहतील. कुठे रानटी लोक धरून बळी देतील. डोंगर चढून उतरून पाय सुजतील. एकदम वादळ होऊन ओलेचिंब अवस्थेत कुडकुडत रात्र काढावी लागेल. ज्वर भरेल. कुठे अग्नी न पेटवता आल्याने उपासमार होईल. शरीर अशा कष्टांतून जात असता मन निराळेच विचार करील. घरच्या संभोगसुखाची ते स्वप्ने पाडील, कधी पत्नीबद्दल मनात विकल्प येतील. आपण दूर असता आपली पत्नी पातिव्रत्यव्रताने राहिली आहे ही कल्पना लोकांना फार आवडते. आम्ही कथेत अशा नायिका घालतो. मी फार बोलतो आहे असे तुम्हांला वाटेल. पण बोलण्यामुळेच अरण्यवास सुसह्य होतो. तुम्ही विचाराल मी एकटा असतो तेव्हा काय करतो? ईश्वराच्या अगाध लीला डोळ्यापुढे आणतो. खरोखरी मी अरण्यात सुखात असतो. तुमची अवंतीच पहा. तिथे रहाण्यापेक्षा मी अरण्य पत्करीन. धनासक्त आणि व्यसनासक्त लोकांनी ती बिघडवली आहे. मी म्हटले, अरण्यांत कोणत्या क्षणी काय होईल सांगता येत नाही. पण तसे विपरित काही होत नाही. इतक्या वर्षांच्या प्रवासांत माझे काय झाले? अवंतीपेक्षा इथे सुरक्षित आहे. म्हणूनच तुमचा मेव्हणा सापडणं क्रमप्राप्त, ही नेहमी घडणारी घटना आहे. अवंतीत दंडकारण्य या शब्दाने कापरे भरेल. पण त्याच अरण्यात आपण जास्त सुरक्षित आहोत. तसा तुमचा मेव्हणाही सुरक्षित आहे.'

दंडकारण्याच्या पूर्व टोकाशी असलेल्या वेणुग्राम गावी ते चार दिवस राहिले. पहिला दिवस अरण्यांतील प्रवासाचा शीण घालवण्यात गेला. यापुढील कथा कथनात अंगरिक्षाची कथा सांगण्याचे कथ्थकाने ठरवले होते. ही कथा ऐकून कुणीतरी येऊन सांगेल, 'असं जोडपं इथे आहे' असं त्याला वाटत होतं.

अजिठ्यास असताना वात्स्यायनाने कथ्थकाचे कथा कथन ऐकले नव्हते. वेणुग्रामच्या हाटमध्ये दुसऱ्या दिवशी कथा सांगण्यास तो उभा राहिला तेव्हा त्याचे रूप संपूर्ण पालटलेले वात्स्यायनास दिसले. या प्रसंगासाठी ठेवलेला रेशमी पितांबर आणि उत्तरीय त्याने परिधान केले होते. केस चापूनचोपून बसवले होते. डोळ्यात काजळ होते. केशरी तिलक आणि तोंडावर चंदनाचे ठिपके होते. दंड आणि वक्षस्थल यावर चंदनाची बोटे ओढली होती. एखादा महाराजा सिंहासनाकडे जावा तसा सभास्थानी ठेवलेल्या उंच शिलेकडे जाऊन तीवर तो उभा राहिला. त्याने दोन्ही बाहू वर करताच श्रोत्यात स्तब्धता पसरली. तो म्हणाला,

'जन हो! हा गुणाढ्याचा शिष्य, हा जगप्रसिद्ध कथ्थक सुंदर सुंदर कथा सांगण्यास तुमच्यांत आला आहे. आजचा दिवस जन्मभर तुमच्या स्मरणात राहील. कुणी म्हणेल, कथ्थकाने माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहविले, कुणी म्हणेल माझ्या बाहूंना स्फुरण आणले, कुणी म्हणेल माझा काम जागृत केला. कुणी म्हणेल माझ्या पतीचे प्रेम मला मिळाले. कुणी म्हणेल याची कथा ऐकून माझी महत्त्वाकांक्षा जागृत होऊन दैव शोधण्यास बाहेर पडलो. पण घाबरू नका. असे गाव सोडणे क्वचितच घडते. माझी कथा ऐकून सर्वांनीच गाव सोडलं तर माझी कथा ऐकायला कोण राहणार?'

लोक हसू लागले. मग कथ्थकाने गोष्ट सुरू केली. वात्स्यायन लक्ष देऊन ऐकत होता. अंगरिक्ष आणि वासंतिका यांना त्याने ताम्र-

लिपी नगरीत बसवले. नावे बदलून त्याने चंद्रकेतू आणि रूपणिका अशी ठेवली. तो सांगू लागला,

'ताम्रलिप्ती नगरीत धनशूर नावाचा एक श्रेष्ठी व चंडवान नावाचा एक सेनापती असे दोघे राहत होते. श्रेष्ठीला चंद्रकेतू नावाचा पुत्र व सेनापतीला रूपणिका नावाची कन्या होती. ही दोन्ही मुले, त्यांचे वाडे जवळ असल्यामुळे बालपणापासून एकत्र खेळत आली. पुढे दोघे तरुण वयात आल्यावर त्यांचे परस्परांवर मन बसले. पण सेनापती आपल्या इतका धनवान नाही म्हणून आणि श्रेष्ठीचे घराणे आपल्याहून हीन आहे म्हणून दोघां आईबापांना मुलांचा विवाह व्हावा हे मान्य नव्हते. आपल्या मात्यापित्यांचा आपल्या विवाहास विरोध जाणून चंद्रकेतू व रूपणिका हे चोरून गाठीभेटी घेऊ लागले. ते एकमेकांना देवळांत, यज्ञोत्सवात किंवा नगरीबाहेरच्या उद्यानात भेटू लागले. प्रथम प्रथम तेवढ्याने त्यांचे समाधान होत होते. पण नंतर केवळ भेटीनं आणि बोलण्यानं त्यांचे समाधान होईनासे झाले. एकदा यौवनाने कामाची ठिणगी फुलवली की तिचा वणवा होण्यास वेळ लागत नाही. आलिंगन-चुंबनादिकांनी न भागून त्यांना समागम हवासा वाटू लागला. पण विवाहाशिवाय समागम योग्य नसल्याने ते उद्यानात परस्परांकडे पाहत अश्रू ढाळीत बसू लागले,

'एकदा दोघे अशीच उद्यानात बसली असता दोन प्रचंड गरुड पक्ष्याच्या जोडप्याने त्यांना पाहिले. आपल्या पिलांसाठी या दोन कोवळ्या शरिरांचे मांस रूचकर होईल हे जाणून दोन्ही पक्षांनी खाली झेप घेतली आणि एकानं चंडकेतुला व दुसऱ्याने रूपणिकेला पायांत धरून आकाशात उड्डाण केले. आकाशमार्गाने ते दोन पक्षी आपल्या कित्येक योजने दूर असलेल्या पर्वतांतील निवासस्थानाकडे निघाले. ते काही योजने गेले नाहीत तोच अकस्मात काळे ढग येऊन विद्युल्लतेचा संचार सुरू झाला. त्यावेळी सुटलेल्या वाऱ्यामुळे पायातील ओझे पक्षांना झेपेना. तेव्हा पायांतील ओझी जमिनीवर टाकून दोन्ही पक्षी आपला जीव रक्षण करीत डोंगराकडे उडाले.

पक्ष्यांनी खाली टाकल्यावर प्रथम चंद्रकेतु सावध झाला. बेशुद्ध पडलेल्या रूपणिकेला त्याने सावध केले. सावध होताच भोवताली अरण्य पाहून ती अश्रू ढाळू लागली. चंद्रकेतुही प्रथम भयभीत झाला होता. पण तिचे भय पाहून त्याने धैर्य घेतले, व तिला धीर दिला. आणि तिच्यासमवेत तो, अरण्यांतून एखादा नगरीकडे जाणारा मार्ग मिळतो का हे शोधीत निघाला. प्रथम शिळांमधून, मग घनदाट वृक्षराजीतून नंतर काटेरी झुडपांतून वाट काढीत ते एका गवताळ, फळांनी भरलेले वृक्ष असलेल्या प्रदेशांतून जाऊ लागले. तिथेच एक स्वच्छ नदी वाहत होती. फळे खाऊन पाणी पिऊन परस्परांच्या आलिंगनात काही काळ त्यांनी विसावा घेतला. विसाव्यानंतर त्यांनी जेव्हा भोवताली पाहिले तेव्हा त्यांची मने अत्यंत हर्षित झाली. हरणांचे कळप नदीवर पाणी पीत होते. ससे उड्या मारीत धावत होते. नाना रंगांचे पक्षी नदीकाठच्या वृक्षांवर किलबिल करीत होते. दोघांनी ठरवले की नगरी न शोधता येथेच रहावे.

मग त्यांनी नदीकाठी पर्णकुटी बांधली आणि गांधर्वविवाह लावून ती दोघे पतिपत्नी म्हणून राहू लागली.

त्या अरण्यात एक यक्षिणी राहत होती. मनुष्यांचे सर्व भोग घ्यावेत असे तिला वाटे. नाना पुरुष उपभोगावेत, अलंकारांनी नटावे; मद्य प्यावे. चंद्रकेतु आणि रूपणिका यांच्यामधील आलिंगने, चुंबने, संभोग इत्यादी पाहून तिला अत्यंत मत्सर वाटू लागला. चंद्रकेतुला पाहून तर ती इतकी मोहित झाली की काही करून त्याच्याशी उपभोग घेतलाच पाहिजे असे तिला वाटू लागले. तेव्हा एकदा रूपणिका झोपली असता तिने तिच्या शरिरांत प्रवेश केला. रूपणिका केव्हा जागी होते आणि चंद्रकेतुशी आपण केव्हा भोग घेतो असे तिला झाले.

पुढे काही दिवस रूपणिकेच्या देहांत राहून यथेच्छ पुरुष भोग घेतल्यावर ती चंद्रकेतुला कंटाळली. तिला झोपडीचा आणि कदन्नाचा कंटाळा आला. तिने शेजारच्या नगरीत घेऊन जाण्याबद्दल चंद्रकेतुपाशी हट्ट धरला. आपल्या प्रियेच्या शरिरांत यक्षिणीने प्रवेश केला आहे. त्यामुळे ती उन्मत झाली आहे हे चंद्रकेतुला कळले नाही. रानाला ती कंटाळली आहे असे वाटून तो तिला शेजारच्या नगरीत घेऊन गेला.

नगरीतून जात असता सोन्याचे अलंकार घातलेला एक धनिक श्रेष्ठीचा पुत्र पाहून, हा आपल्याला हवे आहे तशा विलासांत ठेवील हे जाणून तिने कटाक्षांनी त्याला अनुकूल केले. मग नगरीतच रहावयाचे असा हट्ट धरून, चंद्रकेतुला श्रेष्ठीकडे सेवक म्हणून रहावयास सांगून, आपण स्वतः श्रेष्ठीच्या अंतःपुरांत दासी म्हणून राहिली. हळू हळू श्रेष्ठीपुत्रावर पूर्ण मोहिनी घालून तिने त्याला अंकित करून घेतले आणि त्याने तिला एक सुंदर घर घेऊन, अतिशय ऐश्वर्यांत ठेवले. लौकरच त्या श्रेष्ठीपुत्राचाही यक्षिणीला कंटाळा आला आणि श्रेष्ठी पुत्र बाहेर गेला की ती दुसऱ्या पुरुषांस घरात घेऊ लागली.

रूपणिकेचें हे वर्तन पाहून सेवक झालेला चंद्रकेतु अतिशय कष्टी झाला. आपल्या एका आलिंगनाने जिचे समाधान व्हावे, तिचे अनेक पुरुषांना जवळ करूनही समाधान होऊ नये? जिला वल्कलांत आनंद होता तिला केवढेही अलंकार मिळाले तरी अपुरे वाटावे? आपल्यावरचे तिचे प्रेम कुठे गेले? हे जीवन जगण्यांत अर्थ नाही असे त्याला वाटू लागले. एके दिवशी जीव देण्याचे ठरवून तो नगरीबाहेरील तळ्याशी आला व पाण्यांत शिरून सर्व देवांना नमस्कार करून म्हणाला,

'हे देव देवतांनो! जिने माझ्यावर निरतिशय प्रेम केले ती आता मजकडे पहातही नाही म्हणून मी दुःखाने जीव देत आहे. आत्महत्येचा दोष मजकडे लावू नका. तिच्यासाठी मी श्रीमंती सोडली, नगरीचा त्याग केला, आप्तेष्ट सोडले. हे जलदेवते तू मला उदरांत घे.'

असे म्हणून तो घाटाच्या पायऱ्या उतरत खोल पाण्यात शिरू लागला. याच वेळी यक्षिणीचा यक्षपती यक्षिणीला शोधीत नगरीकडे निघाला होता, तो तळ्याशी आला. त्याचा यक्षिणीवर राग झाला होता. तिने जिच्या शरीरात प्रवेश केला त्या मानवीचाच हा पती आहे हे जाणून यक्षाच्या मनात एकदम आले की, यक्षिणीला शासन करण्यास ही संधी चांगली आहे. त्याने जीव देण्यास उतरलेल्या चंद्रकेतुच्या अंगात प्रवेश केला. प्रवेश करताक्षणीच जीव द्यायला निघालेला चंद्रकेतू, रूपणिकेला शासन करण्याच्या निश्चयाने तळ्याबाहेर आला.

मग चंद्रकेतुच्या शरिरात प्रवेश केलेला यक्ष गावात येऊन यक्षिणीच्या घराभोवती फेऱ्या घालू लागला. तेवढ्यात एक पुरुष घराशी आला आणि यक्षिणीने त्याला दार उघडून आत घेतले. तिने परपुरुषास आत घेतले हे ओळखून यक्ष तसाच धावत श्रेष्ठीपुत्राकडे आला व त्याला त्याने सर्व वृत्तान्त कथन केला. तो ऐकताच संतप्त झालेला श्रेष्ठीपुत्र खड्ग घेऊन यक्षिणीकडे निघाला.

घराचे दार ठोठावून, दार उघडताच, श्रेष्ठीपुत्र आत शिरला, तेव्हा तेथे आलेल्या परपुरुषाने पळून जाण्याचा यत्न केला. पळून जात असता त्याने श्रेष्ठीपुत्रावर वार केला, तो वार वर्मी लागल्याने श्रेष्ठीपुत्र मेला. हे सर्व पाहत असलेल्या यक्षाने श्रेष्ठीच्या सेवकांना ती वार्ता दिली. तेव्हा सेवकांनी येऊन यक्षिणीस यथेच्छ मार दिला व तिला गावाबाहेर घालवून दिले.

आपल्या दैवातले सुखोपभोग संपले हे ओळखून तळयाशी येताच यक्षिणीने रूपणिकेचे शरीर सोडले व ती परत वनाकडे जाऊ लागली. तेवढ्यात मागे आलेल्या यक्षानेही चंद्रकेतुचे शरीर सोडले व यक्षिणीला पकडून तिला मारीत तो आपल्या वनाकडे निघाला.

'यक्ष अंगातून जाताच स्वप्नातून जागे व्हावे तसा चंद्रकेतु जागा झाला. यक्षिणी अंगातून गेल्यावर रूपणिका लागलेल्या माराने अजून मूर्च्छित होती. चंद्रकेतुने उठून धावत जाऊन तळयाचे पाणी आणून तिच्या तोंडावर मारले. तीही झोपेतून जागी व्हावी तशी जागी झाली आणि अश्रू ढाळू लागली. मग दोघांनीही आपल्याला कुणा अद्भूत योनीने पछाडलेले होते हे जाणून परस्परांना प्रेमातिशयाने आलिंगन दिले आणि परत आपल्या पर्णकुटीत जाऊन दोघे आनंदाने राहू लागली.

कथ्थकाची कथा रचलेली आहे, हे कळत असूनही, वात्स्यायन ती ऐकून अस्वस्थ झाला. वासंतिकेचे असे झाले नाही तर दुसरे आणखी भयंकर होईल. पोटासाठी तिला सूत काढण्याचे काम करावे लागले तर सूताधिकारी तिला पहाटेच्या अंधारात पैसे घ्यायला बोलवील आणि बळाने तिचा उपभोग घेईल. चाणक्याने अशा स्त्रियांशी केवळ बोलण्याबद्दलही सूताधिकाऱ्यांना शिक्षा सांगितली आहे. पण तो काळ आता राहिला नाही. वासंतिके ! तुला आणि तुझ्या अंगरिक्षाला तुमच्या निराधार अवस्थेत भरतखंडातील कोणतीही आजची नगरी निर्भय नाही. अरे ! तुमचे प्रेम तुमच्या आप्तेष्टांनी मानले नाही तर, परक्यांनी का मानावे ?

आपल्या कथेने वात्स्यायनाला अस्वस्थ केले आहे हे कथ्थकाच्या ध्यानी आले नाही. सभास्थानाहून परतताना आपल्या कथाकथनाच्याच नादात तो होता. तो म्हणाला,

'वात्स्यायन ! कथा अजून रंगवावयास हवी होती. आणखी दोनचारदा सांगितली की, पाहशील ! चहुकडे ही कथा लोक एकमेकांना सांगतील. कथेचे मूळसूत्र सापडलं की, कथा हवी तशी फुलविता येते.'

*वात्स्यायनाच्या मनात आले, मूळसूत्र खरंच ! आपल्याला कुठे* सापडलाय मूळसूत्र. कदाचित त्यामुळेच आपणास ग्रंथाबद्दलचा आत्मविश्वास येत नसेल. बाभ्रव्याने कोणते मूळसूत्र धरले होते ?

कथाकथनानंतर दोघे गावातील वेगवेगळे पथ हिंडत, पेयागारात पेय घेत, नागरिकांशी बोलत उभे राहत, कोण काय म्हणतंय हे ऐकत निघाले. पण कुठेही कुणी कथ्थकाची कथा ऐकल्यावरून, असं एक तरुण जोडपं गावातून गेलं, किंवा रूपणिका चंद्रकेतुसारखं एक जोडपे इथे राहताय, किंवा रूपणिकासारखी तरुणी अमक्याकडे दासीकर्म करते, असे बोललेले त्यांनी ऐकले नाही. कथ्थक म्हणाला,

'दोघे वेणुग्रामात नाहीत हे निश्चित. तरी निराश होण्याचे कारण नाही. अजून वेंगी आहे, पिष्टपुरा आहे, ययातिनगर आहे. नंतरची ताम्रलिप्ती नगरी तर अवंतीएवढी नसली तरी विस्तीर्ण आहे. तेथे शोध घ्यायला एक मास लागेल.' ◘

---

## पुन्हा वेणुनाद

---

अजून वेंगी आहे, पिष्टपुरा आहे असा कथ्थकाने धीर दिला होता. पण वेंगी मागे पडले, पिष्टपुर सोडले तरी, अंगरिक्ष-वासंतिका कुणाचा कानोसाही नव्हता. या दोन्ही गावात ते एकेकच दिवस राहिले. आता ययातिनगरकडे वाट चालू झाली.

दोन्ही गावी कथ्थकाने अंगरिक्षाची कथा सांगितली होती. ताम्रलिप्ती नगरीला पोहोचेपर्यंत ती त्याला ठाकठीक बसवायची होती. *या कथेशिवाय त्याने दुसऱ्याही कथा सांगितल्या होत्या.* त्याच्या कथाविषयीचे वात्स्यायनाचे आकर्षण सारखे वाढतच गेले होते. काय सुंदर कथा सांगतो असे वाटता वाटता त्या कथांतील कल्पनांतूनच कल्पना मिळून वासंतिका अंगरिक्ष का सापडू नयेत असे वाटू लागले होते. स्वप्नसृष्टी जर काही वेळा खरी ठरते, तर कल्पनेची सृष्टीही एखादे वेळी खरी ठरेल. म्हणतातच की, जडसृष्टीला मन कारक आहे. पक्षी, दगड, वृक्ष सगळे मनाचे व्यापार आहेत. अशी एखादी कल्पना निघेल की, ती वासंतिका अंगरिक्ष यांना प्रत्यक्षात पुढे उभे करील.

काहीतरीच मनात येत आहे, वात्स्यायन स्वतःशी म्हणाला होता. काहीतरीच. दोघे सापडणार नाहीत या भीतीपोटी मन भरकटू पाहताय. तू हताश झाला आहेस इतकंच. काय झालं आहे सांगतो, असंख्य योजने तू चालून आलास. मार्गातील प्रत्येक पुढच्या गावी दोघे सापडतील असे वाटत होते. *गावात आल्यावर तेथील तलावा*वर, देवळात हाटात, वळणावर ती उभी दिसतील या आशेत तू होतास. तसे झाले नाही. सापडणे क्रमप्राप्त आहे—कथ्थक म्हणाला पण तेही घडलं नाही. शोध तुला निरर्थक वाटू लागला. मग तू कथ्थकाच्या कथांत रमू लागलास. तू कल्पना करून घेतलीस की, त्या कथा चिवडून दोघांचा शोध लागेल. लक्षात ठेव. गावोगावी धुंडणं, पाहणं, विचारणं, ऐकणं हाच खरा शोध घेण्याचा मार्ग आहे. अरे काल्पनिक कथांचा काय उपयोग ? मंत्रतंत्रासारखी त्यानेही कामे होत नाहीत. कामसूत्रातील आचार्य कुचमारच्या औपनिषधिक *अधिकरणात दुर्बल कामेच्छा असलेल्याची कामशक्ती वाढवणाऱ्या* औषधी आणि गंडेदोरे दिले आहेत. त्यावर तुझा विश्वास असेल तर या कथांवर विश्वास ठेव. जर सरळ शोध घेणं तुला जमत नसेल, तर मागे फीर नाही तर डोक्यात भाकड कथा घोळवून डोकं फिरवून घेशील.

शेवटी ययातिनगरला अंगरक्षि वासंतिक सापडली.

ययातिनगरला दोघे दोन प्रहरी पोहोचले. गावाबाहेरच्या शंकराच्या देवळात ते उतरले. आता प्रवासाचा थकवा रोज वाढत होता. देवालयाच्या आवारात कथ्थकाने चूल पेटवली आणि भात वैरला. वात्स्यायन तोपर्यंत पुष्करणीवर जाऊन स्नान करून आला. त्याचे शरीर कृश झाले होते आणि उन्हा-पावसाने वर्ण काळा पडला होता. आपल्या शरीराकडे पाहण्याचे त्याने केव्हाच सोडून दिले होते. हे शरीर आपले नव्हेच. नगरच्या वात्स्यायनाचे सुवासिक तेलाने मर्दन केलेले, उटी लावलेले, उष्ण पाण्याने हलके केलेले, चंदन लावलेले ते शरीर वेगळे.

त्याला आपला घरचा दिनक्रम आठवला. आता पुन्हा तो केव्हा करू कुणास ठाऊक? आपण सूर्योदयाबरोबर उठत होतो. शौच मुखमार्जन व स्नान करून मस्तकावर गंध लावून सुवासिक धुपांनी केस सुगंधित करून, तोंडावर मऊ मुखलेप लावून, अळत्याने नखे व बोटे रंगवून, तांबूल खाऊन बाहेर पडत होत होतो. प्रतिदिन स्नान, एका दिवसाआड अंगमर्दन, प्रत्येक तिसऱ्या दिवशी रिठ्याचे स्नान, चौथे दिवशी गुप्तांगावरील केस काढणे आणि सतत खाकेत सुगंधीत पूड लावीत राहणे.

या दिनक्रमात किंचितही खंड पडलेला आपल्याला चालत नसे. त्याला आठवले. आता तो दिनक्रम केव्हा आरंभ करू कुणास ठाऊक? पण करू. आपल्या चरबरीत शरीरावरची धूळ चोळीत तो स्वतःला म्हणाला, तैलमर्दन करून कातडी मऊ करू, अळता लावू. केस सुवासिक तेलाने काळे तुकतुकीत करू. केवळ परिस्थितीने आपण मलिन झालो आहोत. मनाने नाही. पुन्हा एकदा आपली पत्नी आपल्याला अभ्यंगस्नान घालील. पुन्हा एकदा तिच्या आलिंगन चुंबनात आपण सुख पावू. आज मलिन झालो म्हणून शरीर सुंदर ठेवणे त्याज्य ठरत नाही.

भोजन आटोपल्यावर दोघांनी देवळाच्या ओवरीत आपले श्रांत देह निद्रेच्या आधीन केले. सूर्यास्ताच्या सुमारास वात्स्यायन एकाएकी जागा होऊन बसला झाला. आपण कशाने जागे झालो त्याला कळेना. मग स्थिर चित्त करून ऐकू लागला. किंचित काळ ऐकून एकदम कथ्थकाला उठवीत म्हणाला,

'कथ्थक! जागा हो. बसला रहा आणि ऐक.'

कथ्थक गडबडून बसला झाला आणि काही वेळ ऐकत म्हणाला,

'कुठे काय?'


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

वात्स्यायनाने विचारले,

'तुला वेणुनाद ऐकू येत नाही.'

'येतोय खरा.'

'अरे! मी निश्चितपणे सांगतो, हा अंगरिक्षाचाच वेणू आहे. अंगरिक्ष सापडला निश्चितच. आणि वासंतिकाही. वेणूचा सूर आनंदी आहे. याच वेणूचा करुण स्वर मी अवंतीत ऐकला आहे. तेव्हा तू त्याला पाहायला हवा होतास. त्या दिवशी कुंजात तो कसा बसला होता सांगू! तुलाही करुणा येऊन माझ्याप्रमाणेच चार गोष्टी तू त्याला सांगितल्या असत्यास. मीच त्याला सांगितले–कोणतीही नायिका योग्य अनुनय केल्यास असाध्य नसते–मीच त्याला आणि वासंतिकेला उद्यानयात्रेस उद्युक्त केले. मीच सांगितल्यावरून त्याने धैर्य घेऊन वासंतिकेच्या खोड्या काढल्या. मी केव्हाच ओळखले की, त्याच्या वेणुवादनावर ती प्रसन्न आहे. दोन प्रेमी जीव एकत्र आणण्यात केवढा आनंद असतो? त्यांना केव्हा जवळ घेईन असं मला झालंय.'

बोलता बोलता वात्स्यायनाने कथ्यकचा हात धरून त्याला उठवले. ज्या दिशेने वेणुनाद येत होता त्या दिशेला जाता जाता वात्स्यायन मोठ्या हर्षित मनाने बोलत होता,

'कथ्यका! प्रवासाने आपली काय अवस्था झाली आहे बघ. ते तर कोवळे जीव. अरे, ती सुकुमारी कोमेजली असेल. जी जन्मापासून अवंतीत प्रासादतुल्य घरात राहिली. अवंतीतल्या हाटात मिळणारी उत्तमोत्तम वस्त्रे ती ल्याली, जिच्या घरी रथ, घोडे, हत्ती आहेत, मोठा उद्यान आहे, अनेक दासदासी आहेत तिला या कुग्रामात, अरण्यात काय कष्ट झाले असतील? तो अंगरिक्ष तरी सुकुमार!'

बोलता बोलता दोघे आंब्याच्या वनातून जात राहिले. वनापलीकडून वेणुध्वनी येत होता. ते पुढे जात होते तसतसा तो अधिक स्पष्ट ऐकू येऊ लागला. वनाच्या शेवटच्या आम्रवृक्षाशी येऊन वात्स्यायन थबकला.

समोर तृणाच्छादित भूमी पसरली होती. त्या भूमीवर एक पर्णकुटी होती. पर्णकुटीच्या सभोवती नाना रंगी सुमनांचे ताटवे होते. मावळत्या सूर्याच्या लाल, पिवळ्या प्रकाशात देखावा न्हाऊन निघाला होता. पर्णकुटीवरचे गवत सोन्यासारखे चकाकत होते. पर्णकुटीसमोरचे अंगण शेणाने सारवलेले होते आणि तेथेच एक शिलेचे आसन होते.

शिलेच्या आसनावर बसून अंगरिक्ष वेणू वाजवीत होता.

वेणूच्या गोड सुरांनी वातावरण भरून गेले होते. वात्स्यायन अंगरिक्षाकडे अनिमिष नेत्रांनी पाहत राहिला. एका वर्षात तो प्रौढ आणि तेजस्वी झाला होता. वेणूच्या नादात त्याने डोळे मिटलेले होते.

इतक्यात पर्णकुटीतून 'अंग! अंग!' हाका मारीत वासंतिका बाहेर आली. वेणू बाजूला करून अंगरिक्षाने तिला मांडीवर बसवले. त्यांच्यात काहीतरी विनोद झाला आणि दोघे खळखळून हसली. मग तो पूर्व दिशेने आलिंगन देत असता वासंतिकेने आपले मुख वर केले. अंगरिक्षाने तिच्या ओठावर ओठ टेकले आणि त्याच अवस्थेत दोघे जरा वेळ राहिली. त्यावेळी सोनेरी प्रकाशात ते दोन सुवर्णाचे रतिमदनाचे पुतळेच आहेत असे वात्स्यायनास वाटले.

मधे एकदा ओठ दूर करून दोघांनी परस्परांकडे पाहत स्मित केले आणि पुन्हा एकदा दोघे दीर्घ अशा चुंबनावस्थेत गेली. कितीतरी वेळ ते हळूहळू डोकी डुलवीत, परस्परांच्या ओठांच्या विविध हालचालींतून परस्परांच्या नितांत प्रेमाचा ठाव घेत होती.

आणि तो न लागल्यानेच की काय, वासंतिका उठली आणि शिलेवर निजून तिने आपले शिर अंगरिक्षाच्या मांडीवर विसावले. मग काही वेळ बोटांनी तिच्या केसांशी, ओठांशी, गालांशी खेळ करीत, तीही उंच केलेल्या एका हाताने त्याचे मुख कुरवाळीत परस्परांच्या डोळ्यांत पाहत राहिली.

हळूहळू सूर्य अस्ताला गेल्याने त्याने आपले सुंदर वस्त्रही आपल्यामागे ओढून घेतले. अंधार पसरू लागला तरी, वात्स्यायन अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी ते मनोहारी दृश्य पाहत उभा होता. मग तो झाडापासून मागे वळला आणि अगदी हलक्या पावलांनी आंबराईतून परत निघाला.

आंबराई संपेपर्यंत कथ्थक त्याच्यामागे चालत होता. मग त्याच्या बाजूने चालत राहिला. मंदिराशी आल्यावर वात्स्यायन म्हणाला,

'कथ्थका! उद्या सूर्योदयापूर्वी हे गाव सोडावयाचे. तू नवल करीत असशील की, इतकी योजने पायपीट करून, दोघे समोर आली असताही हा वात्स्यायन त्यांना न नेता परत का फिरला? अरे! पाहिलंस ना, दोघे किती आनंदोत्सवात होती! माझी हाक त्यांना अशुभ पक्षाच्या ओरडण्यासारखी वाटली असती. मी त्यांना घेऊन जाण्यासाठी आलो. पण विचार आला; कशासाठी त्यांना परत न्यावयाचे? आम्हाला वाटतंय, अवंतीत त्यांना सुख होईल म्हणून? मी सांगतो, ते तिथं दुःखी होतील. अवंतीतल्या कोंडलेल्या वातावरणात ही फुलं कोमेजून जातील. त्यांनी आपले सुख ठरविले आणि मार्गही काढला. माझा त्यांना आशीर्वाद आहे. कथ्थका! तूही त्यांना आशीर्वाद दे.'

कथ्थकाने 'तथास्तु' म्हटले आणि वात्स्यायनाचे सूर पुन्हा ऐकू येऊ लागले. वात्स्यायन म्हणाला,

'ऐक! त्याच्या वेणूचे सूर आपल्याला म्हणताहेत, आम्ही दोघे सुखात आहोत, आनंदाने घरी जा,'

[क्रमशः]

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

इंग्रजी ग्रंथ परिचय

# यस्टरडे अँड टूडे–
# के. पी. एस्. मेनन

श्री. के. पी. एस. मेनन हे भारतातले अग्रगण्य राजकीय मुत्सद्दी. आज केरळमधल्या शांत वातावरणात निवृत्तीचे आयुष्य जगत असलेले श्री. मेनन चार-पाच वर्षांपूर्वीपर्यंत भारताच्या परराष्ट्र व्यवहारात अत्यंत क्रियाशील भाग घेत होते. 'इंडिअन फॉरिन सर्व्हिस'मधल्या आपल्या नोकरीत त्यांनी अनेक देशांत भारताचे राजदूत म्हणून काम केले. सोव्हिएट–युनिअनमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम करत असताना या दोन देशांमध्ये त्यांनी जे दृढ मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले ते अद्याप कायम आहेत. अशा या राजकारण कोळून प्यालेल्या आणि अक्षरश: बारा देशांचे पाणी चाखलेल्या या राजकारण मुत्सद्द्याचा 'यस्टरडे अँड टूडे' हा लेखसंग्रह.

या लेखसंग्रहात श्री. मेनन यांनी विविध विषयांवर वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या वृत्तपत्रांत लिहिलेले लेख पुनर्मुद्रित करण्यात आले आहेत. सामान्यत: अशा तऱ्हेचे घटनात्मक विषयांवर लिहिलेले लेख काही काळानंतर संदर्भबदलामुळे वाचकांस कंटाळवाणे वाटतात. पण या लेखसंग्रहातील एकाही लेखाची गोडी काळ उलटल्यामुळे कमी झालेली नाही, हे लेखकाचे श्रेय. सिद्धहस्त लेखणी, विषयाचे सखोल ज्ञान आणि कसलेले अनुभव यांमुळेच हे शक्य झाले आहे.

या लेखसंग्रहातील ४३ लेख दोन भागांत मांडण्यात आलेले आहेत. पहिल्या भागात आठवणी आहेत, तर दुसऱ्या भागात अनुभव. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच्या अनेकविध आठवणी श्री. मेनन यांनी पहिल्या भागात रंगवल्या आहेत, तर प्रामुख्याने बांगला देश युद्धानंतर घडलेल्या घटना त्यांनी अनुभवांच्या स्वरूपात निवेदन केल्या आहेत. या भागातले लेख मुख्यत्वे तात्कालिक प्रश्नांवर लिहिले गेले आहेत. व्हिएटनाममधील युद्ध व शांतता, बड्या राष्ट्रांची मैत्री आणि तंटे, विकसनशील राष्ट्रे आणि विकसित राष्ट्रे यांच्यातील नैसर्गिक साधनसामग्री आणि तेलावरून होणारे वाद, भारताचा अणुस्फोट आणि परराष्ट्र संबंध, आपले शेजारी यांसारख्या विषयांवर श्री. मेनन यांनी अत्यंत उद्बोधक विवेचन केले आहे.

श्री. मेनन यांना नोकरीमुळे अनेक देशांत स्थायिक व्हावे लागले. भारताचे राजदूत असल्यामुळे भारताच्या आणि इतर अनेक देशांच्या वरिष्ठ पदांवरील व्यक्तींशी त्यांचा निकटचा संबंध आला. आपल्या लेखांमधून श्री. मेनन यांनी या व्यक्तिमत्त्वावर कळत नकळत बराच प्रकाश टाकला आहे. एकमेकांपासून अत्यंत भिन्न अशी ही व्यक्तिमत्त्वे. उदाहरणार्थ, जवाहरलाल नेहरू आणि श्रीमती इंदिरा गांधी, सर्वपल्ली राधाकृष्णन आणि व्ही. के. कृष्ण मेनन, निकोलस रिओरिक आणि सॉमरसेट मॉम, म्युरिएल लेस्टर आणि मादाम व्हॅलेंटिना तेरेश्कोव्हा अशी अनेक व्यक्तिचित्रे आपल्याला या लेखसंग्रहात आढळतात.

श्री. मेनन यांची लेखणी अक्षरशः सिद्धहस्त आहे. स्वत: राजकीय मुत्सद्दी असूनसुद्धा त्यांनी आपले लिखाण केवळ राजकारणापुरते मर्यादित ठेवलेले नाही. या लेखसंग्रहात त्यांनी जीवनातल्या सर्व अंगांचा परामर्श घेतलेला दिसतो. मुख्यत्वे पहिल्या भागात त्यांनी आपली लेखणी भारतीय संस्कृती-दर्शनापासून ते 'इंग्लिशमन आणि रशियन्स'च्या स्वभावचित्रणापर्यंत चालवली आहे.

श्री. मेनन यांच्या लिखाणाचे विविध पैलू, तसेच विविध विषयांवर लिहिताना त्यांची वेळोवेळी बदललेली मन:स्थिती याचेही दर्शन आपल्याला हे लेख वाचताना होते. आपल्या जन्मगावावर 'माझी जन्मभूमी' हा लेख लिहिताना १९७४ सालीसुद्धा हा मुत्सद्दी आपल्या बालपणात पार हरवून गेलेला दिसतो, तर 'आपले काय चुकते आहे,' हा लेख लिहिताना त्यांची भाषा फारच कडवी आणि कठोर बनली आहे. डॉ. राधाकृष्णन यांच्यासंबंधी लिहिताना ते भावविवश होतात, तर डॉ. किसिंजर आणि ब्रेझनेव्ह यांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांच्यातला चिकित्सक जागा झालेला दिसतो.

या सबंध लेखसंग्रहाला एक संथ सूर आहे, याचे कारण श्री. मेनन मुत्सद्दी असले तरी, मुळात ते 'कमिटेड' आहेत. त्यांच्या प्रत्येक लेखात त्यांना स्वत:चे काहीतरी सांगायचे आहे. काही ठिकाणी ते नकळत सांगून गेले आहेत, तर काही ठिकाणी त्यांनी म्हणणे अत्यंत स्पष्टपणे मांडले आहे. यामुळे या लेखांवर एक प्रकारची सावली पडली आहे. लेखातल्या प्रत्येक ओळीत श्री. मेनन गुंतलेले आहेत.

इतके मात्र खरे की, भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणाऱ्या नव्या विद्यार्थ्याला हा लेखसंग्रह बरीच मदत करणारा आहे. तसेच जुन्या आठवणींवर जगणाऱ्या अनेकांच्या स्मृतींना हा संग्रह पुन्हा उजाळा देणारा आहे.

–भारतकुमार राऊत

## The Memory Book–

By Starry Lorayne and Jerry Lucas
(A Ballantine-Nonfiction Book
New york
Pages 206, Rs. 18–35).

आपली स्मरणशक्ती कशी वाढवावी याबद्दल या पुस्तकात बऱ्याच सूचना दिल्या आहेत. आणि ज्यांना खरोखरच स्मरणशक्ती वाढवायची आहे त्यांना हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल.

बऱ्याच वेळा आपण रेफ्रीजरेटरचे दार उघडतो आणि मधेच कुणाशी बोलतो. काय वस्तू घ्यायला दार उघडले ते आपणास थोडा वेळ आठवत नाही. आता समजा तुम्ही दुधाचं पातेलं काढण्यासाठी रेफ्रीजरेटरचे दार उघडायला जाता. त्यावेळेला तुमच्या तोंडावर रेफ्रीजरेटरमधील पातेल्यातून भरपूर दूध उडत आहे असे स्पष्ट चित्र तुम्ही डोळ्यासमोर आणलेत, तर तुम्ही दारापाशी काय घ्यायला आलात ते कधीच विसरणार नाही. स्मरणशक्तीची साखळी ही association ने (संगतीने) बांधलेली असते. ह्याचे उदाहरण म्हणजे दुसऱ्याच्या खिशातले पत्र बघून आपणास एकदम आठवते की, आपले पत्र

पोस्ट करायचे राहिले आहे.

चला तुम्हाला आत्ताच पटवून देतो की, या पुस्तकात किती चमत्कार भरला आहे. पण अगदी निवांतपणा हवा. तो रेडिओ चालू असेल तर बंद करा. 'इडियट बॉक्स' (म्हणजे TV !) समोर तर अजिबात बसू नका. (TV विषयीचं हे Phrase तर आपल्याला फार आवडले बुवा.) हातात वही आणि पेन्सिल घ्या. मुद्दाम लेखकाचेच शब्द खाली वापरतो म्हणजे जर तुम्ही हे पुस्तक कधी वाचले, तर तुम्हाला ते शब्द जसेच्या तसे आठवतील. फक्त एकच शब्द बदलला आहे आणि तो आहे Salami म्हणजे sausage. आता ही सलामी कधी पाहिली नाही. मला फक्त माणूसचीच 'सलामी' योजना माहिती आहे !

समजा तुम्हाला खालील दहा शब्द क्रमाने स्मरणात ठेवायचे आहेत. विमान, झाड, लिफाफा, इअरिंग, बादली, गाणे, बास्केट बॉल, केक, तारा, नाक. आता पहिल्या दोन शब्दांचे तुम्ही एक अशक्य, अतीरंजित, आणि हास्यास्पद चित्र डोळ्यासमोर उभे करा. लक्षावधी झाडे विमानात प्रवास करण्यासाठी भराभर चढत आहेत असे चित्र चालेल. पण ते तुमच्या डोळ्यासमोर अगदी स्पष्ट हवे. त्या चित्रात action सुद्धा हवे. (चित्रात काहीतरी जोरात हालले पाहिजे.) पुढचा शब्द आहे लिफाफा, तर शेवटचा आहे झाड. तर यामध्ये परत अशक्य, हास्यास्पद असे चित्र तुमच्या मनात आणा. झाडावर बरेचे लिफाफे उगवले आहेत व ते हवेने जोरात हालत आहेत हे चित्र चालेल. नंतर थोडा वेळ थांबा. प्रत्येक वेळा associate करताना जरा थांबा. आता पुढचा शब्द आहे इअरिंग आणि शेवटचा लिफाफा. तर आता क्षणभर लिफाफ्यातून हजारो इअरिंग्ज उडत आहेत. किंवा तुम्ही इअरींगऐवजी लिफाफे कानात घातले आहेत असे चित्र डोळ्यासमोर ठेवा. चित्र जरी एक क्षणभर दिसले तरी पुरे आहे. जास्त प्रयत्न करायाची जरुरी नाही.

तुम्ही इतर कोणतेही हास्यास्पद चित्र केले तरी चालेल. आता आपल्याला 'बादली' आठवायची आहे. तर इअरिंग आणि बादली मध्ये association लावा. एका राक्षसी बादलीने राक्षसी इअरिंग्ज घातले आहेत हे चित्र मनात बघा.

आता पुढची वस्तू आठवायची म्हणजे गाणे, आणि शेवटची वस्तू बादली याच्यामध्ये association लावा. आता बादली जोरजोराने तोंड वेंगाडून शास्त्रोक्त संगीत गात आहे असे मनात बघा. परत एकदा सांगतो की, चित्र क्षणभरच बघा पण स्पष्ट बघा.

आता पुढचा आयटेम म्हणजे बास्केटबॉल. समजा कुणीतरी भाषण देत आहे किंवा गात आहे व त्याच्या तोंडातून शब्दांऐवजी बास्केटबॉल निघत आहेत !

आता आला केक. केकनी कुणी बास्केटबॉल खेळतं का ? पण येथे तसंच चित्र डोळ्यासमोर उभे करा, किंवा एक अजस्र केक आहे, त्याच्यामधे भोक आहे व त्याच्यातनं हजारो बास्केटबॉलची उधळण होत आहे. मनात झाले चित्र तयार ?

आता तारा. आकाशात ताऱ्यांच्याऐवजी केक लुकलुकत आहेत असे समजा किंवा तुम्ही केकच्याऐवजी तारा कापत आहात हे चित्र बनवा. शेवटी समजा कुणाच्या नाकात लुकलुकणारा ताराच बसवला आहे.

आता या चित्रात दहाही शब्द आहेत.

पहीला आहे विमान. त्याच्यामुळे तुम्हास झाडाची आठवण होईल. लक्षावधी झाडे विमानात चढत आहेत. आता झाडाबद्दल विचार करा म्हणजे लिफाफ्याची आठवण होईल. लिफाफ्याची आठवण झाली की, तुम्हाला लिफाफ्यातून हजारो इअरिंग्ज उडताना दिसतील आणि इअरिंग्जची आठवण झाली की बादली आठवेल व बादली आठवली की, गाणे आठवेल. गाणे आठवले की, बास्केटबॉल आठवेल. बास्केटबॉल तुम्हाला केकची आठवण करून देईल व केक तुम्हाला ताऱ्याची आठवण करून देईल व शेवटी ताऱ्यामुळे तुम्हाला नाकाची आठवण निश्चितच येईल.

चला घ्या आता कागद पेन्सिल व सुरुवातीपासून दहाही शब्द टिपून घ्या. जमत नसल्यास परत एकदा वाचा. अजून जमत नाही ? आणखी एकदा डोळ्यासमोर चित्रे बघून वाचा ! आले आता अनुक्रमे १० शब्द ? आहे की नाही चमत्कार ? आता कसेही करून हे पुस्तक विकत घ्या. पाहिजे तर एक वेळ हॉटेलात जाऊ नका, व दोन पिक्चर्स कमी बघा ! विद्यार्थ्यांना, धंदेवाईकांना व नोकरीवाल्यांनासुद्धा याचा फार उपयोग होईल. एखाद्या लेखकाने त्याचे मराठीकरण केल्यास जास्त लोकांना त्याचा उपयोग होईल.

आधी मला वाटले हे faddist अमेरिकन लोक. काय असणार या पुस्तकात. आणि त्या दोन लेखकांतला तो जेरी ल्युकास. अगदी ६ फूट आणि वर ८ इंच उंच! किती कॅलरीज् जात असतील रोज त्याच्या पोटात ? ६ ते ७ हजार. लहानपणापासून किती पोषक अन्न मिळाले असेल त्याला. म्हणूनच त्याला जास्त आठवत असेल. पण पुढे वाचलं तर दुसरा लेखक हॅरी लॉरेन ५ फूट ६ इंचच उंच ! म्हणजे त्यांच्या मानाने थोडा बुटकाच ! आणि मग मी स्वतः पुस्तकातले काही प्रयोग करून पाहिले. मी तर फक्त २ ते २॥ हजार कॅलरीज् घेतो, परंतु मला बरेच प्रयोग जमले. अर्थात् पौष्टिक आहारावर मेंदूची कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणावर अवलंबून आहे म्हणून हे लिहीतो. परंतु ज्यांची स्मरणशक्ती average आहे ती या पुस्तकाने कितीतरी पटीने वाढेल.

लवकर वाचन (speed reading) कसे करावे, आकडे लक्षात कसे ठेवावे व इतर अनेक सूचना या पुस्तकात आढळतील.

मी माझे आत्मचरित्र एक दिवस लिहायला घेणार आहे. धंद्यात व खाजगी जीवनात असे अनेक प्रसंग येतात की ज्याची नोंद करून ठेवावीशी वाटते. पण बऱ्याच कारणांमुळे ते जमत नाही. आता मी या सिस्टिमचा उपयोग करायला लागलो आहे तेव्हापासून बऱ्याच गोष्टी लक्षात रहायला लागल्या !

आणखीन एक उदाहरण सांगतो. तारीख १–८–७६ रविवारला पुण्याच्या मुळामुठेला महापूर आला. त्यावेळी आमच्या वाचनालयाचे सर्व कामगार गैरहजर होते. दुसऱ्या दिवशी सुमारे ६०–७० लोकांनी वाचनालय कां बंद होते व आता ते प्रत्येक १ तारखेला बंद ठेवणार कां असे प्रश्न विचारून बेजार करून सोडले. वाचनालयाचा धंदाच असा आहे की, वाचकांची कितीही सेवा केली, तरी थोडसं चुकलं तरी नेमकं त्यावरच बोट ठेवलं जाईल. आता समजा मला आत्मचरित्रात या प्रसंगाची आठवण करायची आहे तर मी मनात असे एक चित्र बघून ठेवले आहे. पाण्याचा एक भला मोठा लोंढा आकाशात उडत आहे. त्या लोंढ्यावर एक छोटी मुलगी

बसली आहे. तिच्या हातात तिच्यापेक्षा एक मोठी किल्ली आहे व त्या किल्लीने ती एक अगदी लहान कुलूप उघडण्याचा प्रयत्न करीत आहे व खाली पाण्यात १–८–७६ ही अक्षरे तरंगत आहेत !

पण लक्षात ठेवा. परत एकदा सांगतो. तुमच्या मनातले चित्र अतिरंजित, हास्यास्पद, अशक्य व action वाले पाहिजे !

पुस्तक वाचल्यानंतर सुरुवातीला माझ्या घरी व वाचनालयात कशी धम्माल उडाली ते सांगतो. पण चिकाटीने मी परत परत पुस्तक वाचले तो तो मला त्यातला मजकूर जास्त समजू लागला.

मला पुष्कळ वेळा बँकेतच जायचं आठवत नाही (म्हणजे पैसे काढावयाचे असतील तेव्हा !) एके दिवशी सकाळचे जेवण उरकून बँकेत जावयाचे होते. तर मी लेखकांच्या सांगण्याप्रमाणे मनात एक चित्र तयार केले. एका इमारतीच्या गच्चीवर भली मोठी तिजोरी आहे. तिजोरी इमारतीपेक्षा मोठी आहे. तिचे दार उघडे आहे व त्यातून नोटा अखंड उडत आहेत ! जेवण उरकल्यावर वाटलं ५–१० मिनिटं पेपर वाचून निघावे. मनात association तर बांधलेलं आहे म्हणून विसर पडणार नाही दहा एक मिनिटं गेली व ते चित्र परत आठवले. पण उडत्या नोटा हे चित्रं इतके सुखद वाटले की, घटकाभर डोळे मिटले. त्या नोटा अगदी मला कुरवाळू लागल्या व कधी नाही तेवढी शांत झोप बसल्याबसल्याच लागली ! थोड्याच वेळानं सौंच्या आवाजाने खडबडून जागा झालो !

बँकेत जायचं परत विसरलात ! पैसे हवेतच आज ! कोणत्या बेस्टसेलरचे विचार चाललेत ? वाचनालय उघडलेत तेव्हाच सांगितले होते की, पैशाची चणचण आता कायमचीच, आणि आता लिहायला लागलात म्हणजे विचारायलाच नको ! बारा हजार पुस्तकांचं शहाणपण डोक्यात आहे परंतु साध्या बारा व्यावहारिक गोष्टींचं नाही ! उठा, जा बँकेत !' आता मी काय सांगू स्वप्नात मी त्या नोटा पिशवीत भरत होतो!

आमच्या वाचनालयात एक 'लव्हली लेडी' (म्हणजे वर्गणीदारांपैकी !), 'लव्हाळी' व 'लोनली लेडी' (म्हणजे पुस्तकांपैकी) आहेत. आता त्या 'लव्हली लेडी'ला 'लोनली लेडी' हे पुस्तक रिझर्व्ह करायचे होते तर मी वरील पुस्तकांच्या नावाप्रमाणे काय association बांधले कोण जाणे, पण पुढच्या वेळी त्या लव्हली लेडीला 'लव्हाळी' पुस्तक हातात दिले !

एकदा तर कहरच झाला. काय चुकतं आहे तेच कळेना. फ्रॉईडच्या 'प्लेझर प्रिन्सिपल'प्रमाणे सुखद गोष्टी आपल्याला आधी आठवतात. म्हणून रेडिओ लायसन्सच्या रिन्युअलच्या आधी दहा दिवस 'लव्हसीन्स' रिन्यु करावयाचे असे ठरवून टाकले. झाले, आठ दिवसांनंतर नेमकी आठवण झाली की, 'लव्हसीन्स' रिन्यू करावयाचे. लागलीच सौ साठी एक प्रेझेंट घेतले व तिला सांगितलं, 'आठवलं की नाही तुझ्या आधी की आज लग्नाचा दिवस आहे ?' पुढे मला काय ऐकावं लागलं ते सांगत नाही. शेवटी मला कळलं की, फार घाईत पुस्तक वाचलं म्हणजे हे असं होतं.

जे. एन. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

1. The Ascent of Man–(Bestseller-Nonfiction Man's achievement from earliest days to the present period) J. Bronowski Rs. 90/–

**मराठी**

१. **नटश्रेष्ठ केशवराव दाते**–(चरित्रग्रंथ) संपादक : वि. वा. जोग रु. ४०/–
२. **ऑलिम्पिकची नवलकथा**–(ऑलिम्पिक सामन्यांविषयी कथा) भानू शिरधनकर रु. ८/–
३. **नदीची लेकरं**–(अनुवादित कादंबरी) पंढरीनाथ रेगे. रु. १०/–
४. **पराधीन आहे जगती**–(कादंबरी) सौ. शैलजा राजे रु. १३/–
५. **महावृक्ष**–(कादंबरी) सौ. इंद्रायणी सावकार रु. १२/–

¤ आमच्या यादीतील व परीक्षणामधील पुस्तकें आम्ही पुरवतो. (VP नाही)
¤ आपल्या पुस्तकांस आमच्याकडे उत्तम प्लॅस्टिक कव्हर्स टाकून कायम नवीन ठेवा.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**


# बालविकासासाठी कलाक्षेत्रातील कामगिरी

## अपेक्षा-अनुभव एक उद्‌बोधक परिसंवाद

**बा**लवाङ्मयाची एक नामवंत प्रकाशन संस्था 'अरगडे–कुलकर्णी'. संस्थेच्या दोनशे एकाव्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ठरलेला होता. बालवाङ्मयासंबंधी 'मॅजेस्टिक गप्पा' बालकुमार साहित्यसमेलन, कै ओक स्मृतिदिनानिमित्त साहित्यपरिषदेत चर्चा झालेली. तेव्हा ह्या समारंभाच्या निमित्ताने परिसंवादच आयोजित करावयाचा असेल, तर तो वेगळा असावा ही डॉ. म. वि. गोखले ह्यांची स्तुत्य कल्पना. त्या दृष्टीने 'बालविकासाच्या दृष्टीने विविध कलाक्षेत्रात झालेली कामगिरी' असा विषय देऊन विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींना त्यासाठी पाचारण केले. मुलांसाठी संगीत, चित्रपट, नृत्य, काव्य, नाट्य हे विषय बालवाङ्मयास तसे पुरकच. ह्या विषयातील अधिकारी व्यक्ती, कोल्हापूरचे श्री. बाबुराव जोशी, (संगीत), श्री. राम गबाले (चित्रपट), सौ. सुचेता जोशी (नृत्य), सौ. सरिता पदकी (काव्य), प्रा. मालबा केळकर (नाट्य) ह्यासाठी निमंत्रित केले. रविवार दि. २२ ऑगस्ट रोजी टिळक स्मारक मंदिराच्या आलीशान नाट्यगृहात रसिकांच्या उपस्थितीत परिसंवाद घडला.

मूल काही बोलण्यापूर्वी त्याच्या मनातील भाव बोट दाखवून, खुणावून, पर्यायाने हावभाव करून सांगते तेव्हा ही क्रिया नृत्यास अधिक जवळची. सबब प्रारंभी सौ. सुचेता जोशी ह्यांना नृत्यासाठी त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी विनंती करण्यात आली.

सौ. सुचेता जोशी म्हणाल्या, 'मनुष्य हा अनुकरणप्रिय असतो. हावभाव ही त्याची प्रथमची सहज प्रवृत्ती. मनामध्ये आनंदाचा जल्लोष झाला की, माणूस नृत्य करतो, नाचू लागतो. अगदी प्रथम जे नृत्य केलं गेलं ते पंचमहाभूतांना अभिवादन करण्यासाठी. कृतज्ञता व्यक्त करणं हा त्यामागील उद्देश. सांघिक नृत्यांतून गरीबी–श्रीमंती वा अन्य भेद विसरून एकदिलाने वागण्याची शिकवण मिळते. शारीरिक विकासालादेखील नृत्याची

मदत होते. लय व ताल हा नृत्याचा आत्मा. प्रारंभापासूनच ताल सांभाळला की, पुढे माणसाचा तोल जात नाही.' डोळे, हात, पाय, मान इ. विविध अवयवांना नृत्याद्वारे कसं चांगलं शिक्षण मिळतं याचं छोटसं प्रात्यक्षिक करून त्या म्हणाल्या, 'नृत्यातून बालकाची अभ्यासूवृत्ती वाढते. मनोविकास घडतो.' शेवटी पालकांनी आपलं मूल स्टेजवर चटकन आणण्याची घाई करू नये, तर नृत्यशिक्षकांनी कमी परंतु समर्थ शिष्य तयार करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

नृत्य म्हटलं की ताल आला. ताल म्हटलं की संगीत. अशी नर्मविनोदाने भरलेली खुसखुशीत मल्लीनाथी करून परिसंवादाचे सूत्रधार श्री. गोखले ह्यांनी श्री. बाबुराव जोशींना संगीतविषयक विचार व्यक्त करण्यास सांगितले. 'मुलांच्यावर बालवयातच संगीताचे संस्कार व्हायला हवे आहेत.' अशी प्रारंभासच अपेक्षा व्यक्त करून श्री. बाबुराव पुढे म्हणाले, 'साधा श्लोकदेखील भुजंगप्रयात चालीवर म्हटला तर गोडवा निर्माण होतो. मुलांच्या नकळत त्यांच्या कानावर रागदारी घालावी.' साकी दिंडीपासून ह्या रागदारीचा प्रारंभ झाला तरी चालेल असे सांगून प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात संगीताचा समावेश झाला पाहिजे असे त्यांनी आग्रहाने म्हटले. आजच्या शिक्षणाचे किमान ज्ञान मुलांना दिले जात नसल्याने पेटी व पियानो यांतील फरक कळत नाही. महाराष्ट्रात संगीताची उत्तुंग शिखरे आहेत पण तळात (मुलापर्यंत) काही नाही याबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राखेरीज राजस्थान, कर्नाटक इ. सर्व राज्यांतून घरोघर संगीत शिकविले जाते. डायरेक्ट मेथडने शिकविल्यास मुले सूर सांभाळतात, ताल राखतात. बालसंगीताच्या रेकॉर्डस् मुलांच्या कानी सतत पडल्यास त्यातील काहीजण संगीत विषयाकडे वळतील पण इतर सर्वांना 'संगीताचा कान' नक्की लाभेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

'मुलांना अभ्यासक्रमाच्या चक्रात गुंतवण्यात पालकांची अर्धीअधिक शक्ती खर्ची पडते. पै पैशाला सर्व गोष्टींचं मूल्यमापन करणारे काव्याचा उपयोग काय? असा प्रश्न जेव्हा उपस्थित करतात तेव्हा 'आपल्याला मनस्वी दुःख होते' असे तळमळीचे उद्गार सौ. सरिता पदकी ह्यांनी बालगीते काव्यविषयक विचार मांडताना काढले. 'आपलं आयुष्य समृद्ध व्हावं, कधी दुःखातून निर्माण झालेली कविता ते दुःख बाजूला जायला हवं हेच सांगते. जगातील सुंदर गोष्टींचा आस्वाद घेण्यासाठी, आनंदात नवीन जगण्यासाठी जीवन आहे हे कळण्यासाठी काव्याची गरज आहे.' असे त्यांनी म्हटले. 'मुलांना त्यांचे वाटेल ते बालगीत' हे भा. रा. तांबे यांचे मत सांगून त्यांनी बालगीत लिहिणाऱ्यांची परंपरा आता खंडीत होत असल्याबद्दल खेद व्यक्त केला. अंतराळवीरांना काही अनवस्था प्रसंग ओढवल्यास तुम्हाला अखेरीस कुठली गोष्ट हवी म्हटल्यावर त्यांनी 'कविता ऐकायला आवडेल' हे दिलेलं उत्तर ऐकवलं. सरिताबाईंच्या बोलण्यातून व्यक्त होत होती तळमळ. आंतरिक गरजेतून कविता लिहिणाऱ्यांची कशी उपेक्षा होते, काव्याकडे सर्वांचे कसे दुर्लक्ष आहे हेच त्यांनी मुख्यत्वे सांगितले.

नाटकाविषयी बोलताना प्रा. भालबा केळकर म्हणाले, 'नाटच उपजतच सर्वांच्या अंगी असते. लेखन व आविष्कार हा कलेचा भाग. तर मुलांची प्रवृत्ती नकलेची. आपण जे नाहीत ते दाखवण्याची व ते पाहून लोक (प्रेक्षक) फसले, तर यश मिळवल्याचा आनंद नाटकातून लाभतो. मात्र अभिनय ही लष्करी पद्धतीने शिकवण्याची बाब नसून मुलांमध्ये सेल्फ डिसिप्लीन निर्माण व्हायला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अभिनयाच्या शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे. निर्मितीची कल्पना मुलांच्या मनात वाढायला हवी याबद्दलची त्यांनी एका खलिफाची गोष्ट सांगितली. न्यायदानाच्या कामी खलिफाला जे सुचत नाही ते मुलांना सुचलं अशी ती कथा होती. बालनाट्यात काही पथ्ये पाळली पाहिजेत. मुलांवर संस्कार घडतील असं लेखन हवं. उद्धटासारखे उत्तर देऊन वाक्याला टाळी मिळवणारा परंतु ज्ञानेश्वरत्व गमावलेला ज्ञानेश्वर दाखवू नका असे त्यांनी सांगितले. रंगभूमीवरची नाती बाहेर नेली जातात, त्या दृष्टीने बालनाट्यात कोणते रस हवेत याचे पथ्य सांभाळावे. प्रसिद्धीच्या संदर्भात त्यांनी मुलाला कौतुकाची प्रसिद्धी मिळू द्या. वृत्तपत्रीय प्रसिद्धीच्या झोतात मुलांना कथासूत्र सांगून त्यांच्यातून नाटक फुलवून सादर करण्याच्या त्यांच्या नवीन प्रयोगाबद्दलची माहिती त्यांनी सांगितली. हा प्रयोग यशस्वी होतो हे रसिकांना ठाऊकच आहे. 'मुलांना चांगलं पाहायला आवडतं, तेव्हा संस्कारक्षम चांगलं नाटक दाखवा' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'दूधभात' फेम श्री. राम गबाले बालचित्रपटविषयक अनुभव सांगताना म्हणाले, 'आज मुलांना न कळणारं शिकवलं जातं. शब्दातून व्यक्त होणारा अर्थ न समजता त्यांना अभिनयाचं शिक्षण दिलं जातं ही खेदाची बाब आहे. मुलांना त्यांचं काही वाटेल असं शिकवा. त्यांच्यावर डायरेक्ट मेथडने तात्पर्य लादू नका. नाहीतर फसगत होते. त्याविषयी उदाहरण देताना त्यांनी श्रावणाची गोष्ट सांगणाऱ्या पालकाची हकिकत सांगितली. श्रावणाची गोष्ट सांगून झाल्यावर पालक म्हणाले, 'असं श्रावणबाळासारखं आई-वडिलांच्या सेवेत मग्न असावं लागतं' तर गोष्ट ऐकणारं बालक म्हणाले, 'बाबा, तुम्ही अन् आई आंधळे कुठं आहात?' मुलांना सहजपणे अनेक गोष्टी सुचत असतात. ते सहजपणे बोलतात. तेव्हा त्यांना अभिनय करण्याचं शिक्षण देण्याऐवजी ती भूमिका समजावून द्या. मुलं ती भूमिका जगतील. त्यांना शिकवण्यापेक्षा त्यांना त्या विशिष्ट मूडमध्ये मनाच्या अवस्थेमध्ये येऊ द्या. त्यातून दिसणारा अभिनय जिवंत असतो. मुलाला रुसवायचं आणि मग तो रुसल्याचं दृश्य टिपायचं अशी त्यांनी सूचना केली. चित्रपटाचं माध्यम, त्यातील गाणी यावर आक्षेप घेणारांना रामभाऊंनी फार समर्पक उत्तर दिलं. ते म्हणाले, 'चित्रपट हे शिक्षणासाठीदेखील अतिशय चांगलं, प्रभावी माध्यम आहे. लोकगीतांच्या चाली घेऊन तयार केलेली चित्रपटाची गाणी शैक्षणिक प्रचाराला कशी उपयुक्त ठरतात हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. चित्रपट माध्यम म्हणून वाईट नाही, तर वाईट चित्रपट हे वाईट आहेत असे त्यांनी सांगितले.

एकूण चर्चेचा सूर होता की, मुलांसाठी खूप काही करता येण्यासारखं आहे. तळमळीने कार्य करणारे आहेत, आणखी खूप हवेत. मुलांसाठी जे केलं जात आहे ते त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवं आहे. ही जीवाशिवाची भेट व्हावी असंच कोणीही सुजाण पालक म्हणेल.

—दत्ता श्री. टोळ

# कलोपासक पुरुषोत्तम

अरविंद भोमे

पुरुषोत्तम करंडक, आंतर महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा, भरत नाट्य मंदिरात दि.२४ ऑगस्ट ते १ सप्टेंबर ७६ पर्यंत रोज सायंकाळी सहा वाजता (वर्ष बारावे) साजऱ्या झाल्या. त्यात 'मा. प्रतिनिधी, संपादक माणूस' या तिकिटावर मी, उगाचच पत्रकारासारखा चेहरा करण्याचा प्रयत्न करीत बसलो होतो. फुकटच्या पासावर बसल्यामुळे कॉमेंटस् टाकता येत नव्हत्या. पण कसंही असलं तरी, उगाचच आपण कुणीतरी 'हे' असल्यासारखं वाटत होतं. (सोयीनं अर्थ लावावा.) तर सांगायचा मुद्दा हा की, त्यासंबंधीची ही प्रतिक्रिया एका खवट, जीवंत रसिकाच्या (कसचं! कसचं!) चष्म्यातून व्यक्त केली आहे. जीवंत आहे त्याला माझा नाईलाज, खवट आहे त्याला स्पर्धकांचा नाईलाज आणि प्रतिक्रिया वगैरे म्हणजे जीवंतपणीच्या खुणा! तेव्हा, नुसताच नाईलाज! असो तर आता स्पर्धेचं पद्धतशीर पृथक्करण की काय ते करू.

## लेखन–संहिता–स्क्रिप्ट वगैरे

एकांकिका म्हटली की, सर्वप्रथम विचार संहितेचा–म्हणजे चालू मराठीत स्क्रिप्टचा–करायला हवा. महाराष्ट्रीय कलोपासकांनी चांगल्या एकांकिकेच्या लेखनासाठी विद्यार्थी-लेखकांसाठी अनंत नारायण पारितोषिक ठेवलंय. यंदा लेखकांचं पीक भरपूर होतं. पाच इसमांनी या एकांकिका पाडल्या होत्या. त्यातली 'इस्पिक एक्का'–ले–दि. प्र. भू. संतोषी बैरागी (= सुरेश घाटगे?), आदर्श (बी. एड्.) कॉलेजनं सादर केली. गाढवे किती? कोणकोण? त्यांचे प्रकार किती? ती कशीकशी जन्माला येतात? मी कसकसा आणि का म्हणून गाढव आहे याविषयी मौलिक माहिती पुरविली. एवढंच नव्हे तर, प्रेमाचे त्रिकोण, चौकोन, पत्ते वगैरे गोष्टीविषयीसुद्धा *सामान्यज्ञानात* भर घातली. दुसरी असलीच एकांकिका, महाचालू (नौरोसजी वाडिया) संजय भोलेनं सादर केली (खरं तर, लादलीच). आणि तीही शुभारंभाचा शकुन म्हणून. रहस्यमय तरुणीचा खून–अर्थात् स्वप्न की सत्य' या नावाची आळेकरांची एकांकिका, (जी अडीच तास ताणून 'महापूर' जन्मलं) थोडंसं 'महानिर्वाण', चंदू काळेंची 'पाचर' या 'नव्या' नाटकांमधलं, *आणि मागच्या वर्षी याच स्पर्धेला* पडलेल्या पण एकमेव विद्यार्थी लेखन असल्यामुळे उत्तेजनार्थ 'पारितोषिक' मिळालेल्या 'तो डावा हात' मधलं–आपल्या बुद्धिमत्तेला पेलेल तेच उचलून लिहिलेली ही दुसरी पडीक एकांकिका. याच मालेतला तिसरा मणी बी. एम्. सी. सी. च्या नीलिमा पाठकची 'ओ माय लव्ह' तिच्यापेक्षा 'बडा कबुतर' 'द चिट उर्फ फरेबी' असले हिंदी पिक्चरही बरे. हीसुद्धा ले. दि. प्र. भू. च.! बी. जे. मेडिकलचा वेगळाच प्रकार; फक्त लेखक (नशीब) राजीव आडसर यांची 'अर्ध्यावरती', म्हणजे जीव नसलेल्या शब्दांचा तुफानी भडिमार. दुधारी पाती काय, पडका दीपस्तंभ काय, रडणारा नारळ काय, खच्चून थप्पी लावलेल्या अनंत नखरेल कविकल्पना. बी. जे. चा 'फोर्स' दांडगा होता म्हणून हे बिचारं काव्य वाचलं. गुळगुळीत निसरडी प्रतीकं–जी आता 'संगीत आणि बाल' नाट्यातही वापरत नाहीत अशी. आडकरांना प्रेमाची सूचना–काही दिवस थांबावं–शब्दांना अर्थ येईपर्यंत. रहाता राहिले प्रभाकर वाडेकर (बी. एम्. सी. सी.) 'अर्थ काय ह्या बेंबीचा विश्वचक्री?' असलं पुरेसं दुर्बोध नाटक त्यांनी मांडलं. बी. एम्. सी. सी. चा नेहमीप्रमाणं ऑडियन्समध्ये भरपूर बंदोबस्त होता. एका चाणाक्ष प्रेक्षकानं केलेली कॉमेंट ऐकवतो–'या नाटकातलं अहं ब्रह्मोऽस्मि, ॐ भूर्भुव: स्व: हे काही वाड्याचं नाही, लोकलमधून पडलेल्या माणसाचा किंवा दोन गेटच्या सरहद्दीवर पडलेल्या मुड्याची कल्पना 'जुलूस'ची. मग या स्क्रिप्टमध्ये वाडेकरांचं ओरिजीनल किती? फारतर चौदा ओळी.' हे वाडेकरच्या एका दोस्ताला सांगितलं. त्याचं उत्तर असं–'वाडेकरनं जुलूस पाहिलेलंही नाही आणि वाचलेलंही नाही.' कायतरी लोक एकेक. जिभेला काही हाड!

तर हे आमचे विद्यार्थी लेखक. आता आपल्या 'प्रथितयश' मंडळीकडे वळू तेंडुलकरांची 'बिचारे अप्पा बंड करतात' या नावाची सुमार एकांकिका गरवारे वाणिज्यने केली. ही तेंडुलकरांच्या उमेदवारीच्या काळातली एकांकिका असावी. दुसरी मतकरींची 'चित्रातलं घर' नावाची मॉडर्ननं केलेली. मतकरींनी ती का आणि कधी लिहिली कळत नाही. हरिहर देवस्थळीच्या घरातले पहिले काही प्रसंग वगळता बाकी सगळं बालनाट्यचं होतं. शन्ना नवऱ्यांची 'सकेत' गरवारे आर्टस्-सायन्सची–एक 'सपाट' एकांकिका. नाट्य कितपत प्लेन (सरळसोट) राहू शकतं याच्या मर्यादा असतात. पुंडलिकांची होय, विद्याधरच!) पैल तो गे काऊ' म्हणजे विद्यापीठ जिमखान्याचं मूकनाट्यच होतं. मला वाटतं, अरुण साधूंच्या कथेवरून माधव वझ्यांनी लिहिलेली 'क्रांतिदूत' नेसनं सादर केली. दिग्द. प्रकाश केणी (श्याम जोशी?) मूळ कथेचा 'फील' आणू शकले नाहीत हा दोष. मनोहर शहाणेंची 'लासट हिरव्या डोंगर रांगा' ही सुद्धा परिणामाच्या दृष्टिकोनातून फेल गेलेली एकांकिका. श्रीनिवास भणगे (महाबॅंक) यांच्या दोन एकांकिका 'फोन करण्यापूर्वी' (लॉ) आणि 'सिग्नल' (इंजिनिअर्स) पैकी पहिली 'अंधार योजनेमुळं' पडली आणि दुसरी 'प्रकाशयोजने' मुळं वाचली. दिलीप परदेशींचो 'आर् फॉर रॅगिंग' (लो. टि. आयुर्वेद) ही स्टेजवर खरोखर केलेलं रॅगिंग आणि मधू जोशींनी शेवटी केलेली इंदिराजींच्या भाषणाची ॲडिशन (?) वगळता फारच सुपरफिशीअल–सवंग वरवरची होती. वसुधा पाटीलांची एकांकिका 'एकटा' एस् पीयन्सनी आपण होऊनच पडू दिली. रमेश पवा-

र ची ( 'गुरू फ्रेम ) म्हँ हँ हँ ऽऽऽ' (–हे बकरीच्या आवाजात म्हणायचं. ) मात्र तिच्या मुक्तनाटयामुळं भाव खावून गेली. इंजिनीअर्स आणि अशोक जोशींनी त्यात सुरेख ॲडिशन्स केल्या. एक मातीशी प्रामाणिक 'माणदेशी' कथानक घेऊन आली वामन तावडयांची फिरंगी नावाची 'द कन्स्ट्रक्शन' दिग्द. प्रा. प्रकाश मिसाळ .(मधू जोशी ? ) कुंदन डांगीचा अभिनय यामुळं निर्दोष वठली. बिगारी मजुरांच्या व्यथा सांगणारी एकांकिका. 'अंकुर' (बेनेगल) मधल्या शबाना आझमीसारखाच श्रीमंताचा गर्भ वाढवणारी मजूर स्त्री, पहिली बायको रांड निघाली म्हणून ऑपरेशन करून घेतलेला तिचा नवरा कुल्लाप्पा, आणि मालकाचं पोर मालकाच्याच बिल्डींगसाठी दगड, विटा, रेती वाहू देत–' असं म्हणून 'पोर पाडू नको' सांगणारं त्याचं तत्त्वज्ञान ! –जीव आणि वेदना असलेलं हे ज़बरदस्त कथानक खरंतर पहिलंच बक्षीस मिळवेल अशी जवळजवळ खात्री होती. असंच दुसरं ताकदीचं स्क्रिप्ट अमोल पालेकरचं. ( अनुवादित सुरेंद्र वर्मा ) सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून सूर्योदयाच्या प्रथम किरणापर्यंत 'फर्ग्युसोनियन्सनी चांगल्या टीमवर्कनं सादर केलं. नियोग विधी–म्हणजे राजाला मूल होत नसल्यास राणी, आपल्या महान सांस्कृतिक रक्षणासाठी, मनपसंत नागरिकांची शय्यासोबत करून गादीला वारस देत असे म्हणे–त्याची टिपिकल 'सत्यदेव दुबे' स्टाईलनं हाताळलेला, सेक्स प्रॉब्लेम. शरीराच्या वासनेची शाश्वत भूक सांगणारी आणि माणसाच्या तळातले काही तलम धागेदोरे सूक्ष्म रीतीनं दाखवणारी एकांकिका. एक बारीक शंका अशी की या नियोग विधीबाबत गुप्तता पाळली जात असे ना ? नियोगी उमेदवार राजवंशातीलच असून या विधीनंतर तो राज्य सोडून जात असे ना ? अभ्यासूंनी ( वेळ मिळाल्यास ) छडा लावावा. अर्थात् हा प्रश्न वर्मा, पालेकरांपर्यंत पोचतो. तेव्हा जपून.

लेखनावर एवढं डिस्कशन करण्याची गरज काय ! तर बुवा आम्हाला आपलं वाटतं की मराठी एकांकिका ( निदान स्पर्धेतली ) प्रोटोटाईप–ठराविक साच्याची झाली. अर्थात् हे एक वैयक्तिक (म्हणजेच थोडक्यात त्याज्य) मत झालं. स्पर्धेतल्या एकांकिकेस सेक्स प्रॉब्लेम हवा, शिव्यांचा भडिमार, चटकन न कळेल अशी क्लिष्टता हवी असं किंवा या सारखं या 'लेखकूंचं' मत आहे की काय न कळे. पाचपैकी तीन विद्यार्थी लेखकांनी सेक्सला हात घातला आणि उरलेल्या दोघांनी तेवढं डेअरिंग न करता 'लव्ह स्टोरी' वर हौस भागवली. सेक्स असूच नये असं म्हणणं नाही. पण आमचं लाडकं नाटक तिथंच तुंबून राहू नये. साफ करणं हे ज्याचं त्याचं काम असो. भडक रंगाचा शौक एकंदरीतच फार. तेव्हा वेळीच काळजी घेतलेली बरी. दुसरी गोष्ट म्हणजे लोक 'लय् हिंदी पणा' करतात. सिनेमा आणि पुरुषोत्तम यातला फरक या पुर्षोत्तमांनी जाणावा. अभिरूची केवळ प्रेक्षकानांच असावी असा नियम नाही.

## अभिनय याने की ॲक्टिंग

पब्लिकच्या अभिनयाबद्दल बोलावं तेवढं थोडंच आहे. मूव्हमेंटस्चा हवा तो 'फिनिश' नाही, आवाजाला उंची किंवा खोली काहीच नाही, चेहरा हलण्याची तर बातच सोडा. काहींचा मात्र चेहरा हाड नसल्यासारखा हलतो–कापरं भरल्यागत. भिकार, शून्य अभिनय करणारी इसमंच मोजायची, तर बोटं दुखतील. पण तरीही पायगुडे (मॉडर्न), भरत शाह ( गरवारे ), मंगेश ठाकूर (एस. पी.), मनोज भिसे (काऊ), बोरसे (बी. जे) या लोकांनी हाईट गाठली. फुकाफुकी ओव्हर ॲक्टिंग करणारे आगरवाल (लॉ),हंवर्डे (नेस), घाटगे (आदर्श), खुर्जेकर (बृमकॉकॉ), संजय भोळे (नौरोसजी) या लोकांना 'लै येकदम्' अभिनय–बिभिनय करताना दम कसा लागत नाही देव जाणे. बी. जे. ची वैजू ठकार, BMCC ची नीलिमा पाठक, मॉडर्नची सुनंदा मराठे, अभिनवची पाटणकर या बायांनी तर फारच कमाल केली. खरंखुरं मेरिट दाखवणाऱ्यांची यादी करायची तर कुंदन डांगी (शाहू), अच्युत वाटवे ( इंजिनीअर्स ) या दोघांचे चेहरे आणि रंगमंचावरील हालचाली सुरेख होत्या हे निकाल पाहूनही सांगावंसं वाटतं. उदा. डांगीनं मांडलेली कल्लाप्पाची फिलॉसॉफी आणि वाटवेनं म्यँहँऽऽत केलेली धमाल–टी. व्ही, पुतळयाची चोरी वगैरे. प्रभाकर वाडेकरनं 'मोहन गोखले' उभा केला इतका की, पडद्यामागं पाहण्याची उपजत खाज असलेल्या आमच्या पत्रकारांनी मागं टी. ए. असल्याचा निर्वाळा दिला. बेअरिंगच्या दृष्टीनं उल्लेखनीय लोक म्हणजे मृदुला बेहेरे ( हिला अभिनयाला वाव नसताना त्याचं पारितोषिक मिळावं आणि दिग्दर्शनाचं पारितोषिक तिचंच असताना तिला मिळू नये म्हणजे कमालच ! ) फर्ग्युसनची, शाहूची रत्नमाला डांगे आणि हसबनीस, रवींद्र रामतीर्थंकर ( नेस ), साक्रीकर (आयुर्वेद) आणि दिपू फाटक–दिलीप कुलकर्णी (अभियांत्रिकी) यांची नावे घ्यावी लागतील. गरवारे कॉमर्सचा गंपा–विनायक पोतनीस–यानंसुद्धा चांगलं काम केलं. मुद्राभिनय आणि लाईट इफेक्टस् घेणे ह्या प्रकाराला एकंदरीत सार्वत्रिक दौर्बल्य होतं. शत्रुघ्न सिन्हा–आनंद पानसे (फर्ग्युसन); संजय भोळे (नौरोसजी), खुर्जेकर (BMCC) यांच्या रूपानं अवतरला, तर हॅम्लेट ईश्वर आगरवाल (लॉ) यांच्या रूपानं. मंगेश ठाकूर (एस. पी.) आणि मनोज भिसे (विद्यापीठ) यांना तर हिंदी पडद्यावरही तोड नाही.

एक प्रश्न असा निर्माण होतो की, ॲमॅच्युअर लोकांबद्दल इतकं तुटून पडावं का ? उत्तर सापेक्ष वाटेल तरीही द्यावंसं वाटतं ते हेच की, तुम्ही–आम्ही ॲमॅच्युअर हे सांगायला नकोच, पण ह्याच्या मुळाशी मेहनत करण्याची रंगभूमीशी निष्ठा कमी नाही ना, हे पाहायला हवं. का आपलं दरवर्षी प्रत्येक कॉलेजमधून 'घरटी एक' नियतकालिक निघतं तसं पुरुषोत्तमला पाटया टाकायच्या? युवक रंगभूमीनं हा आळस झाडला पाहिजे.

## दिग्दर्शन, प्रदर्शन आणि परिणामिकता

प्रेझेंटेशन आणि डायरेक्शनच्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाचं म्हणजे टीमवर्क. शाहू, फर्ग्युसन, बी. एम. सी. सी. ची 'बेबी' आणि इंजिनिअरिंगचं म्यँहँऽऽऽ ही चांगली उदाहरणं. त्याखालोखाल आयुर्वेदिक रॅगिंग, नेसचं क्रांतिदूत वगैरे. यातली सर्वांत मोठी टीम प्रभाकर वाडेकरची आणि सर्वांत सरस टीमवर्क मृदुला बेहरे आणि कंपनीचं (फर्ग्युसन) सूर्यास्तामधलं !

दुसरं महत्त्वाचं अंग म्हणजे माईम आणि हालचाली. म्यँहँऽऽऽमध्ये अशोक जोशीनी फक्त या गोष्टीचा पुरेपूर फायदा उठवला. बाकीचे लोक माईम (मूकाभिनय किंवा इमॅजिनेटिव्ह ॲक्टिंग) हा एक प्रेझेंटेशनचा, ताकदीचा

प्रकार न मानता चक्क स्टेजवरील सोय मानत होते. उदा. 'चित्रातलं घर' मधलं 'टेबल', इस्पिक एक्का मधले 'पत्ते' प्रकाश योजनेत तर लोकांनी इतक्या वेळा अंधार केले, कारण नसताना रंगीत दिव्यांची रोषणाई केली. अक्षरशः दहादहा वीसवीस वेळा अंधार केला की बुद्धिमत्तेची कमाल वाटावी. यातले आघाडीवरचे दिग्दर्शक बाळा देशपांडे लॉ (मधू जोशी), पद्माकर पंडित (बी.जे.), संतोषी बैरागी (आदर्श), प्रकाश केणी–नेस (श्याम जोशी), पन्नास मिनिटांच्या एकांकिकेत ही मंडईच्या गणपतीची रोषणाई आणि 'अंधेरनगरी'–चौपट इफेक्ट' पाहण्याचा जुलूम करता कशाला? संगीताच्या दृष्टीनंही 'म्यॅंहॅंऽऽ', 'सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून–' सरस होती. शाहूच्या क्रन्स्ट्रक्शननं घेतलेला रॉकेलच्या डब्यावर वाजवलेला ढोलकीचा आवाज तर फारच सुरेख. काही दिग्दर्शक लोक 'शिम्बॉल' तर फारच टेक्सास वापरतात. पंडित (बी. जे.) यांचं कॅक्टस् मिनीटात फूटभर वाढतं, देशपांडे (गरवारे) यांचा 'मृत्यू' नाहीनाहीते अलंकार घेऊन येतो, बाळाजी देशपांडे (लॉ) यांची रातराणी तीनतीनदा लाल डोळे मिचकावते, नीलिमा पाठक. (बी. एम्. सी. सी.) उगाचच एक पायऱ्यांची चळत लावते अशी हजार नाटकं.

लैव्हलस् आणि डेडोजे कसे वापरावेत याविषयी तर बोलायलाच नको. यातही परत बी. जे. चे पंडित, आदर्शचे बैरागी, पाठकबाई, होतेच. तर आयुर्वेदच्या हेमंत हुईलगोळकर (पुन्हा एकदा मधू जोशी)ची. स्टेज प्रॉपर्टी आणि सेटिंगची परशुरामीयांनी कमाल केली. लॉवले आणि पिद्यापीठ जिमखाना सुद्धा त्याच रांगेतले. विद्यापीठचे दिग्द. प्रदीप गोखलेंनी (पडद्यामागे अनंत कुलकर्णींनी) तर पात्रांची एक्झिटच, समोर नीट दिसेल अशी लावली. उल्लेखनीय नेपथ्य फक्त फर्ग्युसोनियन्स, शाहू यांनी वापरलं. मृदुला बेहरेनं (फर्ग्युसनं) प्रकाश योजनाही समर्थपणे हाताळली. विशेषतः संभोगाच्या रात्रीनंतर राजाराणीतला खटका दाखविणारा दोन वातींचा संकेत किंवा दुसऱ्या नियोगाच्या घोषणेच्या वेळी डाव्या विंगेतून टाकलेला प्रकाश स्रोत, संघर्षबिंदू [ peak ] मध्यरात्र आणि राजाच्या खचण्याची परिसीमा जिथं एकत्र येतात तिथं केवळ समयांचा प्रकाश.

या सगळ्यांतून जाणवतं ते एवढंच की; पुरुषोत्तमच्यारूपानं दिसणारी युवक रंगभूमी ही प्रायोगिक मंचापेक्षा तंत्र, मंत्र आणि अभिनयाला कच्ची आहे, विचार करण्याचे आणि सरावाचे कष्ट ती उचलत नाही. मग जब्बार पटेलांचं म्हणणं बरंच पटतं–या लोकांनी रंगभूमीकडे इतक्या कॅज्युअली पाहायला नकोय.

## बॅकस्टेज आणि जोशी–स्पर्धा

दिग्दर्शनात विद्यार्थी दिग्दर्शकांची ओरिजिनॅलिटी किती हा आणखीन वेगळा भाग. बेहरेनं म्हणे पालेकर ते भाटकर यांची मदत घेतली, मधू जोशींनी कन्स्ट्रक्शन, रॅंगिंग आणि फोन करण्यापूर्वी बसवल्या, श्याम जोशी क्रांतिदूत, एकटाच्या मागे आणि अशोक जोशी सिग्नल म्हॅं हॅंऽऽच्या मागे. प्रभाकर वाडेकरच्या मागे कुणी खास असल्याचं ऐकिवात नाही. मागच्या वर्षी टी. ए. च्या नावानं ओरडणाऱ्या कलोपासकांनी हे का करावं का? ही स्पर्धा जोश्यांच्या घरातली स्पर्धा आहे? असे काही प्रश्नही विचारले गेले. इथं एक सूचना कराविशी वाटते की असं 'दादा' लोकांचं बिलकुल पाठबळ नसलं तर सगळेच इस्पिक एक्के अर्ध्यावरती ओ माय लव्ह करीत इवळायचे तेव्हा केवळ एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा मुळात जाऊन हे लोक विचार का करत नाहीत?

आठ दिवसांच्या ह्या स्पर्धा कलोपासकांचा मात्र महिनोन्‌महिने घाम काढतात तेव्हा त्यांच्या खऱ्याखुऱ्या परिश्रमांबद्दल त्यांचं करावं तेवढं अभिनंदन थोडंच. स्पर्धक मंडळीं बाकी काहीही 'राडे' करोत, त्यांच्या अमाप उत्साहाबद्दल हार्टिएस्ट कॉंग्रॅच्युलेशन्स. खरं म्हणजे, सर्वात प्रथम पण तथाकथित सभ्यता म्हणून शेवटी अभिनंदन करायचं ते रसिक प्रेक्षकांचं. बोअर नाटकाचा कोचा करणे, चांगलं नाटक डोक्यावर घेणे. आणि न कंटाळता सातसात दिवस रोज तीन तीन एकांकिका बघणे यालासुद्धा फार गटस् लागतात. नेमकी कॉमेंट सुचायलाही टॅलेंट लागत. असो. स्पर्धेच्याविषयी बोलण्यापूर्वी कलोपासकांना काही सूचना कराव्याशा वाटतात. १. भरतचे माईकस् फेल जाणे हा रुटीन कार्यक्रम–स्पर्धेच्या वेळेस शक्य तितकी खबरदारी घ्यावी. २. मागच्या वर्षी तीनचार विंगाचे स्टेज आणि यंदा सहासात विंगांची खोली आल्यामुळे सेटिंगचे अंदाज चुकले. शक्यतो स्पर्धकांना पूर्वकल्पना द्यावी. ३. यावर्षी सर्वत्र 'बळीचे बकरे' झालेले ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी स्पर्धेत भाग घेऊ शकले नाहीत असे कळते. हा अन्याय आहे. पत्रकारांना स्पर्धेच्या स्मरणिका वेळेवर द्याव्यात कारण त्याशिवाय कुठलं पात्र, कोणतं काम करतंय याचा पत्ता लावणे निव्वळ अशक्य आहे.

## निकाल! असा कसा?

हा फारच लांबलेला लेख संपवण्यापूर्वी निकालाचं चर्वितचर्वण हवंच. सांघिक पहिलं आणि दुसरं पारितोषिक अनुक्रमे फर्ग्युसन आणि शाहूला मिळालं. माझ्या मते हा क्रम उलटा हवा होता. याचं कारण असं की, फर्ग्युसनचा टोटल इफेक्ट जरी चांगला होता, तरीही आनंद पानसे (राजा) ही मध्यवर्ती भूमिका वठलीच नाही. बालनाट्यातल्या भीमार्जुन, राक्षस वगैरे भूमिकांमधून पानशांनी बाहेर यावं. शिवाय काकाजी जोगळेकर पारितोषिक विजेत्या शंतनु गोखलेनं कित्येकदा 'आनि, पन्, चानक्य' असले विचित्र उच्चार केले. पानसेची डिलीव्हरीही फास्ट होती. याउलट कन्स्ट्रक्शनमधलं कुंदन डांगीचं काम, मेंडोलीनपासून ढोलकीपर्यंत पार्श्वसंगीतात होणारा फरक, मोजकं नेपथ्य, वॉचमन हसबनीसचा बेसचा आवाज हे कितीतरी महत्त्वाचे मुद्दे होते. रत्नमाला डांगेच्या हालचाली मात्र जास्त प्रभावी हव्या होत्या. अविद्यार्थी दिग्दर्शकाचं पारितोषिक मात्र अशोक जोशींना म्हॅं हॅंऽऽ बद्दल मिळायला हवं होतं. अभिनयाचं बक्षीस मृदुला बेहरेऐवजी अच्युत वाटवे किंवा कुंदन डांगी यांना द्यायला हवं होतं असं निश्चित वाटतं. विद्यार्थी दिग्दर्शकाचं पारितोषिक मात्र प्रभाकर वाडेकरपेक्षा मृदुला बेहरेला मिळणं जास्त योग्य ठरलं असतं. राहिलं विद्यार्थी लेखकाचं पारितोषिक. ते देण्याजोगं कोणतंही स्क्रिप्ट नव्हतं. त्यातल्यात्यात लेखन मूल्य आणि प्रयोगमूल्याच्या दृष्टीनं प्रभाकर वाडेकरच योग्य होडा हे मात्र पटलं.

काकाजी जोगळेकर पारितोषिकं आणि प्रशस्तिपत्रकं गणपतीची खिरापत म्हणून वाटतात की काय कोण जाणे. काकाजी जोगळेकर पारितोषिकं रत्नमाला डांगे, दिपू फाटक, शंतनु गोखले, हेमंत हुईलगोळकर, अच्युत वाटवे यांना देण्यात आली. या लोकांपैकी गोखले, हुईलगोळकरांपेक्षा प्रभाकर वाडेकर, सुधीर हसबनीस हे लोक जास्त योग्य ठरले असते. प्रशस्तिपत्रके–अमीन मस्कती; प्रभाकर वाडेकर, कुंदन डांगी, अनिल साक्रीकर, श्याम भुतकर, सुधीर हसबनीस, वीणा पटवर्धन यांना वाटण्यात आली. मस्कती, पटवर्धन आणि भुतकर यांच्यापेक्षा रवीन्द्र रामतीर्थकर, विनायक

पोतनीस, दिलीप कुलकर्णी हे जास्त लायक लोक ठरले. असते. असो. प्रशस्तिपत्रकांचा 'तू पण माझा मी पण तुझा' एवढाच उपयोग असेल तर भाग वेगळा.

निकालाविषयीच्या माझ्या प्रतिक्रिया अत्यंत व्यक्तिगत म्हणूनच सापेक्ष आहेत. कुणाला अवघडजागी चिमटा बसल्यास माफी असावी. परीक्षक मंडळी व्यं. दि. मा., राम बापट आणि विजय लागू यांच्या सहनशक्ती-बद्दल आदर वाटतो. स्पर्धेच्या तीन परीक्षकांनी एकत्र बसून चर्चा करावी का असा प्रश्न मात्र विचारू नका. पुन्हा एकदा सर्व पुरुषोत्तमांचे, कलोपासकांचे, पुरुषोत्तम कलोपासकांचे, कलोपासक पुरुषोत्तमांचे, स्पर्धकांचे, विजेत्यांचे-थोडक्यात आमच्यासकट सगळ्यांचे आभार, अभिनंदन वगैरे करून लांबलेला विराम देतो.

☐

---

ज्याही व्यक्तिरेखांमध्ये चित्र आणि व्यंगचित्र यांचं जे बेमालूम मिश्रण दिसतं, त्यांचं श्रेय त्या त्या मुरब्बी कलाकारांइतकंच दिग्दर्शक-लेखकांचंही आहे. जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करायलाच हवा. शशिकांत निकते हे अभिनेत्याइतकंच-किंबहुना जास्तच-दिग्दर्शक म्हणून प्रस्थापित होऊ पाहत आहेत. अलीकडच्या काळातच पाहण्यात आलेलं हे त्यांचं दुसरं नाटक. फार्स त्यांनी रेखीव बसवलाय, हे तर खरंच, पण त्यापलीकडे जाऊन त्यांच्या प्रतिभेची खास चमक त्यात क्वचितच दिसते, ही काही समाधानाची बाब नव्हे.

लेखक म्हणून अकोलकरांच्या आणि दिग्दर्शक म्हणून निकत्यांच्या contributionसंबंधी मतभेद होऊ शकतील, पण बहुसंख्य कलाकारांच्या सहजसुंदर अभिनयानं फार्स उंची गाठतो याबाबत शंका निघणं कठीणच. सर्वांत आधी उल्लेख करायला हवा तो बबन प्रभूंचा. किंचित जड जीभ आणि affected शब्दोच्चार यांचा खास फार्सिकल टच्नं वापर करून घेण्याची त्यांची क्षमता आणि मुख्य म्हणजे त्यांच्या कामातली आणि स्टेजवर वावरण्यातली विलक्षण नैसर्गिकता, सहजता कौतुकास्पद. त्यांच्यापाठोपाठच एजंट भडसावळे (वामनराव पटवर्धन), ट्रिगर (मुकुंद कोठारे), गोविंद वॉचमन (जयंत सावरकर) आणि इन्स्पे. प्रकाश (स्वरूपकुमार), मायकेल (कुलदीप पवार) या मंडळींच्या कामगिरीचा उल्लेख करायला हवा. मात्र शेवटच्या दोघांमध्येही अधूनमधून उमटणाऱ्या ऐतिहासिक छटा फार्सच्या वातावरणाशी विसंगत वाटतात. चार स्त्रीपात्रांपैकी मोना डिसूझा (मंदा देसाई) आणि ललिता (उज्ज्वला केणी) समाधानकारक. बबनची बहीण नीला (आशा पोतदार) आणि बबनची आई (लता थत्ते) या अनुभवी अभिनेत्रींनी मात्र कृत्रिम अभिनयातून निराशा केली आहे. विशेषतः या दोघींतला दुसऱ्या अंकाच्या आरंभीचा प्रवेश, लेखन-दिग्दर्शन या दोन्ही दृष्टिकोनातून अगदीच हलक्या दर्जाचा आणि ठिसूळ झाला आहे.

या फार्सच्या दर्जाबाबत प्रेक्षकांत आणि त्यापेक्षाही समीक्षकांत बरेच मतभेद आढळतात. माझ्यापुरतं बोलायचं तर व्यावसायिक व कलात्मक दोन्ही दृष्टिकोनांतून नाटक अपयशी ठरलं, तरी तीन तास निर्भेळ, मनसोक्त आणि अभिरुचीसह हसण्याची दुर्मिळ संधी मिळाल्याचा मला आनंद आहे.

---


# तीन लाखांची गोष्ट

## समर्थ कलावंतांची सुखद कामगिरी

'फुलता कळी फुलेना'चे लेखक श्री.प्रकाश सावरकर यांच्याप्रमाणेच 'तीन लाखांची गोष्ट'चे लेखक श्री. एस. जी. अकोलकर यांचंही नाट्यलेखनक्षेत्रातलं हे पहिलंच पाऊल. दोघांच्याही नवखेपणाच्या खुणा दोन्ही नाट्यकृतीत निश्चित जाणवतात. पैकी सावरकरांचा नवखेपणा हा गतिमानतेच्या अभावामुळे कमी पडणाऱ्या नाट्यपरिणामाचा अदमास न येण्यात दिसला, तर अकोलकरांचा अननुभवीपणा हा विषयाच्या फार्सिकल हाताळणीतल्या सर्व धाग्यादोऱ्यांची घट्ट वीण, पकड नसण्याच्या स्वरूपात दिसतो. अर्थात यापलीकडे या दोन नाटकांची तुलना करण्याचा उद्देश नाही, ते शक्य व योग्यही नाही. कारण एक serious sentimental tragedy आहे तर 'तीन लाखांची गोष्ट' हा नाट्यसंपदेनं सादर केलेला उघडउघड फार्सच आहे. शशिकांत निकते यांनी दिग्दर्शिलेल्या या 'गोष्टी'त फार्सचे बहुसंख्य घटक-अनुभवी कलावंतांसह-हजर आहेतच. पुन्हा नाटक नाट्यसंपदेचं आहे, याचाच अर्थ त्याचं production व presentation यांना काहीएक किमान विशिष्ट दर्जा असणारच असा होतो आणि तो खरा आहेही. पहिल्याच अंकात श्री. राजाराम चव्हाण यांनी मांडलेला 'बुडवे बँके'चा वास्तव आणि देखणाही असलेला सेट् हे याचं एक उदाहरण.

तीन लाखांची गोष्ट ही बुडवे बँकेवर पडलेल्या एका दरोड्याची आणि त्या दरोड्याला कॅशियर बबन देशमुख हा प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने पुढे उडणाऱ्या धमालीची गोष्ट आहे. हा बबन (अर्थातच बबन प्रभू) मोठा विलंदर माणूस, त्यात त्याला अलौकिक स्मरणशक्तीची दैवी देणगी लाभलेली आहे. इतकी की, बँकेतले रोजचे व्यवहार त्याला नोंदवूनही ठेवावे लागत नाही. अशा या स्मृतिवबनावर वेळ येते ती स्मृतिभ्रंश झाल्याचं नाटक करण्याची. त्याच अटीवर दरोडेखोरांनी त्याला जिवंत सोडलेलं आहे-आणि एकाच वेळी घरची माणसं, दरोडेखोर, पोलीस-बँकमॅनेजरचा ससेमिरा आणि आपला नकली स्मृतिभ्रंश एवढं सगळं सांभाळताना त्याची होणारी कुतरओढ, हा आहे नाटकातला हास्याचा झरा. या थीमला मग अकोलकरांनी नाना पात्रं आणि नाना भानगडी जोडल्या आहेत. 'अरे, काय रे हे?' असा अगतिक प्रश्न ज्याला त्याला जेव्हा तेव्हा विचारणारे बँकेचे एजंट भडसावळे, बबनच्या स्मरणशक्तीवर मानसशास्त्रीय संशोधन करणारी त्यांची मुलगी ललिता, 'थ्रिल'च्या (आणि फावल्या वेळात बबनच्याही) मागे लागलेली टायपिस्ट मोना डिसूझा, बँकेचा प्यून आणि वॉचमन या दोन्ही ड्यूटीज् करणारा गोविंदा हे यातले काही सुरेख जमलेले नमुने. अर्थात ही अशी अठरा धान्यांची खिचडी पकवताना (फार्सचे रचनाशैथिल्य मान्य करूनही) अकोलकर बरेच भरकटत गेले आहेत, असा एक सर्वसाधारण आक्षेप आहे. त्यामुळेच निरनिराळ्या हास्यधाग्यांचा परस्परांशी बिनतोड मेळ बसत नाही, असं वाटतं. अर्थात मूलतः हे मूल्यमापन, फार्स या नाट्यप्रकारातच प्रेक्षकांना असणाऱ्या भिन्नभिन्न अभिरुचीनुसार सापेक्ष होत असणं शक्य आहे. नाटकातल्या बारीकसारीक लेखनवैशिष्ट्यांपैकी हुकुमी हशा खेचणाऱ्या बबनी संवादांपेक्षासुद्धा, दरोडेखोरी आणि पोलिसी खाक्या या दोन्हींची ज्या अफलातून पॅरडी अकोलकरांनी जाणूनबुजून वा सहजच केली आहे, ती मला विशेष इंटरेस्टिंग वाटली. मायकेल (कुलदीप पवार), बॉस (रमेश पडवळ) व ट्रिगर (मुकुंद कोठारे) ही दरोडखोर त्रिमूर्ती आणि इन्स्पे. प्रकाश (स्वरूपकुमार) या चौघां-

-शिरीष सहस्रबुद्धे



# जेव्हा वसंतराव रंगतात....

विनय हर्डीकर

नेहमीप्रमाणे गाण्याची वेळ साडेनऊची होती. त्यामुळे नऊ पंचवीसच्या सुमारास लक्ष्मी क्रीडामंदिराच्या आवारात शिरल्यावर 'गाणं रद्द झालं की काय' असं वाटावं इतकं आवार मोकळं होतं. वाहनांची खचाखच नाही, 'काय एकटेच ?' किंवा 'आज तुम्ही सुद्धा' असले प्रश्नही नाहीत. माणसंच नव्हती. आत शिरता शिरता काळी दोनमध्ये लावले जाणारे वाजू लागलेले तंबोरे मात्र कानापर्यंत झंकारत आले. व्यासपीठाच्या आसपासची पन्नास एक माणसं जरा स्थिरावतात न स्थिरावतात तोच तंबोरे आले, पेटी तबला आला, पाठोपाठ, अप्पा जळगावकर, बाजीराव सोनावणे आले आणि पांढरा लेंगा, पिवळा झब्बा, काळं जाकीट यातली प्रसन्न मुद्रेची वसंतरावांची ठेंगणी मूर्तीदेखील डुलतडुलत आली. बरोब्बर साडेनवाला श्री. नागेश खळीकर यांचं प्रास्ताविक भाषण सुरू झालं–त्यानंतर दोनच मिनिटात वसंतराव देशपांडे यांनी छायानट आळवायला सुरुवात केली.

गाणं वेळेवर सुरू झालं की, इतकं बरं वाटतं. पण कुमार गंधर्वांसारखे काही लोक सोडले तर कुणालाच त्याचं महत्त्व नसतं. साडेनवाचं ठरलेलं गाणं दहा–सव्वा दहापर्यंत सुरू झालं तरी कुणी रागवत नाही. इंटरव्हल वीस मिनिटांचं असं म्हणायचं एवढंच. त्यामुळे वसंतराव छायानट आळवताना पहिल्याच समेवर आले तेव्हा हुरखलेले श्रोते मोजकेच होते आणि आज काही और मजा आहे याची थोडीशी चाहूल लागत होती. खणखणीत तबला, ख्यालाच्या सुरवातीला जरा विचित्र वाटावी अशी मध्यमलय, पेटीवरचा तत्पर प्रतिसाद यांमधून छायानटाचे स्वर डौलाने मांडले जात होते. आणि आत येणारी माणसं मुद्रेवरचं आश्चर्य पुसलं जायच्या आत एखाद्या समेला वा म्हणतच खाली बसत होती. छायानटाचा अंतरा आला आणि ते सूर व श्रोते यांनी लक्ष्मी क्रीडा मंदिर भरून गेलं–विपुलता होती; पण कंटाळवाणी गर्दी नव्हती, तडफ होती पण आढ्यता नव्हती, उत्स्फूर्तपणा होता पण उद्रेक नव्हता. आलापी थोडावेळ झाली. मग लहानमोठे तुकडे एकत्र जोडून विविधतेने पेश केले गेले. वसंतरावांचीच अशी खास सरगम झाली. चकाकणाऱ्या ताना सुरू झाल्या. 'झनझन बाजे बाजे बिछुआ' ही द्रुत त्रितालातली झोकदार बंदीश लयबद्ध डौलाने मिरवू लागली, रंगू लागली.

छायानटाच्या पकडीमध्ये श्रोत्यांना धरून वसंतराव गायले खेम हा राग. तो कल्याण थाटाचा आहे असं त्यांनी सांगितलं आणि 'आये हो' बंदीश ते मांडू लागले. मध्यलयीचा वापर आता अधिक सुखद झाला होता. अप्रचलित राग. कधीतरी शराफत हुसेन यांनी रेडिओवर गायल्याचं आठवत होतं–पण त्यातली रंजकता वसंतराव बरोबर शोधून समोर मांडीत मागे एकदा सकाळी झीलफ त्यांनी असाच रंगवला होता. प्रसन्न आत्मविश्वासाने ते नवे नवे सूर लय आडलय यांच्या चक्रव्यूहातून बाहेर काढत आणि गंमत म्हणून सम मात्र अनाघात ठेवीत. पण हा खेम इतका परका वाटेनासा झाला. त्याचा विस्तार अशा चतुराईनं झाला की, छायानटाशीही त्याचा सांधा बेमालूम जुळत गेला व नंतर आलेल्या केदारातल्या 'आ रंगीले साजन' या केदारातल्या द्रुत एकतालातल्या बंदीशीमध्येही त्याच मुद्रा विकास झाल्यासारखा वाटला. अनपेक्षितपणा हे वसंतराव यांचं मुख्य तंत्र या चीजेच्या निवडीमध्ये दिसलं. मध्यमावरचं सुंदर काम आणि अंतऱ्याची पूर्ण मांडणी करत असताना त्यांनी गमकाचा इतका नाजूक, अल्प आणि अर्थानुकूल वापर केला की गमक म्हणजे केवळ भारदस्त गायकीचा अलंकार ही समजूत, हा ठोकताळा पार उद्ध्वस्त झाला.

एव्हाना जवळजवळ प्रत्येक श्रोत्याशी कलाकाराचा स्वतंत्र संवाद प्रस्थापित झाला होता. नंतर आलेल्या 'ध्यान लगे मोहे तोरा' या आर्त ठुमरीनं त्या संवादाला पूर्णता आणली. 'छब दिखलादे तोरी' 'ही' बाँके सावरियाला घातलेली सादच विलक्षण होती. ठुमरीत अलंकरण होतं पण भावुकता अधिक होती. विरहाची आर्तता, त्यातून येणारी गाढ ओढ आणि 'ना मानेजिया मोरा' हे सगळं व्यक्त करताना वसंतरावांना दाद मिळाली ती कानांची, डोळ्यांची आणि हृदयाची सुद्धा. इंटरव्हल झालं आणि पुढे काय अशी हुरहूर बाळगत कितीतरी श्रोते सभागृहातच बसून राहिले.

मध्यंतर खरोखरच वीस मिनिटांतच संपलं अकरापस्तीसला कोणी कानड्याचा 'राजनसे

राजा' हीं भारदस्त, स्वयंसिद्ध ख्याल सुरू झाला तोच मुळी विलक्षण ठाम आणि मजबूत वजनदार ठेक्यात. हा राग अनेक वेळा 'ऐकू येतो' पण 'ऐकायला मिळत नाही. बागेश्री आणि मालकंस यांच्या आरोह अवरोहांचा हा लपंडाव. पण तो तसा क्वचितच ऐकायला मिळतो. मालकंस आणि दरबारी असे दोन ठळक रंगच नेहमीच दिसतात. पण आज बुवा रंगले होते. प्रतिज्ञेवर गात होते. तो लंपडाव त्यांनी संथ आलाप, संथ सरगम, बोलताना, लयकारी-ताना, मध्यमलयीतली सरगम या सगळ्यांतून चित्रित केला. स्वरांची चकवाचकव, पाठशिवण केवळ मोहक होती. एरवी चढता सुरांकडे धावणारा बुवांचा गळा खर्जसाधन करत होता. आणि जवळजवळ चाळीस मिनिटं होत आली तरी निषादापर्यंत चढून षड्ज लागतोय असं वाटतंय तेवढ्यात धैवताच्या पायरीवरून खाली उतरत होता, मध्येच पंचमाला एक लडिवाळ स्पर्श करत होता. गंभीर अस्ताई, आर्त अंतरा आणि खटयाळ द्रुतलयीचा शेवट असा कौशीकानडा रंगत गेला. काहे करत मोसे बरजोरी ही द्रुत बंदीश श्रोत्यांना मनमुराद आनंद देऊन गेली आणि त्या लयीनं बुवाच मोहून गेलेले असल्यानं त्यांनी लयीच्या अंगानं रंगणारं 'सावरे आजइयो' हे लोकगीत लगेच सुरू केलं.

हे गीत खास वसंतराव यांच्याच गळयासाठी आहे की काय असं वाटतं. कुमार गंधर्वही ते म्हणतात, पण लोकगीताचा नखरा आणि ठसका त्यात येत नाही. त्यांचेच एक एक दोस्त म्हणतात तसं ते 'भजन' वाटतं. गाण्याचा बाज मात्र लावणीचा, उडत्या रंगाचा वाटतो. वसंतराव हे जाणूनच मुद्दाम ते लयीच्या अंगानंच गातात. यातली सरगम तर अतिशय चतुर, मोहक असते! राधा रंगीली मेरा नाम' मधला ठसका केवळ त्यानीच दाखवावा. या गीताच्या वेळेला संवादानं परमावधी गाठली होती. जवळजवळ सर्व श्रोत्यांनी ताल धरला होता तो हे गीत 'लाइट होतं' म्हणून नव्हे, त्याची पूर्व तयारी मैफलीच्या आधीच्या भागातच झाली होती. एक बरं झालं की श्रोते त्या गुंगीत असतानाच संयोजकांनी आभार प्रदर्शन, भूमिका, सस्थेची स्थापना वगैरे अति गद्य भाग उरकून घेतला.

वसंतराव लगेचच भैरवी गायले 'आज मैं लडूंगी माँ' आणि खटयाळ भैरवी म्हणजे काय याचा त्यांनी पुरेपूर प्रत्यय आणून दिला. स्वयंवरातल्या 'नृपकन्या तव जाया' या पदाला खटयाळ भैरवी म्हणतात, पण ते पदच काय पण स्वयंवरसमकालीन असं कोणतंच पद स्वतंत्रपणे ऐकताच येत नाही इतकी ती पदं परंपराग्रस्त आहेत. आर्तपणा, भक्तिभाव ही भैरवीची सध्याची मान्य इमेज आहे पण इथे दर्शन घडलं ते अनुरागाचं, विप्रलंभ शृंगाराचं, सुखविणाऱ्या तक्रारीचं, गोड विरहाचं–गाणं संपलं तेव्हाचा विरहसुद्धा त्यानंच गोड झाला!

He excelled in every department of the art of music. जबरदस्त आत्मविश्वास, आवाजावरची हुकमत, श्रेष्ठ कलावंताकडे उपजत असणारी अस्सल नक्कल यांची जाण, गाढा अभ्यास आणि त्याची उत्स्फूर्त कलाविलासात होणारी परिणती, ताललय यांच्याशी चाललेले लपंडाव, रचनांची समर्पक निवड, श्रोत्यांशी मिसळून गाण्याची आणि तरीही आपण त्यांच्या पातळीला न उतरता त्यांना आपल्या पातळीला उचलून घेण्याची श्रेष्ठ जादू हीच चतुरस्र, प्रतिभावान गायकीची सर्व वैशिष्ट्य वसंतराव रंगले आणि फुलून आली, बहरून आली, श्रोते विस्मित झाले, सुखावले, आनंदले. नाहीतर पुण्यातल्या श्रोत्यांचेही तट पडले आहेत. कुणी एखादा राग गायला, चांगला गायला की त्या गायकाचे श्रोते तेवढे सुखावतात व बाकीचे चिंताक्रांत तरी होतात, किंवा आपल्या आवडत्या गायकापेक्षा हा कलाविकास कसा निकृष्ट होता, ते सिद्ध करायला धडपडू लागतात, कलास्वादासाठी याचा काहीच उपयोग नसतो. वसंतराव यांच्या गाण्याला असे श्रोते फारसे आले नव्हते हा एक भाग, पण जे होते त्यांच्या मनातले असे तट ढासळले हा दुसरा भाग. जास्त महत्त्वाचा आणि सुदैवाचा. बुवा जे संगीत गायले त्यातच नाटच होतं. नाटचसंगीत आज कुठे आसपासही नव्हत हे दुसरं विशेष.

डॉ. वसंतराव देशपांडे हे उत्तम नट, उत्तम गायक नट, अष्टपैलू गायक, बुद्धिनिष्ठ गायक, नीरक्षीर विवेकाने नवनवीन तंत्रे शिकणारे अभ्यासक तर आहेतच पण ते स्वरांचे 'वसंत' आहेत, बहरलेले आहेत. आणि त्यांच्या नावाला उद्देशून 'ऋतूनां कुसुमाकरः' असा निर्वाळा साक्षात् भगवंतानेच दिला आहे! ☐

(हा कार्यक्रम शुक्रवार दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री पुण्याच्या लक्ष्मी क्रीडा मंदिरात झाला.)

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

११।९।७६ ते १७।९।७६

**मेष : यश हाती येईल**

आठवड्याच्या शेवटी रवी सहावा होत आहे. तो तुमच्या गुप्त शत्रूंची चांगलीच 'हजेरी' घेणार आहे. आठवडा एकंदरीत यशाचा कलश हाती देणारा आहे. बलवान ग्रह अनुकूल असले की, महत्त्वाकांक्षा पल्लवीत होतात व पूर्णही होतात. तुम्हाला सध्या हा मान लाभला आहे. प्रगतीची दालने खुली होतील. अपेक्षापूर्ती दृष्टिपथात येईल. जे मिळणार नव्हते असे वाटत होते तेच हाती पडून आश्चर्याचा धक्का बसेल. नोकरीत बढती, प्रमोशन, पगारवाढ जे मागाल ते मिळेल. धंद्यातील मंदी संपून तो सुधारण्यासाठी काही चांगला मार्ग सापडू शकेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. शुभ दिनांक १४–१५

**महिलांना :** नोकरीत ऑफिसरची बढती मिळेल. अनुकूल ग्रहमानाचे अनेक फायदे होतील.

**विद्यार्थ्यांना :** संशोधन व कला या क्षेत्रांत पुढे येण्याची संधी मिळेल.

**वृषभ : अनपेक्षित यश**

वृषभ राशीच्या व्यक्तींनी रडत राहू नये. शुक्राची हसत मुद्रा अशी ही रास आहे. यावेळी तुमच्या पदरात जे यश पडणार आहे त्याचा तुम्हालादेखील अनपेक्षित धक्का बसेल. हे यश राजकारण, साहित्य वगैरे क्षेत्रातील असेल. गुरू–मंगळ व गुरू–रवी असा त्रिकोणयोग तुमच्या कुंडलीत आहे. त्याचे इष्ट ते परिणाम तुमच्याबाबतीत होतील. अनेक दिवस सलणारा एखादा 'मानभंगाचा काटा' यावेळी सहज बाहेर निघून तुम्हाला हायसे वाटेल. प्रगती व योजना हातात हात

घालून तुमच्या व्यवसायात यावेळी वाटचाल करतील. शुभ दिनांक १२–१४.

**महिलांना :** गायिका व कलाकार महिलांना हा आठवडा आश्चर्यकारक यशाचा जाणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** प्रसिद्ध कलाकाराचा सहवास मिळून मनाच्या आशाआकांक्षा फलद्रूप होतील.

### मिथुन : मन शांत ठेवा

मंगळाबरोबर आता रवीदेखील सुखस्थानी येत आहे. मनाविरुद्ध घटना घडून मन उद्विग्न होणे, चडफडाट वाढणे अशा प्रकारे कौटुंबिक व नोकरीच्या क्षेत्रात घटना घडू शकतील. पण यावेळी कुलदेवतेची प्रार्थना करून मनःशांतीचा वर मागणे हाच उत्तम मार्ग होय. भांडण व अकारण आदळआपट याने काही पदरात पडणार नाही. नोकरीत वरिष्ठांशी पूर्ण नमते घेण्याची भूमिका ठेवा. कोणतेही मागणे यावेळी मागू नका. स्थावराच्या व्यवहारात अनपेक्षित बदल घडण्याची शक्यता आहे. लेखकांना पुष्कळ मागणी येईल. शुभ दिनांक १४–१६.

**महिलांना :** उद्योगात मन गुंतवा. अवांतर गोष्टी करू नका. व्रतवैकल्ये पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** अपयश पचविण्याची हिम्मत तुम्हाला प्राप्त होईल.

### कर्क : कर्तबगारीला चालना

राशीतील शनीवरून रवी–मंगळासारखे ग्रह जेव्हा भ्रमण करीत होते तेव्हा तुमची कोंडी होणे अगदी स्वाभाविक होते. आता ही कोंडी फुटली आहे. तिसरा शनी तिसऱ्या मंगळाबरोबर हातमिळवणी करून तुमच्या कल्पकतेला व कर्तबगारीला अनेक दालने खुली करणार आहेत. अनुकूल काळ आहे. अपेक्षा सफल होणार आहेत. लेखकांचे लेखन उत्कृष्ट होईल. प्रतिभा जागृत होईल. नोकरीत बढती, प्रमोशन देईल. उद्योग सुधारेल. गुंतवणूक होईल. नवा धंदा सुरू करण्याचे स्वप्न साकार होईल. परदेशी जाण्याची इच्छा अनपेक्षितरीत्या पूर्ण होईल. आर्थिक परिस्थितीत उल्लेखनीय सुधारणा होईल. शुभ दिनांक १५–१७.

**महिलांना :** अपेक्षापूर्तीचा आनंद उपभोगू शकाल. नोकरीत अनुकूल बदल.

**विद्यार्थ्यांना :** मन आनंदी राहील. उत्साह व प्रसन्नता यशाला प्रोत्साहक ठरतील.

### सिंह : बदल संभवतो

राशिस्वामी रवी १६ दिनांकाला कन्या राशीत प्रवेश करीत आहे. त्याआधी तुम्ही तुमची सारी कामे आटोपून घ्या. रवी हा सिंह राशीचे मोठे बळ आहे. विशेषतः राजकारण व उद्योग या दोन्ही क्षेत्रांत मोठे स्थान तो प्राप्त करून देतो. हा रवी आता दुसरा होऊन मंगळाबरोबर हातमिळवणी करीत आहे. प्रामुख्याने आर्थिक व कौटुंबिक परिस्थितीवर त्याचे मोठे परिणाम होणार आहेत. व्यापारी लोकांनी मोठे वायदे व उलाढाली शक्यतो टाळाव्यात. कौटुंबिक मतभेद बळावले तरी, त्यांना भांडणाचे स्वरूप येणार नाही याची काळजी घ्या. नवरा-बायकोनी संशयाच्या आहारी न जाणे हिताचे होईल. नोकरीत वरिष्ठांबरोबर विनम्र वृत्तीचा अवलंब करणे अधिक हिताचे ठरेल. शुभ दिनांक १४–१५.

**महिलांना :** नोकरीत बदली होण्याची शक्यता नाकारू नका. कामाचा ताण पडला तरी, कोणतेही काम नाकारू नका.

**विद्यार्थ्यांना :** सारासारविवेक बुद्धीने वागा. व्यसने व भलता तापटपणा सोडा.

### कन्या : परिस्थिती सावरेल

मंगळाचे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त झाले होते तरी, रवी बारावा होता तोपर्यंत त्या सामर्थ्याचा काही उपयोग नव्हता. आता रवीची जोड मिळाल्यामुळे यश, प्रगती हातात हात घालून प्रवास करणार आहेत. कौटुंबिक व आर्थिक बाजू बरीच सुधारेल. अनपेक्षित अशा बऱ्याच घटना घडणार आहेत. नोकरीच्या क्षेत्रात बरेच काही पदरात पाडून घेऊ शकाल. आर्थिक बाजू बरीच सुधारेल. अनेकांकडून सहकार्याचा हात पुढे येईल. सार्वजनिक कार्यात एखादे पद पदरात पडण्याची शक्यता आहे. उद्योगाला चालना देऊ शकाल. दुय्यम व्यवसाय बराच सुधारेल. पत्रव्यवहाराने सार्वजनिक व कौटुंबिक गैरसमज दूर व्हायला मदत होईल. शुभ दिनांक १२–१४.

**महिलांना :** तब्येतीची काळजी उरणार नाही. अनेक दिवस जो निरुत्साह वाटत होता तो कमी होईल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** तुमची स्वप्ने साकार होण्याचा संभव नजिक येत आहे. परीक्षेत मोठे यश पदरात पडणार आहे.

### तूळ : सावधानता ठेवा

बारावा मंगळ आहे. त्याच्या भरीला भर म्हणून की काय सोळा दिनांकाला रवीदेखील बारावा होत आहे. रवी व मंगळ हे कर्तुमकर्तुम शक्तीचे ग्रह आहेत. ते प्रतिकूल झाले की, विचार आणि व्यवहार यात अत्यंत सावध राहणे आवश्यक असते. नोकरीत तुमच्या स्थैर्याला जरी धोका नसला, तरी


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

वरिष्ठांशी मतभेद, त्यांची गैरमर्जी, थोडे-फार स्थानांतर, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य बिघडणे, कामाचा ताण असे काहीतरी घडू शकेल. सोने, चांदी, कापड, रेशीम व सौदर्यविषयक उपकरणे यांचा व्यापार करणाऱ्यांनी बाहेरच्या परिस्थितीवर डोळयांत तेल घालून लक्ष ठेवणे आवश्यक आहे. हिशोबाच्या बाबतीत दक्ष राहून बेकायदेशीर असे कोणतेही वर्तन हातून घडू देऊ नका. आर्थिक परिस्थितीत चढउतार राहतील. शुभ दिनांक १३–१५–१६.

**महिलांना :** फॅशन्सच्या मोहापायी संकटे ओढवून घेऊ नका. नोकरीत काम जास्त पडेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा असेल तर अभ्यास करणे भाग आहे.

## वृश्चिक : अनपेक्षित लाभ

मंगळ व शनी अकरावे आहेत. ही एकच घटना तुमच्या अभूतपूर्व यशाची हमी द्यायला पुरेशी आहे. सार्वजनिक कार्यात तुमचे महत्त्व वाढून राजयोगी सन्मान होण्याची शक्यता आहे. राजकारणात तुम्ही बरेच काही पदरात पाडून घेणार आहात. आर्थिक स्वास्थ्य तर सर्व आशा-अपेक्षा सफल करून जाईल. व्यापारात कधी नव्हते एवढे यश पदरी पडणार आहे. रेस व लॉटरी ही दोन्ही साधने तुमच्या हाती सुपूर्द होणार आहेत नवा धंदा सुरू करायला अनुकूल असे वातावरण आहे. कर्जाची सोय होईल. जुने येणे वसुल होईल. परदेशी प्रयाण सहज जमून जाईल. नोकरीत सुवर्णाचे क्षण जर तुम्ही अनुभवले तर आश्चर्य मानू नका. आरोग्य सुधारून उत्साह वाढेल.शुभ दिनांक १४–१६.

**महिलांना :** हाती आलेला पैसा जपून वापरला तर हा आठवडा बराच लाभदायक आहे.

**विद्यार्थ्यांना :** आशादायक असे काहीतरी घडून येईल.

## धनू : नोकरीत स्थैर्य

धनू राशीच्या व्यक्तींनी अस्थिरपणाच्या संशयाखाली गेले काही महिने बराच त्रास सोसला आहे. विशेषतः नोकरीत असणाऱ्यांना याचा अधिक प्रमाणांत अनुभव आला असेल. उद्यापासून येऊ नका असे केव्हा सांगतील याचा नेम त्यांच्या बाबतीत राहिला नव्हता. पण मला लिहायला आनंद वाटतो की, आता तो धोका संपला आहे. उलट आता तुमची गरज हाच परवलीचा शब्द होणार आहे. दि. १६ ला रवीचे दशमस्थानी राश्यांतर बरेच काही मिळवून देईल. आपल्या मागण्या तुम्ही वरिष्ठांच्या कानावर घालू शकाल. उद्योगात बस्तान बसेल. परिस्थिती सुधारेल. शुभ दिनांक ११–१४

**महिलांना :** नोकरीच्या प्रयत्नाला मोठे यश लाभेल. अपेक्षा पूर्ण होतील.

**विद्यार्थ्यांना :** मिळालेल्या संधीचा योग्य लाभ घ्या.

## मकर : भाग्योदयाची चाहूल

तुमच्या राशीचा बलवान ग्रह मंगळ संध्या भाग्यस्थानी आहेच. त्याच्याबरोबर रविसारखा तेजस्वी ग्रह आता भाग्यस्थानी येत आहे. दि. १६ पासून तुम्हाला अनेक अनुकूल घटनांची चाहूल लागणार आहे. तुमचे कोणतेही क्षेत्र असो तेथे तुमचा प्रभाव वाढणार आहे. प्रामुख्याने नोकरीत महत्त्वपूर्ण बदल होऊ शकेल. अधिकारात वाढ, पगारात वाढ असे काहीतरी होऊ शकेल. विरोधकांना धमकावू शकाल. चालू धंद्यात चांगली गुंतवणूक होईल. बचतीचे उद्दिष्ट पुरे होईल. पैसा मोकळेपणाने वापरात येईल. शारिरीक त्रास व अप्रसन्नता आता अतित्रासदायक होणार आहे. उच्चपदस्थ व्यक्तीचे मोठे सहकार्य मिळणार आहे. शुभ दिनांक १५–१६

**महिलांना :** अपेक्षासाफल्याचा काळ चांगला आला आहे याची चाहूल व तो मानूनच सारे काही ठीक घडवेल.

**विद्यार्थ्यांना :** आत्मविश्वास वाढेल. अर्थविषयक अभ्यासावर विशेष लक्ष द्या.

## कुंभ : प्रयत्नाला यश

रवी दि. १६ ला कन्याराशीत प्रवेश करणार आहे. त्यापूर्वी तुम्ही तुमची सारी महत्त्वाची कामे उरकून घेतली तर यशाची फळे तुमच्या हाती पडू शकतील. प्रामुख्याने राजकीय क्षेत्रांत विरोधकांचे डावपेच तुम्ही यशस्वीपणे उधळून लावू शकाल. सार्वजनिक क्षेत्रांत जे पद तुम्हाला अपेक्षित आहे ते मिळू शकेल. नोकरीसदेखील हा आठवडा प्रगतीला पूरक आहे. वरिष्ठांकडे तुमची रदबदली यश मिळवू शकेल. आर्थिक बाजू भक्कम करता येईल. कोर्ट कचेरीत वाद चालू असतील, तर त्याला गती मिळेल. प्रवास करताना मात्र जरा विशेष काळजी घेणे जरूर आहे. आपल्या चिजवस्तू सांभाळा.

शुभ दिनांक १३–१६

**महिलांना :** कर्तृत्वाला नवी क्षेत्रे उपलब्ध होतील. नोकरीत अधिकार वाढतील.

**विद्यार्थ्यांना :** प्रेमसफलतेचा काळ नजिक येत आहे.

## मीन : कौटुंबिक मतभेद टाळा

मीन राशीच्या व्यक्ती ह्या काहीशा भावनाविवश असतात. त्यात सध्या कौटुंबिक अडचणी तुमच्याभोवती दबा धरून बसल्या आहेत. आता दि. सोळाला रविदेखील सातवा होत आहे. ही परिस्थिती फारशी चांगली नाही. तरीपण योग्य काळजी घेतली तर यातूनही मार्ग निघू शकेल. कौटुंबिक मतभेद कोठेही वाढू देऊ नका. सर्वसामान्य दृष्टचा हा काळ तसा वाईट नाही. आत्मविश्वास वाढून अनेक क्षेत्रांत पुढे पाऊल पडू शकेल. अडचणीतून मार्ग काढण्यात यश मिळेल. नोकरी व उद्योग अडचणीतून बाहेर काढण्याचा मार्ग सापडेल. नोकरीत काही चांगले घडू शकेल. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध जुळतील. धनिक व्यक्तीचे सहकार्य यावेळी मिळू शकेल. शुभ दिनांक १६–१७

**महिलांना :** कौटुंबिक स्वास्थ्य कमी प्रमाणात मिळण्याची शक्यता लक्षात असू द्या. नोकरीत बरीच अनुकुलता.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षित यश साध्य करण्याला ग्रहांची अनुकूलता आहे.

□